E-BOOK

‘शहेनशाह-ए-ग़जल !’

तलत महमूद

लेखक - डॉ. अनंत पावसकर



'ई-साहित्य प्रतिष्ठान'

सादर करीत आहे.

'डॉ. अनंत पावसकर' लिखित

'शहेनशाह - ए – ग़जल !'-

महान गायक :

पद्मभूषण तलत महमूद

पद्मभूषण तलत महमूद

लेखक: डॉ. अनंत पावसकर

(ज्येष्ठ पत्रकार व संगीत संयोजक)

फोन 9820022417

ईमेल: anantpavaskar@gmail.com

मुखपृष्ठ- डॉ. अनंत पावसकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ३० सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. अनंत पावसकर 9820022417

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा

वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

© - लेखक : डॉ. अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार व संगीत संयोजक)

anantpavaskar@gmail.com **9820022417**

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

For all 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on

https://www.esahity.com

(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा-
एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !

लक्षात घ्या. हे बोलके "ई-बुक" आहे. या "ई-बुक" मधील सर्वच्या सर्व 'फोटोज' वर 'लिंक्स' दिल्या आहेत! तसेच या "ई-बुक" मधील प्रत्येक "निळ्या रंगातील" मजकुर, यावर सुद्धा 'लिंक्स' आहेत! फक्त 'क्लिक' करा आणि मनसोक्त आस्वाद घ्या! ही विनंती!

© लेखकाविषयी थोडेसे ©

डॉ. अनंत पावसकर,

ज्येष्ठ सिने पत्रकार

(माजी ध्वनिमुद्रण अधिकारी VENUS)

(जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)

डॉ. अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या "फुलोरा" पुरवणीमधील "आठवणीतली गाणी" या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव1 आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे डॉ. अनंत पावसकर हे "व्हीनस" या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये, त्यांचा पर्यवेक्षक म्हणून प्रत्यक्ष सहभाग राहिला

आहे. कंपनीच्या त्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं त्यांना भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष! ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच, यातूनच ते "आठवणीतली गाणी" हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (सन्मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत). इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना "गुलमोहर" नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय डॉ. अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती.

साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे ५००हून अधिक अल्बम्स बनविण्यात त्यांचा

मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत. मराठीतील पहिलं "ई-बुक" बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत, यासाठी "आशीर्वाद" पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तसेच नुकतेच त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. चक्क "डॉक्टरेट" सुद्धा मिळाली! आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब यासह इतर शेकडो ई-बुक्स "ई- साहित्य" तर्फे सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष! आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते "म्युझिक प्लॅनेट" ही त्यांची स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख! डॉ. अनंत पावसकर यांना आपल्या समुहातर्फे हार्दिक शुभेच्छा!

(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)©

माझे मनोगत

नमस्कार मित्रांनो.. "माझे मनोगत" म्हणून मी काही खास गोष्टी तुमच्या सोबत शेअर करतोय. "ई-साहित्य प्रतिष्ठान" या "उदयोन्मुख लेखकांसाठी" व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या संस्थेचे कार्य खरोखरच अतुलनीय आहे. आज आपली पुस्तके "छापील" स्वरूपात प्रकाशित करणे ही बाब माझ्यासह अनेक लेखकांना अतिशय कठीण गोष्ट झाली आहे. प्रकाशक, नामवंत लेखकांची "पुस्तके" छापतात, प्रकाशित करतात! परंतु यामध्ये नवख्या लेखकांचे काय? कारण अमुक प्रकाशक.. त्या लेखकाला, त्याच्या कलाकृतीसाठी "मानधन" देणे तर दूरच! छपाईचा खर्च सुद्धा मागतात, हे अनेकांनी अनुभवले आहे. यात प्रकाशकांचा अजिबात दोष नाही. छपाईसाठी लागणारा कागद, छपाई आणि नंतर वितरण या गोष्टी अतिशय महागल्या आहेत, हे आपण जाणताच! आज, उद्या "ई-बुक्स" हेच माध्यम असणार आहे, ही काळाची गरज आहे! हे "ई साहित्य प्रतिष्ठान" यांनी ओळखले, याचे सर्व श्रेय सन्मा. "श्री. सुनीळ सामंत" यांना नक्कीच आहे! मित्रांनो, यातून या "ई साहित्य प्रतिष्ठानला" कोणतीही "आर्थिक कमाई" नसते. केवळ "साहित्य सेवा" हेच त्यांचे उद्दिष्ट्य! सलाम त्यांच्या कर्तृत्वाला! असो! माझे स्वतःचे असे हे २९ वे "ई-बुक"! आणि मी "निर्मित" केलेली इतर नऊ "ई-बुक" पाहता, हे "अडतिसावे" ई-बुक! धनंजय कुलकर्णी आणि दिलीप ठाकूर या दिग्गज लेखकांची "ई बुक्स"! "संपादन/ले-आऊट

करताना मनस्वी आनंद झाला, हे विशेष! “तलत महमूद” यांच्यावरील हे खास “ई -बुक” तुम्हा रसिकांसाठी सादर करत आहे. यात माझ्या स्वतःच्या भावभावना व्यक्त करताना, तलतजी यांच्याबद्दलच्या सर्वांच्या सर्व “ऑडिओ/व्हिडिओ-लिंक्स” देतोय! तलत साहेबांवर अनेक पुस्तके आहेत, मात्र माझे परिश्रमपूर्वक बनविलेले हे “ई बुक” तुम्हाला खचितच एका खास “संदर्भ ग्रंथाएवढा” आनंद देईल. दिपून जा! रमून जा! धन्यवाद मित्रांनो!

डॉ. अनंत पावसकर.

(ज्येष्ठ लेखक, पत्रकार आणि सिनेसंगीत अभ्यासक)

♥

♥



‘तलत महमूद’ - मुलायम गायकीचा अनोखा आविष्कार!

जुन्या हिंदी गाण्यांच्या बाबतीत सैगल खालोखाल ‘भाग्यशाली’ ठरलेले गायक म्हणजे ‘तलत महमूद’! त्यांची कारकीर्द म्हणावी तर १९५० ते १९६० अशी केवळ दहा वर्षेच टिकली. त्यानंतर चित्रपटसृष्टीतून ते जणू बहिष्कृत झाले. पुढल्या काळात त्यांना मिळालेली गाणी अक्षरशः हाताच्या बोटांवर मोजण्याएवढीच होती. तीसुद्धा एखाद-दुसऱ्या संगीतकाराने त्यांच्या प्रेमाखातर दिलेली! पण असा प्रेमळ अपवाद वगळता एरवी कुणीच त्यांना गायला बोलवेना! नटांनाच नव्हे, तर संगीतकारांनाही जणू ते नकोसे झाले होते. एक मुलायम स्वर जणू कोमेजून गेला!

१९९३ पासून माझे स्वतःचे असे "आठवणीतली गाणी" हे साप्ताहिक सदर.. "दैनिक सामना"च्या "फुलोरा" या वैविध्यपूर्ण पुरवणीतून सुरूच होते! मात्र एक दिवस, ते १९९६ हे वर्ष होते बरं! एक दिवस अचानक.. त्या "पुरवणीचे" मुख्य लेखक (आणि "फुलोरा" या पुरवणीचे संपादक असलेले..) ज्येष्ठ पत्रकार "अभय परांजपे"! (तो माझ्याच "बॅचचा".. जणू बालमित्रच तो! परंतु दुर्दैवाने तो आज आपल्यात नाहीय! हे अत्यंत वेदनादायी!) याने अचानक सुचवलं. "मित्रा.. कालच अचानक माझ्यासमोर.. "हसले आधि कुणी.." हे गाणं अचानक सामोरं आलं म्हणून सांगतोय! प्रकर्षाने जाणीव झाली! तर.. त्यातले मुख्य गायक असलेले "तलत महमूद" यांची एक मस्त "कव्हर स्टोरी" होऊ शकेल का? त्यांचा संपर्क क्रमांक मिळव! आणि त्यांना प्रत्यक्ष भेट! झालंच तर उत्तम! आपण ती "कव्हर स्टोरी" आपल्या "फुलोरा" पुरवणीमध्ये सन्मानाने सादर करूया! बाप रे! मोठ्ठच चॅलेंज होतं! मी "व्हीनस" कंपनीमध्ये आधीच्या "चारेक वर्षात" एक "म्युझिक इन्चार्ज" म्हणून मस्तच रुळलेलो, परंतु जुन्या "गायकांचे" संपर्क क्रमांक शोधणे आणि मिळवणे हे अर्थातच कठीण होते! मी "सिने म्युझिक असोसिएशन"च्या प्रतिनिधीला विनंती करून "तलत महमूद" यांचा "संपर्क क्रमांक आणि त्यांचा पत्ता" मिळवण्यासाठी विनंती केली.. पण हाय! आठवडाभर काहीच मिळाले नाही. शेवटी "मेहबूब स्टुडिओ" मध्ये आमच्या "व्हीनस" कंपनीच्या गाण्यांचे रेकॉर्डिंग होत असताना, त्या दरम्यान तिथल्या "सिने म्युझिसियन्स असोसिएशन"

च्या (CMA) प्रतिनिधीने त्यांचा संपर्क क्रमांक आणि पत्ता अगदी आपलेपणे दिला.

(त्याने अधिकची माहिती दिली की, वांद्र्याला कार्टर रोडवर, जिथे राजेश खन्ना रहायचा, त्याच्या मागच्या बाजूला "पेरी क्रॉस रोड" म्हणून जो निर्मनुष्य रस्ता आहे. त्याच्या अगदी टोकाला समुद्राजवळ तलतजींचा एक टुमदार बंगला होता. तलतजींचे चाहते तिथे जाऊन त्याच्यासह अनेकदा गप्पांची मैफल जमवत असत. मात्र आता ते, जवळच्याच "सनबिम अपार्टमेंट"मध्ये राहतात. थँक गॉड! मी दुसऱ्याच दिवशी त्या पत्त्यावर अगदी उत्सुकतेने पोहोचलो! सन्मा. तलत महमूद यांचा मुलगा "खालिद" (तो आता माझा "फेसबुक" मित्र असल्याने आजही सतत संपर्कात आहे बरं! असो!!) सामोरा आला. मी तिथे येण्याचे मुख्य कारण आणि सविस्तर मुलाखतीबद्दल अगदी आपलेपणाने सांगतलं! मग काय! त्याने "तलतजींशी" थेट भेट जमवून आणली! तर.. माझं दैव जोरावर होतं! (एक गोष्ट लक्षात घ्या? मी एक सर्वसामान्य "पत्रकार"! सर्वसामान्य माणूस! अनेकांना.. कुणाचीही मुलाखत घ्यायला येणारे "पत्रकार" हे स्वतःच्या पत्रकारितेतून, केवळ स्वतःची कमाई करायला येणारे असे महाभाग असतात! असा सार्वत्रिक समज आहे! आणि ते अगदीच "सर्वसामान्य" असतात! (क:पदार्थ म्हणा ना!) मुख्य म्हणजे मी हे स्वतः कित्येकदा अनुभवले आहे बरं! असो!! तो माझ्यापेक्षा सुमारे सहा-सात वर्षे मोठा.. परंतु उत्तुंग व्यक्तिमत्व असलेले "सन्मा.

तलतजी" यांचा तो सधन पुत्र! श्रीमंत! आणि स्वतः सुद्धा इतकी मोठी व्यक्ती असूनही, त्याने मला अगदी चिरपरिचित असल्यागत आणि एखाद्या समवयस्क मित्रासारखे, माझे मनःपूर्वक आगत-स्वागत केले! मी सामान्य! थक्क झालो! (कदाचित त्यांची धाकटी बहिण "सबिना" ही माझ्याच वयाची असल्याने, त्यांचे तसे वागणे स्वाभाविकच होते.)"संस्कार" म्हणतात ते हेच, नाही का?! मी त्या आगत-स्वागताने क्षणभर हळवा झालो होतो.. असो!) मी, खालिदसोबत आत गेलो. तलतजी शांतपणे "सोफ्यामध्ये" मस्त रेलून बसले होते. सत्तरीतले "तलतजी"! चेहऱ्यावर विलक्षण तेज, सात्विक चेहरा! चेहऱ्यावर स्मितहास्य! माझ्या वडिलांच्या आसपासच्या वयाचे ते थोर गायक!.. मी आपसुकच नतमस्तक झालो!

त्यांनी मला.. "तू पत्रकार आहेस! ठीक! पण कुठे काम करतोस?.." मी "व्हीनस" या मातब्बर म्युझिक कंपनीमध्ये "ध्वनिमुद्रण अधिकारी" या पदावर कार्यरत असल्याचे समजताच, ते सावरून बसले! "स्टुडिओमध्ये बरेच बुजुर्ग संगीतकार, संयोजक, वादक येत असतील ना?.." मी "होय!" असे म्हणत "केरसी लॉर्ड, मनोहारी दादा, दिलीप नाईकजी, सर्व व्हायोलिन वादक, जवळजवळ सर्वच बुजुर्ग वादक मंडळी येत असतात असे सांगितले. अल्लारखा साहेब, संगीतकार रवी, जाकीरभाई, संगीतकार इक्बाल कुरेशीसाहेब, आनंदजीभाई अशी अनेक मंडळी आमच्या जुहू इथल्या या

स्टुडिओमध्ये कामासाठी किंवा बुजुर्ग संगीत संयोजकांना भेटण्यासाठी येत असतात, हे सांगताच त्यांची कळी खुलली!

तलतजीनी "खालिदला" इशारा केला. त्यांचा घरेलु नोकर आम्हां तिघांसाठी "लेमन टी" घेऊन आला. आता "खालिद" माझ्या शेजारी येऊन बसला. मुलाखत एकदाची सुरू झाली. आपली ही प्रदीर्घ "मुलाखत" दैनिक "सामना" च्या "फुलोरा" या पुरवणीमध्ये "कव्हर स्टोरी" म्हणून येणार असल्याचे समजताच.. तलतजी आनंदले! खालिदने त्याच्या संग्रहातील काही खास फोटो तत्परतेने मला दिले, हे विशेष!

"मैं बात करुंगा, तो ये खामोश रहेगी|
सीने से लगा लूंगा, तो ये कुछ न कहेंगी|
आराम वो क्या देगी, जो तडप न सकेंगी|
तस्वीर तेरी, दिल मेरा, बहला न सकेंगी|.."

"कमल दासगुप्ता" नावाचा कुणी संगीतकार, आणि "फैयाज हाश्मी" नावाचा कुणी शायर/गीतकार असेल याची (१९६० साली

जन्मलेल्या) माझ्या पिढीलाच नव्हे तर अनेकांना पुसटशी कल्पना नसतानाही, आम्ही केवळ त्यातल्या "तलतजी" यांच्या आवाजामुळे त्या गाण्याच्या प्रथमदर्शनीच प्रेमात पडलो. ("लव्ह ॲट फर्स्ट साईट" म्हणतात ना अगदी तस्संच!) तो स्वर "कानातून" थेट हृदयात तो कधी आपसुकच आणि अगदी सहजच सामावून गेला, हे आम्हाला कळलेच नाही!

मुळात १९६० च्या दशकात जन्मलेली माझी "पिढी"!

खरंतर आमचा लाडका "रेडिओ" आणि त्यावर येणारे "रेडिओ सिलोन" आणि त्यावरच्या "बिनाका गीतमाला" वगैरे संगीतमय कार्यक्रमातून सादर केले जाणारे "चित्रपट संगीत" यावरच पोसली गेली आहे. (भले त्या काळात आयुष्य अनेक गोष्टींनी लोकांना परेशान करणारं होतं! १९७१ हा "भारत - पाक" हा भयंकर युद्धाचा काळ होता! त्या काळात.. "रेशनवर" मिळणारे ते "तांदूळ, गहू.." (मिलो) आणि मुख्य म्हणजे ते भयंकर असे निम्नस्तरीय असे ते "पाम तेल, डालडा" अशा अनेक मनस्ताप देणाऱ्या गोष्टी, काही क्षण बाजूला ठेवता..) "रेडिओवर" येणारी गाणी हा खचितच एक मस्त असा, माझ्या पिढीसाठी तरी छानच आधार होता! आमचे पालक "अभ्यास करा!" या बाबतीत रोजच करवादायचे! (हल्ली काही शिक्षक "पेपर फोडतात" पण.. आमच्या काळात "शिक्षकच नव्हे तर आमचे

पालक.. आमचे "थोबाड" फोडायचे!" केवळ आम्ही "नीट" परीक्षा द्यावी! या हेतूने! बाप रे!!

रफी, किशोर आणि मुकेश यांच्या गाण्यांचे आमच्या "पिढीच्या" रसिकांमध्ये इतके "दिवाणे" आहोत ना, की बस रे बस्स! मग स्वतःच्या खास "पुस्तकात" या रसिकांनी, "तलत महमूद" यांना खास स्थान का दिले असेल बरं!

मला माहित आहे.! "रफी" आणि "मुकेश" तसेच अर्थातच "किशोर कुमार" यांचे अनेकजण मनापासून "फॅन" असतानाही, त्यांनी "तलत महमूद" यांना, आपल्या आवडत्या गायकांमध्ये अगदी महत्त्वाचे असे खास "स्थान" का दिले असावे?! सोचनेवाली बात हैं यार!



पहिल्यांदा तलतजी यांची प्रतिमा, का कुणास ठाऊक, "फिल्मी गायक" म्हणून नव्हे, तर जणू "भावगीत गायक"/"ग़जल गायक" म्हणूनच जनमानसात झाली. हेच पहा ना! अभिनेता "मोतीलाल" यांच्या तोंडी "सैगल" स्टाईलचं.. "दिल जलता है तो

जलने दे.." घेऊन मुकेशजी "पहली नजर" (१९४५) मधून इथे दाखल झाले. "जिद्दी" (१९४८) मधून "किशोरकुमार.."मरने की दुवायें क्यो मांगू.." हे गाणं गात समोरे आले. तर "मोहम्मद रफी", नौशादजींच्या संगीतातून "फौजी" लोकांचे बूट खाड खाड वाजवत "हिंदोस्ता के हम.." हे गाणं म्हणत "पहले आप" (१९४४) या चित्रपटातून आपल्या दृष्टिपथात आले.

तर.. तलतजी यांचं आगमन मात्र "गैरफिल्मी" गीतातून झालंय! एक गैरफिल्मी गाणं सांगायचं तर.. "सब दिन एक समान नहीं था" हे होते! जे त्यांनी १९४१ मध्ये गायले होते. आणि या पहिल्याच आविष्कारातून ते सर्वांची मने जिंकून गेले! १९४४ मध्ये गायलेले त्यांचे "तस्वीर तेरी दिल मेरा बहला ना सकेगी.." हे आणखी एक गैर-फिल्मी गाणे प्रचंड गाजले, ज्याने त्यांना घराघरात पोहोचवले! लक्षात घ्या! पार्श्वगायक म्हणून चित्रपटाच्या फिल्मी गाण्यातून.. अभिनेत्यांच्या तोंडी, मस्त सिच्युएशन, चांगल्या संगीत संयोजनाच्या जोरावर गाणं सादर होणे वेगळे! तिथले आकर्षक सेट्स, त्या नटाची लोकप्रियता आणि अभिनेत्याचा तो मस्त पहेराव याबरोबरोबरच "शूटिंग" या भांडवलावर गाणे सादर करणे सुद्धा वेगळे! "भावगीत" किंवा "गझल" गाऊन केवळ "ध्वनिमुद्रिके वरच" अमाप श्रवणसुख देत रसिकांची मने जिंकणे तसं कठीणच असतं, नाही का? तलतजी.. ही गैरफिल्मी गीते मोजक्या वाद्यवृंदाच्या साथीने संथ चालीत सादर करत असत. कधीकधी ते संगीतकार सुद्धा

अप्रसिद्ध किंवा चित्रपटातून कामे न मिळणारे सुद्धा असत. आपल्या मुलायम आणि मधाळ आवाजाच्या शिदोरीवर त्यांनी रसिकांची मने जिंकली, हे विशेष! सलाम तलतजीना!

मोहम्मद रफी यांच्यासारखी "रेंज" नाही त्यांच्या आवाजात! मुकेशजी यांच्या आवाजासारखी अनुनासिकता तर नाहीच नाही, "किशोरदा" सारखा हरहुन्नरीपणा नाही, किंवा "हेमंतदा" यांच्यासारखे गालात रसगुल्ले ठेवूनही गात नाहीत, तरीही तलतजी यांचा "स्वर" कानातून हृदयात कधी उतरला हे कळलेच नाही! फक्त एक कंपन! प्रेयसीच्या पहिल्या स्पर्शासारखे रसरशीत-उबदार - शाश्वत -जीवाभावाचं वाटणारे, काळजाला भिडणारे, जीव ओवाळून टाकावा असे वाटणारे! "गाणं" ही माणसाची सहजप्रवृत्ती असावी इतकं सोपं! आपल्या आवाजाला मर्यादा आहेत, हे त्यांना पूर्णपणे ठाऊक होतं.

"रेंज" बद्दल ऊहापोह करायचा तर मला तलतजी यांचं मोहम्मद रफीसाहेबांबरोबरचं एक मस्त गाणं आत्ता या क्षणी आठवतंय! चित्रपट होता "सुशिला" (१९६६)! संगीतकार होते "सी. अर्जुन"! शायर "जाँ निसार अख्तर" यांचे निहायतही खुबसुरत आणि प्रेरणादायी गीत "ग़म की अंधेरी रात में.." नक्की ऐका! ते आपले लाडके "तलतजी" आणि "मोहम्मद रफीजी" यांनी गायलेय! (का कुणास ठाऊक! पण दुर्दैवाने या गाण्याचा, आणि त्या संपूर्ण चित्रपटाचा "व्हिडिओ" मात्र उपलब्ध नाहीय!) ऑडिओ आहे! नक्की ऐका! यात "मोहम्मद रफी" त्यांच्या गोड आवाजाबरोबरच "रेंज" सुद्धा पुरेपूर सापडतेय, परंतु त्यासोबत येणारा "तलतजी" यांचा मखमली आवाज मनावर छान कोरीवकाम करतो! नक्की ऐका!

नौशादजी यांनी त्यांच्या आत्मचरित्रपर पुस्तकात तलतजी याच्या दोन गाण्यांवर ("दास्तान-ए-नौशाद, शब्दांकन : शशिकांतजी किणीकर) विस्ताराने ऊहापोह केला आहे. हे नक्कीच वाचनिय आहे!

नौशादजी यांनी तलत मेहमूदकडून 'कल रात जिंदगीसे मुलाकात हो गयी..' हे गाणं गाऊन घेतलं होतं. ते म्हणतात.. गाणं रेकॉर्ड झाल्यावर सर्वांनी माझं आणि तलतसाहेबांचं अभिनंदन करून गाणं आवडल्याचं सांगितलं होतं! 'बाबुल' नंतर खूप वर्षांनी मी, तलत आणि दिग्दर्शक सनी पुन्हा एकत्र आलो होतो. बाबुलप्रमाणेच पालकी 'हिट' होणार या भावनेने आम्ही सगळे काम करत होतो. सनीसाहेबांनी राजेंद्रकुमारवर ते गाणं चित्रितही केलं. नंतर अकस्मात

सनीसाहेब मरण पावले आणि महेश कौल हे दिग्दर्शक झाले. एके दिवशी निर्माते पूनमभाई, महेश कौल आणि राजेंद्रकुमार माझ्याकडे आले आणि सांगू लागले, की 'हे गाणं आपण महंमद रफी यांच्याकडून गाऊन घेऊया.' इतकं छान जमलेलं गाणं बदलायचं हे या लोकांना सुचतंय याचं मला खरंतर आश्चर्य वाटलं. मी म्हणालो, 'हे अशक्य आहे! एकतर या गाण्याचं चित्रिकरणही झालं आहे. शिवाय तलतचं गाणं काढून तिथे रफीचं घातलं, तर आपल्या तलतच्या कारकिर्दीवर त्याचा वाईट परिणाम होण्याचीही शक्यता आहे आणि लोक त्याबद्दल मलाच जबाबदार धरतील. पण निर्माते पूनमभाई ऐकायला तयार होईनात. माझा अगदी नाईलाज झाला तेव्हा रफीसाहेबांना बोलावलं. पण रफींनीही गाणं गायला नकार दिला. ते म्हणाले, 'तलतसाहेब मला सिनियर आहेत. त्यांचं गाणं मी गाणार नाही. दुसरं कोणतंही गाणं मला द्या.' अखेर त्या लोकांनी के. आसिफ यांना मध्यस्त बनवून त्यांच्या गळ्यात रफीला मनवण्याची जबाबदारी टाकली. आसिफ.. रफीशी काय बोलले कुणास ठाऊक, पण तब्बल सहा दिवसांनी रफी ते गाणं गायला तयार झाले. याबाबतीत मी तलत साहेबांना नाना परीने समजावलं, पण त्यांचं समाधान झालं नाही. ते माझ्यावर भलतेच नाराज झाले."

(पृ. २००-२०२, दास्ताने नौशाद. ")

आणखी एक उदाहरण सांगायचं तर दिलीप कुमार, मनोजकुमार यांचा "आदमी" (१९६८) हा चित्रपट आवर्जून आठवतोय. यात "मोहम्मद रफीजी" आणि "तलतजी" याचं हे मस्त "ड्युएट" सामोरं येतं. "कैसी हसीन आज बहारोंकी रात है..".. हे "आनंददायक" जॉनरचं गाणं प्रकाशित होताच रसिकांना आवडलेलं. पण का कुणास ठाऊक! निर्माते/अभिनेते मनोजकुमार हे "उपकार" (१९६७) नंतर तर "महेंद्र कपूरजी" यांच्या आवाजाच्या जणू प्रेमातच पडलेले की काय? त्यांनी दिग्दर्शक : ए. भीमसिंह यांच्याकडे.. हे गाणे "महेंद्र कपूरजी" यांच्या आवाजात पुन्हा करा, म्हणून जणू बालहट्टच धरलेला! ते खर्चिक होतंच, शिवाय आदरणीय ज्येष्ठ आणि जिनियस संगीतकार नौशादजी यांचे मन वळविण्यात, त्यांनी किती रक्त आटवले असेल, हे परमेश्वरच जाणे! पण त्यांनी ते करवून घेतलं, हे महत्त्वाचे!

"आदमी' चित्रपटातील गाण्याबाबतीतही असंच काही घडलेलं.. त्याविषयी नौशादजी सांगतात, "या चित्रपटासाठी मी तलत आणि रफी यांच्या आवाजात 'कैसी हसीन आज, बहारोंकी रात है..' हे गाणं रेकॉर्ड केलं होतं. फिल्म पूर्ण झाली आणि पार्श्वसंगीतावर काम करायला मी राजकमल स्टुडिओमध्ये सुरवात केली. एक दिवस अचानक निर्माते विरप्पा, वितरक नारी सिप्पी आणि अभिनेता मनोजकुमार हे माझ्याकडे आले. सिप्पी म्हणाले, 'मनोजची अशी इच्छा आहे, की तलतच्या आवाजात रेकॉर्ड केलेलं गाणं तुम्ही महेंद्र कपूरच्या आवाजात गाऊन घ्यावं आणि ते पुन्हा चित्रित करावं!' त्यांच्या या बोलण्याला मनोजकुमारनेही पुष्टी दिली. तो म्हणाला, 'महेंद्रचा आवाज माझ्या आवाजाशी जुळतो.' मी त्यांना अशी समस्या अकारण उभी करू नये म्हणून परोपरीने समजावलं. म्हटलं, 'यामुळे तलत नाराज होईल. त्याच्याविषयी अफवा उठतील आणि त्याच्या मार्केटवरही याचा परिणाम होईल.' तिथे ध्वनिमुद्रक मंगेश देसाई उपस्थित होते, त्यांनाही माझी बाजू पटली. पण ते लोक हट्टाला पेटले होते. त्यांनी करारातील एका अटीचं मला स्मरण करून दिलं. त्या अटीप्रमाणे निर्मात्याचा निर्णय अंतिम राहणार होता. म्हणून त्यांच्या इच्छेपुढे मला मान तुकवावी लागली. पण त्यामुळे तलतसाहेब इतके नाराज झाले, की आजपर्यंत त्यांचं मन माझ्याविषयी साफ झालेलं नाही. शिवाय तलतच्या असंख्य चाहत्यांनी माझ्यावर पत्रांचा भडीमार करून मला जाब विचारला, की 'तलतचा आवाज का बदलला?..' त्या सगळ्यांना उत्तरं देऊन देऊन मी अक्षरशः हैराण झालो. पण ना

त्यांचं समाधान झालं, ना तलतसाहेबांचं !" (पृ. २०५-२०७, दास्तान-ए-नौशाद!)

नौशादजींची ही कैफियत वाचल्यावर तलतजींवरील अन्यायात त्यांची काही चूक होती असं वाटत तरी नाही. नौशादजींच्या लागोपाठच्या तीन चित्रपटांत मुकेशजींची गाणी प्रचंड गाजूनही नौशादनी 'अंदाज' (१९४९) नंतर 'साथी' (१९६८) पर्यंत किमान १८ वर्षांच्या अवधीत रफीजींच्या प्रेमाखातर मुकेशजींला एकही गाणं दिलं नव्हतं. (ज्येष्ठ पत्रकारांच्या लेखातून सामोरं आलेलं सत्य म्हणजे.. "साथी" (१९६८) यातील संगीत हे पूर्णतः वेस्टर्न प्रकाराने प्रभावित आहे. सतत "शास्त्रीय संगीताची" कास धरणारे "नौशादजी" केवळ निर्मात्यांच्या अती आग्रहास्तव या प्रकाराकडे वळले, त्यांना वळावेच लागले, म्हणा ना! त्यांनी "संगीत संयोजक" म्हणून सुप्रसिद्ध "अरेंजर" असे "केरसी लॉर्ड" यांना गाठले. या चित्रपटातील सर्व गाणी ही बरीचशी "वेस्टर्न संगीत" प्रकारातली असल्याचं ठळकपणे जाणवतं. हा इम्पॅक्ट बहुदा १९६६च्या "तिसरी मंझील" च्या गाण्यांमुळे आला असावा हे मात्र नक्की! असो! "साथी" चित्रपटाची सर्व गाणी ऐका! आनंद घ्या, ही विनंती!)

पण नंतर मुद्दाम तलतजींना पाचारण करून दोन तीन चित्रपटांमध्ये त्यांनी भरपूर गाणी दिली होती. 'बाबुल' नंतर तलतजींना गाणी द्यायची नसती, तर त्यांनी त्यांनाही बोलावलं नसतं.

पण त्यांनी जर त्याला बोलावलं असेल आणि गाणी रेकॉर्ड करून ती चित्रितही झाली असतील, तर नौशादजींना दोष कसा देता येईल ?

याबाबतीत शिरीष कणेकरजी यांच्याशी बोलताना तलतजीनीही नौशादजीना दोष दिलेला नाही हे लक्षात घेणं गरजेचं आहे! तलतजी म्हणतात, "आवाज कसा पेश करायचा हे रेकॉर्डिस्टच्या हातात असतं. त्याने मनात आणलं तर एखाद्या सोन्यासारख्या आवाजाचा तो सत्यानाश करू शकतो किंवा सामान्य आवाजही तो चांगला भासवू शकतो. एकच उदाहरण सांगतो. नौशादजींच्या 'आदमी'तील 'कैसी हसीन रात बहारोंकी..' या महंमद रफीबरोबरच्या द्वंद्वगीतात माझा आवाज कमालीचा 'सॉफ्ट' रेकॉर्ड केला गेला होता. त्यामुळे गाण्याचा तोल जाईल असं मी, वारंवार सांगून पाहिलं. पण 'सीनमधील मनोजच्या मनःस्थितीला असाच आवाज हवा' असं मला सांगण्यात आलं. आणि विशेष म्हणजे मनोजला माझा आवाज खटकला! तो फारच सॉफ्ट असल्याचं सांगून चित्रपटात त्याने माझ्याजागी महेंद्र कपूरचा आवाज वापरला." (पृ. ७३, गाए चला जा!) म्हणजे याबाबतीत कुणाचा दोष असलाच, तर तो ध्वनिमुद्रक मंगेश देसाई यांचाच असला पाहिजे असा निष्कर्ष काढला गेला.

(पण नसतं राव! तर.. या संपूर्ण प्रकरणात जिनियस ज्येष्ठ व श्रेष्ठ ध्वनिमुद्रक सन्माननीय श्री. मंगेशजी देसाई यांच्याकडून चूक झालेली असावी का? तर नाही! का ते थोडसं सविस्तरपणे सांगतो!

मी "व्हीनस" या मातब्बर "म्युझिक कंपनी" मध्ये "ध्वनिमुद्रण अधिकारी" म्हणून सूत्रे हाती घेताच, पहिलं काम काय केलं असेल, तर आधी जिथं जिथं आमच्या कंपनीसाठी "गाणी" रेकॉर्ड होत, त्या प्रत्येक स्टुडिओच्या "मॉनिटर रुममध्ये" तिथल्या "रेकॉर्डिस्ट" मागच्या भागात, अंग चोरून का होईना पण शांतपणे बसून तो नेमकं काय काय करतो ते न्याहाळायचो! खूप शिकायला मिळायचं त्यातून! यातूनच अनेक गोष्टी माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या पदरात पडल्या, बरं का? "फिल्मी गाणी" रेकॉर्ड करणं हे खायचं काम नाही. आधी तर "सिंगल ट्रॅक" मोनो प्रकारातील ३५ एम.एम. ऑडिओ फिल्मवर "गाणी" रेकॉर्ड होत. हेही मी पाहिलंय! व अनुभवलेय ("मेहबूब स्टुडिओ"!) "साऊंड रेकॉर्डिंग" हे खचितच आव्हान असतं, यात तर शंकाच नाही. तर आपल्या चर्चेतल्या "मंगेश देसाईसाहेबांनी" काही चूक केली असेल का? तर अजिबात नाही, (हे मी या क्षेत्रात सलग तीन दशके कार्यरत होतो म्हणून छातीठोकपणे सांगतोय.) पण काहीही म्हणा अशी एखादी चूक अनवधानाने घडलीच, तर याबाबतीत हे "रेकॉर्डिंग इंजिनियर्स" साळसूदपणे आपले हात झटकतात, "आडात आहे, तेच पोहऱ्यात येणार ना!" असं थेट बोलत नाहीत, पण त्यांचा टोन त्याच प्रकारचा असतो, हे मी पाहिलेय! इथे संबंध नसला तरी सांगतोय. "गायक" म्हणून करिअर करण्याचे स्वप्न पाहणारा "कमाल खान" केवळ "सलमान खानच्या" शिफारशीमुळे गाणं गायला आमच्या स्टुडिओत आलेला! संगीतकार "हिमेश रेशमीया" याला त्याची ती ढवळाढवळ खरं तर आवडली नव्हती.

तुम्हाला आश्चर्य वाटेल. "कमाल खान" हा "रेग्युलर गायक" नव्हताच! संध्याकाळनंतरच माझा आवाज खुलतो असे सांगत तो रोज संध्याकाळी सात नंतर "डबिंगला" यायचा! "ओ ओ जान-ए-जाना.." हे गाणं तो मोजून आठ दिवस गात होता. कधी "हिमेश" तर कधी आपल्यावर खापर फोडलं जाऊ नये म्हणून "रेकॉर्डिस्ट" रिजेक्ट करायचे! दमछाक झालेली ती संगीतकार, संयोजक आणि अर्थातच आम्हां स्टुडिओ स्टाफची! तर दोष "रेकॉर्डिंग इंजिनियर्स"चाच असेल, हे मनातून काढून टाका! असो!

म्हणजेच इथल्या बाबतीत सांगायचं तर ती नक्कीच काहीतरी पळवाट काढली गेली असावी असं मला तरी "फ्रँकली" वाटतं. ती कुणाची "स्किप्ट" असेल, हे मात्र स्पटपणे उमगले नाही. यामध्ये जिनियस सन्मा. नौशादजी याचा सहभाग असण्याची सूतराम शक्यता मला तरी वाटत नाही! मात्र यात "तलतजी" यांच्याबद्दल कुणाचा तरी "आकस" किंवा आणखी काही "राजकारण", हे मात्र परमेश्वरच जाणे! पण हे तलतजींच्या हळव्या मनाला नकळत वेदना देणारं होतं, हे निश्चित!

(मित्रांनो.. "नौशादजी" यांचे एक वाचनीय असे एक आत्मचरित्रपर "पुस्तक" आहे! "दास्तान-ए-नौशाद", शब्दांकन : शशिकांतजी किणीकर! ते अतिशय सुंदररित्या सादर केलेले आहे यात शंकाच नाही. असो! पण मला इथे महत्त्वाचं सांगायचं तर.. मला त्यांची प्रत्यक्ष भेट घेता आली नव्हती, त्यात त्यांनी त्या "पुस्तकाच्या

बाहेरील" अनेक गोष्टी आपलेपणे अगदी बिनधास्त सांगितलेल्या! त्या सर्वच गोष्टी मी कधीच व कुठेही "उद्धृत" करणार नाही, हे मात्र नक्की! असो! परंतु त्यानंतर त्यांच्या खास आग्रहास्तव मी लिहिलेला तो संपूर्ण "लेख" त्यांना पूर्णतः वाचून दाखविल्यानंतरच म्हणजेच त्यांच्या एकंदर "संमतीनंतरच" मी तो लेख, ती "कव्हर स्टोरी", आमच्या "दैनिक सामना" च्या दर "शनिवारी" प्रकाशित होणाऱ्या "फुलोरा" या खास पुरवणीमध्ये एक माहितीपूर्ण "कव्हर स्टोरी" करण्याचे मला भाग्य लाभले, हे माझे सुदैव! "नौशादजी"! एक "जिनियस" परंतु मनाने अतिशय सज्जन, सालस, मनमिळाऊ, "इगो" नसलेले असे संगीतकार! मुख्य म्हणजे त्यांचा मुलगा "राजू नौशाद" हा माझ्या सुदैवाने, त्या पहिल्या भेटीतच जणू जिवाभावाचा "मित्र" झाला! असो! मी एक सर्वसामान्य पत्रकार/लेखक ! तर.. "फुलोरा" या "पुरवणीमध्ये" अनेक माझे गुरुतुल्य असे अनेक सन्माननीय लेखक असायचे. सहज उल्लेख करायचा तर सन्मा. श्री. शिरीष कणेकरसाहेब, अभय परांजपे, दिलीप ठाकूर, ज्ञानेश्वरजी नाडकर्णीसाहेब किती नवे सांगू!? ते गुरुतुल्य लेखक त्या त्या आठवड्याच्या "पुरवणीसाठी" दिलेल्या विषयावर अगदी भरभरून लिहायचे! आपापले "आठवणींचे रांजण" रिते करायचे! मुख्य म्हणजे ते लिहायचे ते माझ्यासारख्या नवोदित लेखकांसाठी अतिशय अभ्यासण्यासारखं असायचं! सॅल्युट! यातून मला खूप शिकायला मिळालं! असो! कृपया माझी "सन्माननीय नौशादसाहेब, मोहम्मद रफीसाहेब" ही दोन्ही "ई-बुक्स" अवश्य वाचा, पहा, आस्वाद घ्या!

त्यात दिलेल्या "लिंक्स" वर केवळ "क्लिक" करून ते आविष्कार आपल्या "स्मार्ट टीव्हीवर" पाहत अवश्य आस्वाद घ्या! ही नम्र विनंती!)

तर.. इथल्या या गायक बदलण्याच्या "कॉन्सेप्ट" वर त्या काळात अनेक "रसिकांनी" आवाज उठवला होता, असे ज्येष्ठ पत्रकारांबरोबरच्या गप्पांमधून सामोरं आलं. मला आठवतंय.. मी माझ्या "ध्वनिमुद्रण अधिकारी" या पदावर काम करत असताना, "रेकॉर्डिंग इंजिनियर्स" यांच्याबाबतीत बरचसं अभ्यासलंय! हे "तंत्रज्ञ" मुळात एक "कलावंत" असल्याने भले "मददगार" असतील पण मनाने ते अतिशय "हळवे, हट्टी किंवा आग्रही" तर नक्की असतातच. मला आठवतेय ते "उस्ताद नुसरत फतेह खान" यांनी आमच्या "धडकन" या चित्रपटासाठी गायलेले "दूल्हे का सेहरा.." हे गाणं. धर्मेंद्रच्या जुहू स्थित "सनी स्टुडिओ" मध्ये "रेकॉर्ड" झालेलं एक मस्त गीत! ("लिंक" पहा) "रेकॉर्डिंग इंजिनीयर" होते, ज्येष्ठ "श्री. सुरेश कथुरियाजी"!
सुदैवाने "२४ ट्रॅक डिजिटल रेकॉर्डिंग" ही सुविधा उपलब्ध झाली होती, हे विशेष!

याबाबत मला समजलेल्या माहितीनुसार हा नव्यानं उपलब्ध झालेला "मल्टिट्रॅक रेकॉर्डिंग कॉन्सोल" (मशीन) याचा वापर कसा करायचा, याचा "डेमो" देणाऱ्या त्या तथाकथित "परदेशी" इंजिनिअर याने त्या "मशीन" बाबत सर्व "निरक्षिरविवेक" शिकवले

होते. गंमत म्हणजे त्यानं "उस्ताद मेहदी हसन, उस्ताद गुलाम अली इतकेच नव्हे तर उस्ताद नुसरत फतेह अली खान यांचेही "व्हॉईस डबिंग" केलेले होते. हीच "शिदोरी" कदाचित आमचे लाडके "रेकॉर्डिंग इंजिनियर" सन्मा. सुरेश कथुरियाजी यांना उपयोगी पडली असावी, असे म्हणायला हरकत नाही. "लाईव्ह" सादरीकरण करणाऱ्या सन्माननीय "गायकांना" त्यांची सादरीकरणे.. ध्वनिमुद्रिकेसाठी (व नंतर अर्थातच फिल्मसाठी) सादर करणे, हे सोपे काम कसे असेल..? (मित्रांनो.. याबाबतीत तसेच "उस्ताद नुसरत फतेह अली खान" यांच्याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आपण माझे हे "ई-बुक" मात्र नक्की वाचा! ही नम्र विनंती!) तर.. म्हणूनच तोंडावर स्पष्टपणे सांगायचे तर या अमुक गाण्यातला गायक (म्हणजे "तलतजी" ऐवजी "महेंद्र कपूरजी" असे बदलणे, हे केवळ आणि केवळ, अभिनेता "मनोज कुमार" यांचाच "हट्ट" असावा, माझे स्पष्ट मत आहे! यात सन्मा. श्री. मंगेशजी देसाई यांचा काडीमात्रही संबंध नाही, हे माझं अगदी स्पष्ट मत आहे. या प्रकारामुळे "मनोज कुमार" यांना काहीच फरक पडला नाही हो! परंतु केवळ याच कारणामुळे आपल्या लाडक्या "तलतजी" यांच्या एकंदर कलाकिर्दीवर परिणाम झाला नसेल का? झालाच असेल! हा प्रश्न मात्र आजही अनुत्तरित आहे. ही आणि अशी आग हेतपुरस्सर लावली जाते. हा इतिहास आहे! आम्ही तर सर्वसामान्य पत्रकार आहोत!

असो! आपल्या सुदैवाने "आदमी" चित्रपटातील ती दोन्ही "व्हर्जनस" आज "यू-ट्यूबवर" उपलब्ध आहेत. ("यू ट्यूब".. थोर तुझे उपकार!) फ्रँकली सांगायचं तर त्या काळातल्या रसिकांना "मोहम्मद रफी - तलत" हे "व्हर्जन" जास्त आवडलेलं, असं त्या काळातले ज्येष्ठ समीक्षक आवर्जून सांगायचे! "हकीकत" (१९६४) या आपल्या मनावर खूप खोलवर रुजलेल्या चित्रपटातील "होके मजबूर मुझे उसने भुलाया होगा.." या एका खास गाण्यात रफी, मन्नादा, भूपेंद्र सिंह यांच्यासोबत आपले "तलतजी" सुद्धा होते बरं! पण ते गाणे त्या चित्रपटातील एका अमुक खास अशा "सिच्युएशन" वर बेतलेले असल्याने ते आता अधोरेखित करण्यात अर्थ नाही, इतकेच! पण ते गाणे आपल्या काळजाला अतिशय भिडणारे होते, यात शंकाच नाही! सर्व गायकांना अगदी मनःपूर्वक कुर्निसात! कारण माझ्या पिढीला (म्हणजे १९६० च्या आसपास जन्मलेले आम्ही सर्वच!) यांच्यासाठी ते "गाणे" अगदी आमच्या काळजाला भिडणारे होते. आम्ही खूप लहान होतो, परंतु ते "रेडिओवर" ऐकताना अनाहूतपणे अचानक एक हुंदका दाटायचा!

मला आत्ता या क्षणी, तो दिवस अगदी कालच घडल्यासारखा आठवतोय! "तलत साहेबांची" ती मुलाखत आठवतेय! वांद्र्याच्या त्यांच्या "सनबिम अपार्टमेंटमधल्या" त्यांच्या घरात घेतलेली! ते वयोमानानुसार काहीसे अडखळत पण शांतपणे बोलत होते. मी एकीकडे ऐकत होतो आणि "डिक्टेशन" घेतात तसे झरझर लिहितही होतो. ते कधी आठवण्याचा प्रयत्न करत. जर हिंदीतल्या वाक्याची सहजच जुळवाजुळव जमली नाही तर ते अस्खलित "इंग्रजीत" ती आठवण सांगत. त्याक्षणी "खालिद" अगदी आपलेपणाने अधिकचं सांगायचा! मध्येच त्या आठवणीतले काही किस्से सांगायचा. सगळं कसं शांत, निर्मळ, डायरेक्ट काळजातून आल्यासारखं! त्यात गर्व नाही की अभिमान! फिल्मी रुबाबाचा तर अजिबात मागमूसही नाही. "मखमली" आवाजाची एक मस्त "गझल" आपल्याशी साक्षात गप्पा मारतेय ही कल्पनाच किती रोमांचक असेल ना!

तलतजी यांची "जन्मतारीख" कोणती? तर तरुण मुलं "व्हॅलेंटाईन डे" साजरा करतात ना! त्यापासून मोजून दहाव्या दिवसाची! २४ फेब्रुवारी, १९२४! "लखनौ" मधल्या एका सधन कुटुंबातला जन्म! (पुण्यासारखंच) "विद्येचं माहेरघर" म्हणावं अशा "लखनौ" मध्ये लहानपण म्हणता त्यांना साहित्य आणि कला यांचं जणू बाळकडू मिळालं. तलतजी यांना सुदैवाने लहानपणापासूनच दिग्गजांच्या "मैफली" ऐकायचं भाग्य लाभलं. लखनौसारख्या शहरात एका संपन्न, सुसंस्कृत, साहित्यप्रेमी कुटुंबात या गायकाचा जन्म झाला

आणि या शहराच्या वैशिष्ट्यांचा तलतजीच्या एकूणच सगळ्या व्यक्तिमत्वावर जबरदस्त परिणाम झाल्याचे समजते. वास्तविक, या कुटुंबात संगीताकडे फार विशेष कौतुकाने बघितले जात नसे, किंबहुना काहीशी तुच्छताच असायची परंतु तलतजींच्या मावशीने म्हणजे "मेहला बेगम"ने या मुलाची आवड ओळखली आणि "मॉरिस संगीत विद्यालयात" नाव दाखल करून, शास्त्रोक्त संगीताच्या शिक्षणाची सुरवात करून दिली.

माझ्या वाचनात आल्यानुसार व प्रत्यक्ष मुलाखतीतून पुढे आणखी गोष्टी समजल्या. (काही गोष्टी ओघाओघात लेकरागत प्रेम करणाऱ्या येतीलही, हे लक्षात घ्या ही नम्र विनंती.) सोलापूरचे एक सुप्रसिद्ध ज्येष्ठ लेखक सन्मा. माधव मोहोळकरसाहेब हे तलतजींचे मोठे चाहते होते. तलतजींना ते नेहमी भेटत असत. त्यांच्या सांगण्यानुसार तलतजी हे लखनौच्या "मंझूर महमूद" नामक व्यापाऱ्याचे सुपुत्र! मंझूर महमूद हजारो लोकांच्या सभेत, आपल्या बुलंद आवाजात 'सारे जहाँ से अच्छा, हिंदोस्तां हमारा..' हे इकबालचं गाणं गायचे तेव्हा त्यांना माईकची गरज भासायची नाही! आवाजाचा वारसा मंझूरजी त्यांच्याकडूनच तलतजींना वारसाहक्काने लाभला होता. मात्र तलतजींनी गाण्यामध्येच करियर करावं हे मात्र त्यांना मान्य नव्हतं. तलतजी हे वास्तविक विज्ञानाचे विद्यार्थी! इंटर सायन्सची परीक्षा दिल्यावर ते कलकत्त्याला गेले. आणि त्यांचं पुढील शिक्षण राहून गेलं! गंमत म्हणजे एखाद्या गायकापेक्षा, चांगले व्यक्तिमत्व

लाभलेले तलतजी गायकनट/ अभिनेता म्हणून ते जास्त शोभतील असे वाटणे स्वाभाविकच होते. म्हणूनच की काय! ते गोरेगोमटे आणि हॅन्डसम असे तलतजी 'न्यू थिएटर्स' चे दिग्दर्शक प्रथमेश बारुआ यांना पसंत पडले होते! स्वतः तलतजींनीही 'ऑल इंडिया रेडिओ'वर विजय चौधरी यांनी घेतलेल्या मुलाखतीत हे कबूल केलं आहे! ते तिथे म्हणालेत.. "आमच्या घरात संगीताची तर अजिबात पार्श्वभूमी नव्हती. पण आम्हा सर्वच भावंडांचे आवाज चांगले होते. आम्ही त्या काळातील अनेक गाणीही बऱ्यापैकी गात होतो. पुढे माझ्या शाळकरी वयात माझ्या ऐकण्यात सैगल साहेबांचं गाणं आलं आणि अगदी मनापासून सांगतो मी खूपच प्रभावित झालो! 'सैगल' यांच्यासारखा गायक पूर्वी कधी झाला नाही आणि यापुढेही कधी होईल असं वाटत नाही. मी आजही त्यांचा भक्त आहे! आज जे काही मी गाऊ आणि वाजवू शकतोय ते केवळ आणि केवळ त्यांच्यामुळेच! "विविध भारतीच्या 'रेणू बन्सलने घेतलेली मुलाखत' सुद्धा 'यु-ट्यूब' वर आहे!' ('लिंक' पहा.) त्यात तलतजी सांगतात.. माझ्या वडिलांचा मी गाणं शिकायला विरोध होता. पण माझी एक मावशी संगीताची फार शौकीन होती. तिने माझ्या वडिलांना सांगितलं की 'फार सुंदर आवाज आहे याचा. याला गाणं शिकू दे.' तेव्हा माझ्या वडिलांचा नाईलाज झाला आणि मला गायला परवानगी मिळाली..."

वयाच्या सोळाव्या वर्षी सर्वात प्रथम सुप्रसिद्ध संगीतकार कमल दास गुप्ता यांच्याकडे गायन केले! "बन जाऊंगा क्या से

क्या!!.." या गाण्यामुळे लोकांचे लक्ष तलतजींकडे वळले. नंतर "तलत" हे नाव सगळीकडे होऊ लागलं. झाले! आणि प्रथमच त्यांना लोकप्रियतेचा खरा अनुभव घेता आला!

तलतजींच्या घरातून, मुख्यत्वे त्यांच्या अब्बाजानकडून "गाणे गाण्याला विरोध" होता खरा! तो सैगलचा "फॅन" आहे हे ठीक, परंतु त्याने आपले करिअर म्हणून "गायन क्षेत्र" निवडावे याचा त्यांना मनस्वी राग होता! गाणे-बजावणें, शेरोशायरी करणे, मुशायरा आणि तवायफ असलेल्या या शहरात आपलं "देखणं" आणि "मासूम" पोरगं हाताबाहेर जाईल की काय याची त्यांना धास्ती होती!

तर काका.. "छानी जो खाक हमने उस बूत की.." ही स्वतःच्या आवडती गझल शिकवण्यात मशगूल आणि मसरूफ! सुदैवाने काही दिवसातच तलतजीना "लखनौ रेडिओवर" गायची संधी मिळाली. तलतजी यांच्या आवाजावर आणि त्यांच्या एकूणच सादरीकरणावर "सैगल" यांचा बराचसा प्रभाव होता, हे सर्वांना खूपच जाणवलेलं, परंतु त्यांच्या आवाजातील ते "खास" असे "कंपन" रसिकांच्या मनाला अत्यंत भावले होते! (याचा दृश्य परिणाम म्हणून की काय.. आपली पुढे "मराठी भावगीत गायक" म्हणून करिअर बनण्याआधी "उर्दू गझल" सादर करणारे आपले लाडके "सन्मा. अरुणजी दातेसाहेब" यांच्या मराठीमधील भावगीतातील त्यांच्या आवाजावर तत्कालीन काही अमुक लेखकांनी अनेकदा उगीचच ताशेरे ओढले होते. पण हजारो रसिकांच्या पसंतीमुळेच तो स्वर.. कानातून हृदयात

कधी उतरला ते कळलेच नाही! पितृतुल्य सन्मा. अरुण दातेजींना "मराठीतील "तलत महमूद" उगीच म्हणत नाहीत"! असो!! तर.. त्या "तलम, कोवळ्या आणि थरथरत्या स्वराचा दरवळ मातब्बर "एच. एम. व्ही." कडे पोहोचतच त्यांनी "पी. के. सेन." नामक म्युझिक इंडस्ट्रीतील "टॅलेंट" शोधणाऱ्या एका "स्काऊट तर्फे" तलतजी यांना तात्काळ पाचारण केलं!

मध्यंतरीच्या काळात तलतजी यांनी आपल्या "अब्बाजान" यांच्या विरोधाकडे अगदी हिंमतीने काणाडोळा करत.. केवळ "काकांच्या" प्रोत्साहनामुळेच "भातखंडे" यांच्या "मॉरिस संगीत विद्यालयात" संगीताचं "साग्रसंगीत असं संगीतशिक्षण" घेतलं होतंच! "एच. एम. व्ही." या तत्कालीन मातब्बर "म्यूझिक कंपनी" ने त्यांना "कलकत्त्याला" येण्याचा प्रस्ताव दिला होता. खवळले अब्बाजान! शेवटी "तलतजी" यांच्यावर आपल्या लेकरागत प्रेम करणाऱ्या त्यांच्या "मावशीने".. शेवटी त्यांच्या कलकत्त्याच्या काकांकडे कैफियत मांडली! (हे मी आधी सुद्धा लिहिले आहे हे, तुम्ही जाणताच!)

तलतजींच्या तरुणपणाबद्दल अनेक ज्येष्ठ लेखकांनी लिहिलेले काही इथे उद्धृत करतोय. यात "तलतजी" यांचे "अवमूल्यन" करण्याचा माझा हेतू नाही. हक्क सुद्धा नाही! सन्मा. शिरीष कणेकरसाहेब तलतजी यांचे मनोमन चाहते होते तसेच त्यांच्यात

"दोस्तांना" सुद्धा होता, हे त्यांच्या लेखातून स्पष्ट होते. हा दोस्ताना त्या दोघांनी कायमच निभावला होता, हे विशेष!

"१९५० च्या दशकातील गायकांचा विचार करताना मला आणखी एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं. त्या दशकात मुकेश, रफी आणि तलत हे गायक म्हणून प्रसिद्धीच्या शिखरावर पोहचले होते. पण या तिघांचं वैशिष्ट्य म्हणजे हे तिघेही कायम सभ्य, सज्जन, अजातशत्रू आणि चारित्र्यवानच राहिले. त्यांचे कधी कुणाशी वाद झाले नाहीत, की त्यांनी कधी कुणाला दुखावलं नाही. (आपल्या रफीसाहेबांचा लतादीदींबरौबर वाद झाला होता, ही अप्रिय घटना वगळता !) कुठल्याही गॉसिपमध्ये त्यांनी कधी भाग घेतला नाही. स्वतःच्या पत्नीशीही ते एकनिष्ठ होते.

फार आधी म्हणजे तलतजी कलकत्त्यात असताना 'लतिका मलिक' या बंगाली ख्रिश्चन नटीशी त्यांचे प्रेमसंबंध जुळले होते, असं वाचनात आले आहे. २० फेब्रुवारी १९५१ रोजी त्या दोघांनी विवाह केला. दोघांच्याही आईवडिलांचा प्रथम या आंतरधर्मीय विवाहाला विरोध होता, पण लवकरच तो मावळला. लग्नानंतर मुसलमान धर्म स्वीकारून लतिका ही 'नसरीन महमूद' बनली. कालांतराने दोघांना १९५३ मध्ये 'खालिद' हा मुलगा आणि १९५९ मध्ये 'सबिना' ही मुलगी झाली.

सिगारेट वगळता तलतजींना अन्य कोणतंही व्यसन नव्हतं. 'स्टेट एक्स्प्रेस' ही त्याची आवडती सिगारेट! बोलताना, पेटी

वाजवताना आणि खाजगीत गाताना अनेकदा ती त्याच्या बोटात असे. याला अनुलक्षून प्रसिद्ध सिनेपत्रकार शिरीष कणेकरजी यांनी “दिवसाला साधारण किती सिगारेट होतात?” असं एकदा तलतजींना विचारलं.

“होतात साधारणपणे पंचवीस तीस!” तलतजी म्हणाले...

“त्यामुळे आवाजावर काही दुष्परिणाम ?”

“अं.. नाही! मात्र तेलकट, तिखट फारसं खात नाही. थंड पदार्थ आणि पेयही मी सहसा टाळतो. गोड पदार्थ मात्र मला आवडतात.” (पृ. ७१, गाए चला जा.)

एकूण स्वभाव आणि आवाज याला साजेशी अशीच तलतजींची खाण्यापिण्याचीही आवड होती असं दिसतं. त्या काळातील सर्वच गायकांप्रमाणे तलतजी सुद्धा सैगलचे दिवाणे होते. याबाबतीत "ऑल इंडिया रेडिओ" च्या एका मुलाखतीत झालेला संवाद असा...

“सैगल साहेबांच्या गाण्यातून तुम्ही काय घेतलंत ?”

“खूप गोष्टी घेतल्या. पाहिलं म्हणजे मुलायमपणा! शिवाय भाव अभिव्यक्ती. आणि उच्चार! उदाहरणार्थ ‘सो जा राजकुमारी..’ हे गाणं घ्या. शाळकरी वयात त्यांची ही अशी गाणी ऐकायचा मला नादच लागला होता...”

“मग तुम्ही त्यांची गाणी गुणगुणत असाल ?”

“हो हो. त्यांचीच गाणी मी नेहमी गात असे !”

“पण मग तुम्ही कधी शास्त्रीय संगीत वगैरे शिकलात का ?”

“शास्त्रोक्त असं नाही, पण लखनौच्याच मॉरिस कॉलेजमध्ये..”

“भातखंड्यांच्या ?”

“होय. भातखंड्यांच्या मॉरिस कॉलेजमध्ये मी तीन वर्षं गाणं शिकलो!”

“मग तुम्हाला जाहीरपणे गायची पहिली संधी कुठे मिळाली ?”

“या तुमच्या ऑल इंडिया रेडिओमुळेच मला पहिली संधी मिळाली. आणि त्याबद्दल खरोखरच मी ऑल इंडिया रेडिओचा कृतज्ञ आहे.”

“पहिलं गाणं कुठलं गायलात, काही आठवतंय ?”

“अं.. हो! ती एक गझल होती. ‘छानी जो खाक हमने, उस बुतके रेहगुजर में’ असे काहीतरी शब्द होते. बऱ्यापैकी गाजली ही गझल त्याकाळी. १९३९ सालची गोष्ट आहे...”

“आणि मग फिल्मी संगीतात कधी आलात ?”

“खूप उशिरा आलो. म्हणजे झालं असं, की १९४१ साली ‘एच.एम.व्ही.’चे काही अधिकारी नव्या गायकाच्या शोधात ऑल इंडिया रेडिओच्या लखनौच्या ऑफिसात आले; तेव्हा त्यांना माझं नांव सुचवलं गेलं. त्यांनी माझ्याशी तीन गाण्यांचा करार केला. त्या

करारापप्रमाणे मला कलकत्त्याला जाऊन तीन गाणी रेकॉर्ड करायची होती. कारण कलकत्त्यातील डमडमशिवाय भारतात तेव्हा अन्य कुठेही गाणी रेकॉर्ड होऊ शकत नव्हती. मग मी डमडमला गेलो आणि ती तीन गाणी गायिली..."

"ती तीन गाणी कुठली ?"

"सांगतो! पाहिलं गाणं होतं, 'सब दिन एक समान नही था..." (मग इथे या गाण्याची रेकॉर्ड लावण्यात येते.)

"वा, फार सुंदर! पण तुमच्या या गाण्यावर तर सैगलसाहेबांची छाप दिसतेय."

"खरं आहे."

"तुम्ही बंगाली गाणीही गायली आहेत ना ?"

"खूप! खूप म्हणजे खूपच! आणि माझ्या हिंदी गाण्यांप्रमाणेच तीही फार लोकप्रिय होती. त्यासाठी मला 'तपनकुमार' हे नांव देण्यात आलं होतं. याच नांवाने माझ्या पहिल्या काही हिंदी गाण्यांच्या रेकॉर्डस्ही आहेत."

"अच्छा. पण तुम्ही सुप्रसिद्ध 'न्यू थिएटर्स'मध्येही नोकरीला होतात ना ?"

"होय. १९४५ मध्ये मी 'न्यू थिएटर्स' मध्ये आलो. म्हणजे झालं असं, की १९४१ साली जेव्हा माझी गैरफिल्मी गाणी एच.एम.व्ही.ने रेकॉर्ड केली होती, त्यावेळी बुजुर्ग संगीतकार पंकज मलिक हेही काही

कारणाने त्या स्टुडिओत हजर होते. माझं गाणं ऐकून त्यांनी ताबडतोब मला कलकत्त्याला येण्याची सूचना केली. मी 'होय' म्हटलं पण लगेच जाणं मला शक्य झालं नाही. मी लखनौला परत गेलो. काही काळ असाच गेला. पुढे १९४४ साली पंकज मलिक यांच्याशी संपर्क साधून १९४५ च्या सुरुवातीला मी कलकत्त्याला गेलो."

"मग सैगल साहेब तिथे भेटले का ?"

"अर्थातच! मी नेहमीच त्यांना भेटत होतो आणि त्यांची गाणीही ऐकत होतो."

"पण मग सैगल यांच्यासारखा मोहरा तिथे असताना तुमच्यासारख्या नवशिक्या गायकाला संधी मिळणं अशक्यच होतं !"

"छे छे ! सैगल साहेब म्हणजे एक देवदूतच होते. ते मला प्रोत्साहन देत असत आणि आवर्जून माझी शिफारस करत असत. त्यामुळे गाणी मिळायला मला अजिबात अडचण आली नाही. पण मुख्य समस्या अशी होती की त्या काळात 'प्ले बॅक सिंगिंग' हा प्रकार

तितकासा रूळला नव्हता! हे तुम्ही जाणताच!“ (मित्रांनो, इथे एक "पॉझ" घेऊया.. आणि काही गोष्टींवर मस्त "ऊहापोह" करूया.. "एन्जॉय"!!.. आपल्या हिंदी चित्रपटातील "पार्श्वगायन" नेमकं कधी आलं? याबाबतीत नवीन पिढीला कळावे, म्हणून ती गोष्ट थोडीशी विस्ताराने सांगणे गरजेचे आहे! भारतीय चित्रपटसृष्टीत 'पार्श्वगायन' (Playback Singing) ही संकल्पना खरं तर १९३५ च्या सुमारास 'न्यू थिएटर्स'च्या 'धूपछाँव' या हिंदी चित्रपटातून दिग्दर्शक 'नितीन बोस' यांनी प्रथमत: आणली! आणि संगीतकार 'रायचंद बोराल' यांनी सर्वप्रथम पेश केली. (ही मूळ कल्पना मात्र ‘मुकुल बोस’ यांची होती, हे मात्र अतिशय महत्त्वाचं!). यापूर्वी आपल्या हिंदी चित्रपटात काम करणाऱ्या अभिनेत्यांना स्वत:ची गाणी, स्वत:च गावी लागत असत. देखणं रूप, राजबिंडं-दणकट देहयष्टी, अभिनय सुद्धा जमतोय असे अनेक तरूण सामोरे यायचे, तर आरस्पानी सौदर्य अशा तरूणी समोर दिसायच्या, पण गाण्याचं अंग शून्य म्हणता, नायक/नायिकेची भूमिका त्यांना कशी द्यायची हा यक्षप्रश्न होताच! एखाद्या चित्रपटाचे मुख्य नायक किंवा सहनायक, खलनायक असलेले "दारा सिंग, रंधावा, अजित, प्राण" असे अभिनेते.. चक्क स्वत:च्या आवाजात.. स्वत:वर "चित्रित" होणारी "गाणी" स्वत:च्या आवाजात गाताहेत, ही कल्पना केवळ "स्वप्नरंजन" म्हणून पहा! बाप रे! तर या.. पार्श्वगायनाची सुरुवात नेमकी कधी झाली? पडद्यावर अभिनय करणारा कलाकार वेगळा आणि गाणारा गायक वेगळा, हे तंत्र सर्वप्रथम कधी आलं? तर थेट १९३५ मध्ये हिंदी चित्रपटात ते

पहिल्यांदा आले! पहिला मराठी पार्श्वगायनपट कोणता असेल? तर.. पार्श्वगीतांचा समावेश असलेला पहिला मराठी चित्रपट होता.. 'प्रेमवीर' (१९३७) हा मानला जातो! सुरुवातीच्या काळात अभिनेत्यांना स्वतःचे गाणे स्वतःच गावे लागे, परंतु पुढे पार्श्वगायनामुळे गायकांची एक स्वतंत्र अशी परंपरा निर्माण झाली. मात्र ही गोष्ट लगेचच रुळली नाही! 'पार्श्वगायन' ही संकल्पना आली खरी पण सुरुवातीच्या काळात त्यात अनेक गंमती-जंमती सुद्धा होत असतं बरं! कारण अनेक अभिनेत्यामध्ये गाण्याचं अंग तर अजिबात नसायचं तसंच तो "गायन/संगीत" याविषयी अनेकदा अनभिज्ञ असायचाच. "अक्टिंग" वेगळी! "गाणं प्रत्यक्ष गाणे वेगळे..." (अभिनेता "धर्मेंद्र" पियानोवर बसलाय, पण तो "पियानोशी" कसा खेळतोय पहा! तो खाजवतोय की वाजवतोय (कठीण आहे! असो!) एखाद्या चित्रपटाचे मुख्य नायक किंवा सहनायक, खलनायक असलेले "दारा सिंग, रंधावा, अजित, प्राण" असे अभिनेते.. चक्क स्वतःच्या आवाजात.. स्वतःवर "चित्रित" होणारी "गाणी" स्वतःच्या आवाजात गाताहेत, ही कल्पना केवळ "स्वप्नरंजन" म्हणून पहा! बाप रे! येस.. इथे मी "सन्माननीय दिलीप कुमार साहेबांबद्दल आदरपूर्वक सांगतोय!" तुम्हाला "मधुबन में राधिका नाचे रे..!" हे गाणं आठवतंय ना? यात तो नायक (दिलीप कुमार) "सतार" वाजवताना स्पष्टपणे दिसतंय! एखाद्या "अभिनेत्याने" आपल्या "अंगभूत अभिनयाने" ते सहज तारून नेलं असतं! पण नाही! बुजुर्ग लेखकांनी लिहून ठेवलेले दस्तऐवज तपासता त्या अभिनयासाठी "दिलीप कुमार" यांनी एका

"बुजुर्ग" सतारवादकाकडून त्या अमुक "टिपिकल" वादनासाठी "टिप्स" घेतल्या होत्या. तो खास भाग नेमका कसा वाजवायचा याचा सखोल अभ्यास नक्कीच केला होता. यात शंकाच नाही. (इथे केवळ गंमत म्हणून आमच्याच "व्हीनस" कंपनीचा हा "व्हिडिओ" पहा! तबलजीची "करामत" तर नक्की पहा. एखाद्या सादरीकरणाचा अभ्यास किती गरजेचा असतो, हे दिसेल.

(नक्की पहा! सहन करा, ही नम्र विनंती!) बाय द वे..! यात त्या कंपनीच्या निर्मात्यांचा वगैरे अजिबात दोष नाहीय! का? केवळ आमच्या म्युझिक कंपनीत "व्हिडिओ अल्बम" बनवून स्वतःची "कमाई" करण्याच्या मानसिकतेतून, असले हे भाडखाऊ "कंत्राटदार", हे स्वयंघोषित आणि फालतु म्हणावे असे अनेक दिग्दर्शक असली भयंकर कलाकृती" सादर करत असत, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. वाईट वाटतं! त्या प्रकारच्या व्यक्तीच्या मूर्खपणाचे हे स्पष्ट सादरीकरण आहे. हे निश्चित ! "सन्मा. पं. सुरेशजी" यांनी माझ्याशी खाजगीत बोलताना यावर स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली होती, हे विशेष! मात्र हे भयंकर आहे! असो!)

मात्र गानकोकिळा लताजी मंगेशकर यांनी त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षी १९४२ मध्ये 'पहिली मंगळागौर' या मराठी चित्रपटासाठी 'नटली चैत्राची नवलाई..' हे गाणे गायले होते. यानंतरच्या गायकांची समृद्ध परंपरा पाहायची झाली तर त्यानंतरच्या काळात आशा भोसले, महेंद्र कपूर, किशोर कुमार, आणि मोहम्मद रफी यांसारख्या दिग्गज

गायकांनी हिंदीसोबतच अनेक मराठी चित्रपटांमध्येही अजरामर गाणी गायली आहेत. सिनेमाच्या पडद्यामागून, गाणे गाण्याच्या या तंत्रामुळे कलाकारांना फायदा इतकाच झाला. अभिनय करणाऱ्या व्यक्तीला केवळ अभिनयावर लक्ष केंद्रित करणे सहज शक्य झाले आणि भारतीय चित्रपट संगीताला एक नवा सुवर्णकाळ मिळाला! या "पार्श्वगायनातून" त्या सुरुवातीच्या काळात घडलेल्या गंमती सांगायच्या तर तुम्ही ती.. अभिनेत्यांची उडणारी भंबेरी प्रत्यक्ष अनुभवा.. त्यासाठी "आगा" या "नटावर" चित्रित झालेलं "फूल गेंदवा न मारो.." ('नितीन बोस' यांच्या दिग्दर्शनातील चित्रपट : "दूज का चांद" (१९६४) यातील हे गाणं नक्की पहा, ही विनंती!)

तर.. त्या अमुक काळात अभिनय करणाराच गाणी म्हणत असे! (मित्रांनो.. इथे एक खास गोष्ट सांगतोय! आमच्या ज्येष्ठ पत्रकारांनी आमच्या गप्पांमधून, त्यांच्या काही आठवणी सांगताना.. १९३६ च्या "अछूत कन्या" या चित्रपटातील "मैं बन का पंछी बन के बन बन.." या गाण्याच्या मस्त आठवणी सांगितलेल्या! त्या माझ्या

वयोमानानुसार तरी मला, थक्क करणाऱ्या होत्या! "दादामुनी" (अशोककुमारजी) आणि "देविका राणी" यांच्यावर हे गाणं चित्रित होणार होतं. भरपूर "रिहर्सल" झालीच होती. मुख्य "चित्रिकरणाच्या वेळी" तर भयंकर टेन्शन होते. अशोककुमार, देविका राणी तर मनोमन धास्तावलेलेच होते म्हणाना. (ते स्पष्ट दिसतेय!) तर त्यांच्या गायनाचा आवाज रेकॉर्ड करण्यासाठी त्या "सीनमध्ये' चक्क झाडाच्या फांदीवर "बूम" (माईक) लटकत ठेवला गेला होता. सर्व वादक झाडाच्या आड कॅमेऱ्याच्या फ्रेममध्ये येणार नाहीत, ही काळजी घेत, लपले होते! गाण्याच्या नेमका "सूर" मिळावा म्हणून "हार्मोनियम" तसेच "साँग व्हायोलिन" जरा व काहिसे लाऊडच वाजवले गेले आहे!

मुख्य म्हणजे या गाण्याचे "चित्रिकरण" केवळ "नायक - नायिका".. एका झाडाच्या "फांदीजवळ उभे राहून, किंवा फांदीवर बसून गातात"

इतकेच दाखवले आहे. ("सेफ साईड" असेल यार! पण मी अतिशय भांबावलेलो, हे समजून घ्या!) एका जुन्या चित्रपटात कुठल्याश्या गाण्यात की काय.. त्या गाण्यातील "नायक - नायिका" गाताहेत आणि त्यांच्या सोबत वादक मंडळी त्यांच्या मागे मागे त्यांना फॉलो करत "सूर ताल" देताहेत, असं एक चित्रण असल्याचं आठवतंय! परंतु दुर्दैवाने ते आत्ता सापडत नाहीय! असो! आणि.. तलतजी पुढे म्हणाले की..

"यावरून मला एकच सांगायचंय की मला तर कॅमेऱ्याची फार भीती वाटत असे! जरी पुढल्या काळात मी मारून मुटकून काही चित्रटपटांमध्ये नायकाचं काम केलं असलं, तरी मला ते कधी जमलं नसतं, हे मात्र नक्की!. ऍक्टिंगसे मुझे आजही सख्त नफरत है!" अर्थात तलतजीची ही पश्चात बुद्धी (After Thought) होती. ते स्वतः दिसायला उंच, गोरागोमटे आणि देखणे होते! त्यामुळे आपणही सैगलप्रमाणे गायक-नट व्हावं अशी महत्वाकांक्षा स्वाभाविकपणे त्यांच्या मनात जागी झाली असावी, यात शंकाच नाही. त्याविषयी विविध भारतीच्या मुलाखतीत बोलताना तलतजी सांगतात.. “मै सैगलका दिवाना था! १९४४ मध्ये सैगलच्या ‘माय सिस्टर’चं चित्रिकरण चालू होतं तेव्हा मी सतत सैगलबरोबर होतो. आमचं दोघांचं चांगलंच जमलं होतं.”

सैगल अभिनय कसा करतो आणि कसा गातो हे या काळात तलतजींनी जवळून पाहिलं, आणि नक्कीच अभ्यासलं असणार!

परिणामी गायक-नट होण्याची त्यांची महत्वाकांक्षा अधिकच दृढ झाली असावी, नाही का!

तर अशाप्रकारे.. तलतजींना पहिली प्रसिद्धी मिळाली ती त्यांच्या दोन गैरफिल्मी गाण्यांमुळे! परिणामी तलतजी कलकत्त्यातच नव्हे, तर मुंबईतही प्रसिद्ध झाले. पहिल्या गाण्याचे बोल होते.. 'बन जाऊंगा क्या से क्या मैं..'

हे गाणं १९४१ मध्ये ध्वनिमुद्रित झालं होतं. पण खऱ्या अर्थाने तलतजी गाजले ते १९४४ साली प्रदर्शित झालेल्या 'तस्वीर तेरी दिल मेरा बहला ना सकेगी..' या गाण्यामुळे! हिंदी चित्रपटसृष्टीचं लक्ष त्यामुळे ताबडतोब तलतजींकडे वेधलं गेलं. या दोन्ही गाण्यांचे गीतकार होते फैय्याज हाश्मी आणि संगीतकार होते कमल दासगुप्ता!

कमल दासगुप्ताजी यांच्याबद्दल सांगायचं तर.. कमल दासगुप्ता (१९१२-१९७४) हे बंगालमधले सुप्रसिद्ध संगीतकार होते. तलतजी आणि जगमोहनजी यांची कित्येक अप्रतिम गैरफिल्मी गाणी त्यांनी संगीतबद्ध केली आहेत. 'फिरोझा बेगम' या प्रसिद्ध 'नझरुल संगीत' गायिकेशी त्यांनी प्रेमविवाह केला होता. (नझरुल संगीत ही रवींद्र संगीताप्रमाणेच बांगलादेशात प्रसिद्ध असणारी एक खास अशी संगीतमाला आहे. त्यात 'काझी नझरुल इस्लाम' या बंडखोर बंगाली कवीच्या संगीत रचना आहेत.) मात्र विवाहापूर्वी कमल दासगुप्ता यांना मुसलमान धर्म स्वीकारावा लागला आणि त्यांचं नाव 'कमालुद्दिन

अहमद‘ असं बदलण्यात आलं. फाळणीनंतर बायकोमुलांसह ते बांगलादेशातच स्थायिक झाले.

तर.. ‘गीतयात्री‘ फेम, मोहोळकर सांगतात, की ‘कमलदांचा’ विषय निघाल्यावर भावनाविवश होऊन तलतजी त्यांना म्हणाले, “खरं सांगतो. मी, जगमोहन, हेमंतदा (हेमंतकुमार) आणि ज्युथिका (रॉय) यांच्यासमोर आयुष्यात पहिल्यांदा उभे राहिलो ते केवळ कमलदांमुळेच! दुर्दैवं असं, की कलकत्त्याची एक ‘बँक’ बुडाल्यामुळे कंगाल होऊन अखेरच्या काळात कमलदांच्या डोक्यावर परिणाम झाला होता. आम्ही सर्वांनी त्यांच्यासाठी शक्य ते सगळं केलं. पण ते होते बांगलादेशात! आम्ही इथून किती करणार? अखेर तिथेच ते वारले. असे समजले!”

अर्थातच यापुढील पाऊल म्हणजे त्यावेळच्या प्रमुख चित्रपट निर्मिती केंद्राचे कलकत्ता इथे अचानक प्रयाण झाले. त्याचा परिणाम म्हणून की काय तलतजींनी तिथे काही चित्रपटात भूमिका देखील केल्या असा वेधक तपशील वाचनात आला. (तलतजींनीही या गोष्टीला दुजोरा दिला होता.) पुढे हिंदी चित्रपट क्षेत्रात आल्यावर पुन्हा चित्रपटात भूमिका करण्याची इच्छा होणे, हा काही योगायोग म्हणता येणार नाही. योगायोगाने लवकरच चित्रपटसृष्टी मुंबईत आली आणि तलतजी मुंबईत आले! तोपर्यंत मुंबईत त्यांच्या नावाचा तसा बराच बोलबाला झालेला असल्याकारणाने, लगेच प्रख्यात संगीतकार अनिल विश्वास यांनी त्यांना "आरझू" चित्रपटात प्रथमच गायची संधी

दिली. "मोगरा आणि चाफ्याचा "सुगंध" कितीही प्रयत्न केला तरी कधीच लपत नाही, म्हणतात ना! अगदी तस्संच!" त्यांनी तलतजींना लगेचच "ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल.." हे गाणे दिले. ते सुप्रसिद्ध झाले, हे तलतजींचे सुदैव!! अनिल विश्वास सारख्या जिनियस संगीतकाराकडे संधी मिळाल्याने इतर संगीतकारांचे तलतजींकडे लक्ष वळले, तर त्यात नवल ते काय!!

वाचनात आल्याप्रमाने आणि थोर लेखकांनी अधोरखित केल्याप्रमाने अनेक गोष्टी आमच्या पिढीसाठी तर अत्यंत लाखमोलाच्या आहेत. अभ्यासासाठी तर खूपच उपयुक्त आहेत. काही अप्रकाशित गोष्टी खचितच थक्क करणाऱ्या तर नक्कीच आहेत. तर.. वाचा, अभ्यासा!

आणखी वेधक तपशील द्यायाचा झाल्यास, अनिल विश्वास यांच्याकडे गाणे गायच्या आधी तत्कालीन प्रसिद्ध संगीतकार विनोद यांच्याकडे "अनमोल रतन" या चित्रपटासाठी त्यांनी गायन केले. पण "आरझू" चित्रपट आधी आला आणि श्रेय अनिलदांकडे गेले. एकूणच विनोद, अनिल विश्वास यांच्या शैलीनुसार गाण्यांची स्वररचना असल्याने एकूणच गायन हे कोमल-मधुर, अंत:स्पर्शी, अंतर्मुख, किंवा काहीसे उदास आणि अनाक्रमक गायन होते परंतु, नंतर तलतजींची हीच एक मान्यवर शैली ठरली!

(बाय द वे! या जोडगोळीने दिलेल्या संगीतरचनांना, तसेच आधीच्या सुद्धा अनेक "जिनियस" अशा ज्येष्ठ संगीतकारांना, म्हणजेच अगदी

आर. सी. बोरालजी पासून ते थेट संगीतकार "मदन मोहनजी" यांच्यापर्यंतच्या अनेक "संगीतकारांचे" आविष्कार पाहून.. त्यांना सन्मानाने "मेलडी घराना" असे नामाभिधान दिले गेले आहे, हे आपण जाणताच! त्यासाठी त्यांचा नेहमीच सन्मान केला जातो! हे सुद्धा संगीत रसिक जाणतात!)

तलतजींच्या एकूणच सगळ्या कारकिर्दीवर जरी सहजच नजर फिरवली तरी त्यांच्या एक खास अशा कंपनयुक्त गायनशैलीवर सुरूवातीला भले टीकेचे बाण सोडले गेले, परंतु त्यानंतरच्या काळात त्यांच्या गायनशैलीतील वैशिष्ट्यांचे पुरेपूर प्रत्यंतर आपल्याला मिळले. त्यांची ती शैली नंतर इतकी प्रसिद्ध झाली की १९५० साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटांपैकी सोळा चित्रपटात तलतजींनी गायन केले, आणि हीच शैली जणू रूढ केली! या यशाच्या जोरावर त्यांनी त्या काळातील जवळपास सर्व प्रमुख गायकांसोबत आणखी ग़जल आणि रोमँटिक युगलगीते गायली. त्यांच्या देखण्या चेहऱ्यामुळे त्यांना वेगळ्या प्रकारच्या भूमिकांच्या संधीही मिळू लागल्या! नायक म्हणून अभिनय करण्याच्या! १९५१ मध्ये, देव आनंद, मधुबाला, प्रेमनाथ यांच्या 'आराम' या चित्रपटात ते हार्मोनियमवर बसून 'शुक्रिया, शुक्रिया ए प्यार तेरा..' हे गाणे गाताना दिसले. दोन वर्षांनंतर, निर्माता ए. आर. कारदार यांनी तलतजींना त्यांच्या 'नशाद' या नवीन चित्रपटात मुख्य भूमिकेची ऑफर दिली, ज्याचे नाव नंतर 'दिल-ए-नादान' (१९५३) असे ठेवण्यात आले. या चित्रपटात नायिका श्यामा

आणि नवोदित 'पीस कंवल' यांच्यासोबत त्याची भूमिका होती. (या गायकाच्या समोर भूमिका साकारण्यासाठी एका नवीन मुलीच्या शोधात, कारदार यांनी चक्क कोलिनोस टूथपेस्टच्या प्रायोजकत्वा खाली एक अखिल भारतीय सौंदर्य स्पर्धा सुरू केली होती.)

त्यानंतरच्या वर्षांमध्ये त्यांनी सुरैया, नादिरा, माला सिन्हा आणि नूतन यांच्यासोबत चित्रपटांमध्ये काम केले. ज्या काळात मोहम्मद रफी, मन्ना डे आणि मुकेश यांच्यासारख्या मोठ्या गायकांनी गायन क्षेत्र व्यापले होते, त्याच काळात अभिनयातील त्यांच्या या प्रयत्नांमुळे त्यांच्या गायनाच्या कामावर काहिसा परिणाम झाला. संगीत दिग्दर्शकांना वाटले की, चित्रपट आणि परदेशातील मैफिलींमध्ये व्यस्त असलेले तलत, पार्श्वगायनासाठी उपलब्ध नसतील. (तलत महमूद हे कदाचित आंतरराष्ट्रीय संगीत दौऱ्यांचे प्रणेते होते! त्यांचा पहिला दौरा १९५६ मध्ये पूर्व आफ्रिकेचा होता, हे लक्षात घ्या!) आणि स्वाभिमानी तलत महमूद कोणाकडेही उपकार मागत नसत.

काही उदाहरणे बघितली म्हणजे हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. "शुक्रिया, शुक्रिया ऐ प्यार तेरा शुक्रिया.." (अनिल विश्वास), "हमसे आया न गया.." (मदन मोहन), "बेचैन नजर बेताब जिगर.." (सी. रामचंद्र) वगैरे. त्यांच्या गायनाबाबत एक कथा वारंवार सांगितली जाते!..

आधी नौशाद आणि इतर संगीतकारांनी तलतच्या आवाजातील सुप्रसिद्ध "कंपन" या वैशिष्ट्यावर टीका केली होती. परंतु त्याचवेळी अनिल विश्वास यांनी नि:शंकपणे सांगितले होते, तलतच्या आवाजातील "कंपन" हाच पुढे त्याचा उपयुक्त गुण ठरेल, आणि झालेही तसेच!

तलतजी आणि अनिल विश्वासजी

याचमुळे तलतजींच्या आवाजातील आत्मविश्वास दुणावला आणि आपल्या खास भावपूर्ण गायनशैलीला आणखी विकसित करणे त्यांना शक्य झाले. तलतजींच्या आवाजातील "कंपन" आणि भावपूर्ण गायन, याचा पुढे अनेक गायक कलाकारांवर प्रभाव पडला. काही उदाहरणे द्यायची झाल्यास.. आपले मराठीतले सुप्रसिद्ध भावगीत गायक अरुणजी दाते, जगजीतजी सिंग इत्यादी! अर्थात या दोघांनी पुढे भले आपली वेगळी वाट चोखाळली (आणि तशी वेगळी वाट शोधणे आवश्यकच असते.) परंतु काहीही म्हणा शब्दोच्चाराबाबत याच गायकाचा आदर्श त्यांनी कायम आपल्या गायनात आणला, हे काय मी सांगू!

तलतजी महमूद यांच्या गायनातील आधीच्या त्या काळातील आणखी काही खास वैशिष्ट्ये सांगायची झाल्यास, त्यांनी केलेले चित्रपटबाह्य ग़जलगायन अतिशय विलोभनीय आणि उच्च गुणवत्तेचे होते. कदाचित या गायकाने आपले ग़जल गायन १९३९मध्ये लखनौ नभोवाणी केंद्रावरून सुरु करावे, हा योगायोग नक्कीच नसावा! संपन्न, शिष्ट, सुसंस्कृत आणि संयमित वातावरणाचा हा अपरिहार्य परिपाक म्हणता येईल. थोडक्यात पण योग्य विधान, असे करता येईल की "बेगम अख्तर" या थोर ग़जल गायन सम्राज्ञीने प्रस्तुत केलेल्या आविष्कारातून जो एक आदर्श निर्माण केला होता. त्यासारख्या आसपास फक्त तलत महमूदच पोहोचतात, हे सर्व रसिक पूर्णत: जाणतात! एक आणखी बाब विशेषत्वाने इथे नोंदवावी लागेल. १९८६ मध्ये त्यांनी "गझल के साज उठाओ" या अल्बमनंतर संगीतजगताला रामराम ठोकला. स्पष्टपणे मत मांडायचे झाल्यास, म्हणजेच १९५० ते १९६० या दशकात तलतजींचा खरा बहराचा काळ होता. त्यानंतरच्या संगीतशैलीशी हा गायक जुळवून घेऊ शकला नाही आणि याचे प्रमुख कारण मांडायचे झाल्यास, या शैलीत सुरावट, संथ गती, नाजूक प्रक्षेपणास जागा नव्हती. असे खात्रीने म्हणता येते, पाश्चात्य वळणाचे लयबंध इत्यादीही या गायकाला मानवले नसावेत, हा अभ्यासण्याचा विषय आहे!

मुलाखतीकडे पुन्हा वळताना.. तलतजी यांनी थेट १९४१ साली गायलेल्या "सब दिन एक समान नाही था.." ची आठवण सांगितली.

त्या आवाजावर खुळावले कमलदा! त्यांना अनुकरणाच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी कंबर कसली. एकाहून एक सरस गाणी दिली तलतजीना. तलतजी सांगत होते.. मे महिना होता तो! "ग़जल" रेकॉर्ड करून झाल्यावर हायसे वाटले होते त्यांना. "बाहत्तर" रुपयांचे घसघशीत मानधन घेऊन परतणारे तलतजी, कमलदांच्या शिकवणीमुळे, कानपिचक्यांमुळे बरेच "मॅच्युअर" झाले होते म्हणाना! (घसघशीत या शब्दावर दचकलात ना! होय, १९४१ या वर्षी बारा ग्राम (तेव्हाचा १ तोळा) २४ कॅरेट सोन्याचा भाव सुमारे ₹. ३३ ते ३५ रुपये होता. ते दुसऱ्या महायुद्धाचे दिवस होते!.. म्हणूनच बाहत्तर रुपये ही रक्कम घसघशीतच, नाही का?)

पुढे "तस्वीर तेरी दिल मेरा बहला न सकेंगी.." या गाण्यानंतर तलतजी यांचं नाव सर्वत्र झालं. "माशुका" समोर नसताना फक्त तिच्या तसबिरीकडे पाहत आठवणींना कुरवाळणारा प्रेमविव्हळ नायक साक्षात समोर पडद्यावर दिसत नसूनही तलतजींच्या मधाळ आवाजामुळे तो मनामनात रुजला. परिणामकारक ठरला. नुसती स्त्रियांच्या अंगप्रत्यांगावर शायरी करणाऱ्या काही तत्कालीन शायराना जणू ती चपराक होती. तलतजी रातोरात "स्टार" झाले. हे काय सांगायला हवेय!

अनुकरणाच्या भिंती ढासळल्या ना, की नवनवी क्षितिजे दिसायला लागतात. तसंच घडलं तलतजींच्या बाबतीत! त्यांचा आवाज आणखी खुलला. स्वतःची स्टाईल आत्मसात केली त्यांनी! ते

प्रेमी जीवांचे गायक बनले. एखादं गाणं त्यांनी गायलं, की त्यातून व्यक्त होणाऱ्या भावभावना आपसुकच हळव्या व्हायच्या! गहिऱ्या व्हायच्या! काळीज तुटायचं त्यांचा आवाज ऐकून. सरळ "भावगीतासारखं" गाणं खरं पण थेट हृदयाला भिडणारं! शास्त्रीय संगीतासारख्या ताना हरकती नाहीत, मुरक्या नाहीत. भावविष्कार हाच स्थायीभाव! "बेगम अख्तर" तुम्हालाही आवडतात ना? "ग़जल" सुद्धा त्या "ठुमरी" सारख्या आळवायच्या. तर "सैगलजी" विच्छिन्न मनाने गायचे. पण तलतजी मात्र शायराचा कलाम हळुवारपणे सादर करायचे. मात्र आपल्याला जास्त वेड लावलं ते त्यांच्या फिल्मी गीतांनी! रफी, मन्नादा, मुकेश आणि किशोर आपले लाडके खरे परंतु तलतजी यांच्या गाण्यांसाठी वेगळा कप्पा आहे आपल्या हृदयात ! (मी या "ई-बुक" मध्ये, त्यांचे जेवढे "अल्बम्स" आपल्या "यू-ट्यूबवर" उपलब्ध आहेत, ते सर्वांच्या सर्व देतोय. फक्त त्या "अल्बमच्या" फोटोवर "क्लिक" करा.. आणि तुमच्या "स्मार्ट टीव्हीवर" अवश्य आस्वाद घ्या, ही विनंती!)

आज आपली "मुंबैनागरी" ही "बॉलीवूड" ("साऊथची" तर "टॉलीवूड") म्हणून गाजत असली तरीही, याकाळात "कलकत्ता" हे माहेरघर होतं "फिल्म निर्मितीचं"! (कृपया नोंद घ्या! आपल्या या "ई-बुक" मध्ये काही अमुक संदर्भ हे पुन:पुन्हा येणं स्वाभाविक आहे, कारण ते ज्या ठिकाणी येत आहेत, ते त्या त्या आठवणींशी निगडित आहेत, असे समजावे, ही नम्र विनंती! मुळात संगीताचा अभ्यासक

अथवा कोणताही वाचक हा संपूर्ण "ई-बुक" हे एका दमात वाचत नसतोच. हा माझा अनुभव आहे. एखादी आठवण वाचली की तो तिथेच थबकतो! त्या अमुक आठवणीत क्षणार्धात रमतो. अचानक सोबत गाण्यांच्या "लिंक्स" आल्याच तर तो आपले वाचन तिथेच थांबवून, आधी ती गाणी ऐकतो, आस्वाद घेतो आणि नंतरच पुढच्या पानाकडे वळतो, हे मी पाहिलेय! अनुभवलेय! म्हणून ही विनंती! एखाद्या आवडत्या गायक किंवा संगीतकार यांच्यावरील लेख, उल्लेख त्या वाचकाला भूतकाळात रमवतात! त्या गाण्यात व्यक्त झालेल्या भावभावना त्याला जणू थेट त्याच्या स्वतःच्या "भूतकाळातील आठवणीत" घेऊन जातात. पन्नास वर्षांपूर्वी इराणी हॉटेल्समधले "ज्युक-बॉक्स" हे हेच काम करत असत. "रेडिओ" आपापल्या "कार्यक्रमातून" गाणी सादर करत असत. समारंभानिमित्त आणले जाणारे "लाऊडस्पिकर्स" ती त्या त्या विषयावरचे संगीत ऐकवत! "टेपरेकॉर्डर्स" नव्हतेच, "टीव्ही" सुद्धा नव्हताच. संगीताची भूक भागावी यासाठी इराणी हॉटेलमधला "ज्युक-बॉक्स" हाच एक आधार! म्हणूनच एखाद्या "ई बुकमधून" एखादी आठवण जागृत झाली की, त्या वळणावर रसिकांनी थबकणे स्वाभाविकच ना! असो!)

तर त्या अमुक काळात सगळी दिग्गज मंडळी होती ती कलकत्त्यातच! तिथल्या "न्यू थिएटर" च्या आठवणी सांगताना तलतजी काहीसे हळवे झाले होते! यानंतर तिथे सुदैवानं तलतजी

यांना "बी. एन. सरकार" यांनी "कॉन्ट्रॅक्टवर" घेतलं. मनोमन सुखावले तलतजी!

"समाप्ती" (१९४९) हा त्यांचा पहिला बंगाली चित्रपट! परंतु तो साफ कोसळला. (आमच्या "व्हीनस" कंपनीचा "मेला" (२०००) जसा, (मराठीत "मेला" म्हणतात ना.. अगदी तस्साच कोसळला! अगदी तस्साच! ही खूप मोठी कथा आहे! (मित्रांनो.. काहिसं थोडक्यात पण स्पष्टपणे सांगायचं तर "मेला" (२००० रिलीज) हा चित्रपट आमच्या "व्हीनस" कंपनीने, त्यात केवळ.. सुप्रसिद्ध सेलिब्रिटी "आमिर खान" असणार आहे. तसेच "ट्विंकल खन्ना" सुद्धा नायिका असणार आहे, हे जाणून स्वीकारला होता. "लुटेरे" फेम दिग्दर्शक "धर्मेश दर्शन" यांचा हा महत्त्वाकांक्षी चित्रपट पाहता, यश नकीच मिळेल अशी आशा होती. त्याचा "राजा हिंदुस्थानी" सुद्धा "फ्लोअरवर" होता, हे विशेष! परंतु, जसजसा काळ जाऊ लागला, तसतशी अनेक घटना थक्क करणारी होती. चित्रपटात नायक "आमिर खान" याचा सख्खा भाऊ होता, हे ठीक परंतु त्या चित्रपटाच्या "संहितेमध्ये" नायक "आमिर खान" बरीच ढवळाढवळ करत असल्याचे कळत होते, पण "वळत" नव्हते. चित्रपटासाठी सुरुवातीला संगीतकार म्हणून "राजेश रोशन" यांना "अनुबंधित" करण्यात आले होते. त्यांनी "कमरिया लचके रे ." आणि "चोरी चोरी हम गोरीसे.." ही मस्त गाणीही केली होती. चित्रपटाचे खास "मोठ्ठाल्ले" पोस्टर्स प्रकाशित झाले होते. पण कुठे माशी शिंकली

कुणास ठाऊक! त्या "धर्मेशजी" यांचे त्यांच्याबरोबर काही वाद होऊन, त्यांनी चित्रपट सोडला. पुढे "संगीताची" जबाबदारी "अनू मलिक" यांच्याकडे आली. बाप रे! गंमत म्हणजे.. एकीकडे "शूटिंग" सुरू होतेच! याच काळात "राजा हिंदुस्थानी" या सिनेमाची गाणी अचानक गाजली. "धर्मेश दर्शन" यांची "कॉलर टाईट" झाली खरी पण पुढे यामुळेच घडलेल्या अनेक घटनांमुळे निर्मात्या कंपनीला अनेक प्रकारे "मनस्ताप" सहन करावा लागला! हा, एक मोठ्या प्रदीर्घ लेखाचा विषय असल्याने, तूर्तास इतकेच सांगतोय! असो!) मात्र त्या "धर्मेश दर्शन" नामक "दगड्या दिग्दर्शकाला" फारसा फरक पडला नाही, पण आम्ही मात्र खूप खूप गमावलं! "सहन होत नाही, सांगताही येत नाही" अशा जागची ती जखम आहे! असो!)

तर तलतजी "समाप्ती" (१९४९) हा बंगाली चित्रपट, कोसळला खरा परंतु आपल्या तलतजी यांना अनुभवाची शिदोरी देऊन गेला. "बी. एन. सरकार" ही कच्चे खिलाडी नव्हते.. (त्यांची "बायोग्राफी" बरंच काही सांगून जाते!)

बी. एन. सरकार ही छोटी व्यक्ती नाहीय. त्यांना "बिरेंद्रनाथ सरकार" या नावानेही ओळखले जाते, हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज चित्रपट निर्माते आणि कोलकाता येथील प्रसिद्ध "न्यू थिएटर्स' चे मुख्य संस्थापक होते. त्यांचा जन्म ५ जुलै १९०१ रोजी बिहारमधील भागलपूर येथे झाला होता. यांच्याबद्दलची महत्त्वाची माहिती आपलेपणाने देतोय. बी. एन. सरकार यांचे वडील सर

नृपेंद्रनाथ सरकार हे बंगालचे तत्कालीन ॲडव्होकेट जनरल होते. आणि त्यांनी लंडन विद्यापीठातून

"सिव्हिल इंजिनिअरिंगचे" शिक्षण घेतले होते. चित्रपट या विषयात अतिशय उत्सुकता असल्याने त्यांनी 'न्यू थिएटर्स' ची स्थापना केली होती. भारतात परतल्यानंतर त्यांनी कलकत्ता येथे स्वखर्चाने चित्रपटगृहे बांधली. त्यानंतर १० फेब्रुवारी १९३१ रोजी त्यांनी 'न्यू थिएटर्स' या ऐतिहासिक स्टुडिओची स्थापना केली होती. त्यांचे चित्रपटसृष्टीतील योगदान पहायचे तर.. आपल्या "न्यू थिएटर्सच्या" माध्यमातून त्यांनी अनेक उत्कृष्ट बंगाली आणि हिंदी चित्रपटांची निर्मिती केली होती. हा ठळक इतिहास आहे. त्यांच्या स्टुडिओने दर्जेदार दिग्दर्शक (जसे की पी. सी. बारुआ, बिमल रॉय किती नवे सांगू?) आणि प्रतिभावान अभिनेते. जसे की के. एल. सैगल, पृथ्वीराज कपूर, कानन देवी.. (यादी मोठी आहे!) चित्रपटसृष्टीला दिले. पुरस्कार आणि सन्मान याविषयी बोलायचे तर भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना भारत सरकारकडून अनेक सर्वोच्च सन्मान मिळाले. दादासाहेब फाळके पुरस्कार : १९७० मध्ये दिला गेला! (भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार!). नंतर "पद्मभूषण" या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. आपल्या भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ २०१३ मध्ये एक टपाल तिकीटही जारी केले होते. २८ नोव्हेंबर १९८० रोजी कोलकाता येथे त्यांचे निधन झाले!

१९५० मध्ये मुंबईत "फिल्म इंडस्ट्री" आकाराला येत होती. तलतजी मुंबईत आले. अनिल विश्वासजी यांनी त्यांच्या "आरजू" चित्रपटासाठी गाण गाऊन घेतलं. "ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल..". इकडे सुमधुर संगीताच्या बळावर चित्रपट तारून नेण्याचं कसब नौशादजींनी अंगिकारलं होतं. "रतन" (१९४४) ने तो पाया रचला. संगीतयात्राच निघाली नंतर! जेष्ठ सिनेपत्रकारांनी "चित्रपट

संगीताचं "सुवर्णयुग" आलं असं त्यांनी नामाभिदान दिले! त्यानंतर सी. रामचंद्र, अनिल विश्वास, श्यामसुंदर, सज्जाद, खेमचंद प्रकाश, विनोद, नौशाद, नाशाद... किती नावं सांगावीत! जणू सुमधुर संगीताचे रांजण रिते होत होते. "कारवाँ" सुरू होता! तलतजी गात होते! (एखाद्याने कोणतीही "पोस्ट" टाकली रे टाकली की, त्यावर "भराभर कॉमेंट्स" या येतातच, नाही का!? (या गोष्टीला हल्ली "दिमागी नक्षल" असे गोंडस नाव दिले गेले आहे. असो! तर स्वाभाविकपणे तुम्ही किंवा काहीजण "प्रश्न" नक्कीच उपस्थित करतील! किंवा करू शकतात! हे मी पूर्णतः जाणून आहे! चलता है! तर तुम्ही म्हणाल.. काय चाललंय काय! तुमचे वय काय? लिहिताय काय? येस! खरंय! आमचा जन्म "१९६०" च्या दशकातला आहे, हे नक्की! परंतु, "जुन्या सिनेसंगीतात रस" असलेल्या माझ्या "पिढीतील" अनेकांना, माझ्या अनेक बालमित्रांना जुन्या हिंदी चित्रपटातील गाण्याबद्दल खूप अप्रूप होतं! कारण? केवळ आणि केवळ.. "रेडिओ सिलोन" आणि "बिनाका गीतमाला" मुळेच! आमच्या घरात "रेडिओ" नव्हते, ती

भूक आम्ही शेजाऱ्यांच्या "रेडिओ" वर भागवायचो! पण सुदैवाने आमच्यासाठी एक मस्त "लाईफ लाईन" होती. आमच्या "बी. आय. टी. चाळीत" असलेल्या आमच्या घरापासून, काही अंतरावर एक "इराण्याचे हॉटेल" होते. तिथे "ज्युकबॉक्स" नावाचं यंत्र होतं. "माणेक इराणी, बोमन इराणी वगैरे राहायचे ना? त्यांच्या घराजवळच हे इराणी हॉटेल होते! या "हॉटेलची" खासियत म्हणजे त्याच्याकडे खूप खूप "जुन्या गाण्यांच्या" (७८ RPM) रेकॉर्डस् असायच्या. लोक केवळ ती गाणी ऐकण्यासाठी, तिथे येत असत. फक्त एक "आम्लेट पाव" मागवताच आमचा छान वेळ जात असे! अर्थातच माझ्यासोबत चाळीतले अमुक मित्र सुद्धा असायचे! असो! जुन्या गाण्याबद्दलची आमची ही "दिवानगी" खासच होती. लक्षात घ्या! तेव्हा "टीव्ही" नव्हते! तर समजून जा!)

दिलीपकुमारच्या तोंडी "आरजू" चित्रपटातलं "ऐ दिल मुझे ऐसी जगह.." अशी गाणी आम्हां तरुणांसाठी एक "अपूर्वाई" होती. ती आमच्या भाववृत्तीशी जुळणारी होती. तलतजी बहरत होते. अगदी शम्मी कपूर हे मोहम्मद रफी यांच्या आवाजात "या.. हूं" अशी आरोळी ठोकेपर्यंत! तलतजींनी अभिनयात आपलं कसब जाणून पाहिलेलं परंतु ते रसिकांच्या गळ्यातले ताईत बनले, ते गायक म्हणूनच! "डाक बाबू", "वारीस", "रफ्तार", "दिवाली की रात", "एक गाँव की कहानी", "लालारूख", "मालिक", "सोने की चिडियाँ" असे तेरा सुपरहिट म्हणावेत असे ते चित्रपट! दिलीपकुमार ते शशी कपूर पर्यंत

ते अनेक अभिनेत्यांसाठी ते गायले! दिलीपकुमार (दाग), देव आनंद (पतिता), अशोककुमार (एक साल), राज कपूर (आशियाना), प्रदीपकुमार (सुबह का तारा), शम्मी कपूर (लैला मजनू), भारत भूषण (मिर्झा गालिब), करण दिवाण (तीन बत्ती चार रास्ता), सुनील दत्त (सुजाता), शेखर (दो राहा), चेतन आनंद (किनारे किनारे), गुरुदत्त (बाज), व्ही. शांताराम (परछाई), प्रेमनाथ (बुझदिल), महिपाल (रंगीला राजा), मनोजकुमार (रेशमी रुमाल) आणि शशी कपूर (प्रेमपत्र) हे चित्रपट/गाणी दृष्टिपथात येतात! ("लाहौलविलाकुव्वत"! असे मस्त चित्रपट आमच्या "साठच्या दशकात" जन्मलेल्या, माझ्या "पिढीला" त्या काळात प्रत्यक्ष पहायला मिळालेच नाहीत. आज ते आणि अनेक सिनेमे आम्हाला केवळ "यु-ट्यूब" मुळेच पाहायला, आस्वाद घ्यायला मिळताहेत! "यु-ट्यूब" खरंच.. थोर तुझे उपकार!) "तलतजी" या मूळ विषयाकडे वळण्याआधी जुन्या चित्रपटांच्या काही "प्ले-लिस्ट्स" देतोय त्यातील चित्रपटांचा इच्छुक रसिकांनी अवश्य आस्वाद घ्यावा. १९३०, १९४०, १९५०, १९६० असे वर्गीकरण केलंय खरं, पण प्रत्येक "प्ले-लिस्ट" मधला तो खजिना पाहून आपण नक्कीच हरखून जाल.) असो! या क्षणी आपल्या तलतजी यांची लतादीदीं बरोबरची अनेक युगलगीते आठवताहेत. सुरैया, गीता दत्त बरोबरची पेशकश आठवतेय! "आगावर" चित्रित झालेलं "अंधे जहान के अंधे रास्ते.." आठवतंय! प्रेमभंगाचं दुःख उरातल्या उरात दाबून, आपल्या प्रेयसीला परक्याची झालेली पाहून निरोप देणारा दिलीपकुमार, तलतजींच्या आवाजातून "मेरा

जीवनसाथी बिछड गया.." ऐकताना आपण शहद की मिठास आणि दिल का दर्द हे अदभुत रसायन अनुभवतो, जे तलतजींच्या आवाजात होतं!

अरे हो! एक सांगायचं राहिलच. एकीकडे चित्रपटातून सुमधुर गीते तबकड्यांवर येत होती. रेकॉर्डसचा खप वाढत होता.. अचानक "आकाशवाणी"ने (ऑल इंडिया रेडिओ) १९५२ मध्ये आपल्या अधिकृत प्रसारणातून हिंदी चित्रपटसंगीत वाजवण्यावर पूर्णपणे बंदी घातली होती. तत्कालीन माहिती आणि प्रसारण मंत्री "बी.व्ही. केसकर" यांना हे संगीत, अतिपश्चिमी आणि नवस्वतंत्र भारतासाठी अयोग्य वाटल्याने हा निर्णय घेण्यात आला होता. या बंदीमुळे नाराज झालेल्या रसिकांसाठी 'रेडिओ सिलोन' आणि त्यांचा 'बिनाका गीतमाला' हा कार्यक्रम हिंदी गाणी ऐकण्याचा मुख्य स्रोत बनला! श्रोत्यांची घटती लोकप्रियता पाहता, आकाशवाणीला आपली चूक सुधारण्यास भाग पडले आणि त्यांनी अखेर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी 'विविध भारती' ही स्वतंत्र करमणूक सेवा सुरू केली. या सेवेद्वारे हिंदी चित्रपटसंगीत अधिकृतपणे पुन्हा एकदा आकाशवाणीवर परतले, पण "रेडिओ सिलोन"ने तोपर्यंत रसिकांची मने काबीज केली होती. अमीन सयानी प्रस्तुत "बिनाका गीतमाला" टॉपवर होती. दर बुधवारी रात्री आठ वाजता तो कार्यक्रम सादर होत असे. या वेळेत रस्ते सुनसान असत. ("रामायण" आणि "महाभारत" या मालिकांदरम्यान रस्ते सुनसान असत, अगदी तसेच!)

तलतजींच्या गायनाची एकूणच प्रकृती, वर निर्देशिल्याप्रमाणे असल्याने एका अर्थाने त्यांच्या गायनाला हिंदी चित्रपटसृष्टीत मर्यादित वाव होता, हे मात्र नक्की! ज्या रचनेत विशेष काव्यगुण आहेत, अशीच गीते गायला घ्यायची, असा त्यांचा आग्रह असल्याने त्यांच्या वाट्याला कमी गाणी येणे स्वाभाविकच होते. त्यांनी गायलेल्या गाण्यांवर नजर फिरवली तर हा मुद्दा ठसठशीतपणे दिसून येतो. त्यातून उर्दू भाषेचा संस्कार असल्याने, गायनावर उर्दू संस्कृतीचा लहेजा दृष्टीस पडतो. वर म्हटल्याप्रमाणे त्यांचा बहराचा काळ हा १९५०-१९६० हा असणे, हा योगायोग निश्चितच मानता येणार नाही! त्यावेळी चित्रपट सृष्टीत वावरणारे शायर साहिर लुधियानवी, शकील बदायुनी, मजरुह सुल्तानपुरी, राजेंद्रकृष्ण यांच्यासारखे उर्दू भाषिक लेखक हिंदी चित्रपटातील गाणी लिहित असल्याने, त्यावेळच्या शब्दरचनांवर उर्दू शैलीचा विलक्षण प्रभाव ठळकपणे जाणवायचा. विशेषतः गालिब, इब्राहिम जौक, दाग यांसारख्या प्रतिभावंत शायरांचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. याचा परिणाम म्हणून की काय त्यावेळची गाणी ही अधिक प्रासादतुल्य, गेयबद्ध अशीच असायची जी तलत महमूद यांच्या शैलीला उपकारक ठरली! (अर्थात काही "उर्दू" शब्द सर्व सामान्य रसिकांच्या डोक्यावरून जायचे. तुम्हाला आठवतंय? "जि-हाल-ए-मिस्कीं, मकुन-ब-रन्जिश, बहाल-ए-हिज्रा बेचारा दिल है!.." (गुलामी-१९८५) हे एकच उदाहरण पुरेय! गुलजारजींनी, थोर कवी "अमीर खुस्रो" यांच्या एका शायरीवर, हे गाणं बेतलेलं होतं. हे चित्रपटातील "सिच्युएशन" वर युगलगीत म्हणून

लिहिलं खरं पण अमुक "ऑर्केस्ट्रा" मधले गायक त्याची अक्षरशः वाट लावत! "जिहाल मस्ती मुकुंद रणजीत, बेहाल हिजडा बेचारा.." असे गाताना मी स्वतः ऐकलंय! अशी खूप उदाहरणे आहेत. इतकी की, हा चक्क एका प्रदीर्घ लेखाचा विषय होऊ शकतो.) आता वाचनात आलेले आणखी काही आक्षेप पाहुया! तलत महमूद यांची गायनशैली पाहता, तसेच गळ्याचा आवाका ध्यानात घेता, काही गीतांबद्दल असे ठामपणे म्हणता येईल, तलतजींनी पाश्चात्य ढंग स्वीकारणे अशक्यच होते. तसेच उछलकूद करणारी गाणी गाणे केवळ अशक्य होते. गायनाच्या अभिव्यक्तीसाठी चित्रपट क्षेत्र निवडल्याने आणि चित्रपटात असंख्य जॉनरची गाणी गायला लागणे गरजेचे असल्याने, या गायकाच्या गायनावर खूपच मर्यादा आल्या! आवाज अतिशय सुरेल, शक्यतो मंद्र किंवा शुद्ध सप्तकात गायचे. तार सप्तकात जरी काहीवेळा गायन केले तरी तसे गायन करणे हा त्यांचा पिंड नव्हता हेच खरे! आपण कशाप्रकारचे गाऊ शकतो आणि तशाच गायनावर ठाम राहणे ही प्रवृत्ती असल्याने, याच्या परिणामाची या गायकाला पूर्ण कल्पना होती त्यामुळे त्यांना गायनाची संधी वारंवार मिळणे अशक्य होते. तारसप्तकात गाणे अशक्य तर पल्ला तसा मर्यादित तसेच आवाजाची गाज देखील मर्यादित आणि संयत. किंबहुना संयत गायन हेच तलतजी यांच्या गायनाचे खरे वैशिष्ट्य!

इथे आणखी एक मुद्दा मांडता येईल. समकालीन गायक रफी, किशोर यांच्यापेक्षा तलतजींची लोकप्रियता कमी का? तशी

लोकप्रियता भले कमी नक्कीच होती! एका गीतसंग्राहकाने नोंदलेले मत पहा! तलतजींची एकूण गीतसंख्या जवळपास ४५० भरते म्हणजे सांख्यिकीच्या दृष्टीने, रफी, किशोर हे गायक फारच पुढे होते. यावर त्यांचे स्वत:चे मत असे होते की जरी संख्येने गाणी कमी असली तरी ती सगळी उच्च दर्जाची म्हणून लोकांच्या आजही स्मरणात आहेत. हे प्रमाण इतर गायकांनी गायलेल्या गीतांबाबत जेमतेम २५% इतकेच भरेल. यात मात्र निश्चित तथ्य आहे! यापुढे जात आणखी एक मुद्दा मांडता येईल.

१९६० नंतरच्या रसिकांच्या बदलत्या त्या अभिरूचीशी तलतजींचे अजिबात जुळण्यासारखे नव्हते. आपण जी कुठली गीते गायची आहेत, त्याच्या संहितेबाबत हा गायक विलक्षण चोखंदळ होता. याबाबत आणखी असे विधान करता येईल, लखनौच्या वारसा म्हटल्यावर दोन गोष्टी स्वाभाविक वाटतात! उर्दूचे स्वच्छ, शुद्ध उच्चारण आणि कोणत्या रचनेस गाण्याच्या योग्यतेचे काव्य समजायचे याबाबतची उच्च अभिरुची! अशा विचारसरणीला हिंदीच कशाला एकूणच कुठल्याही चित्रपटसृष्टीत संधी फार मर्यादित असतात. याचाच अनिवार्य परिणाम तलतजींच्या कारकिर्दीवर झाला. असो!!

ज्येष्ठ पत्रकारांबरोबरच्या गप्पाटप्पांमध्ये केवळ नवी माहिती मिळायची, हे जरी खरं असलं तरी तिथे नवीन गॉसिप्स सुद्धा चवीने चघळलं जात असे. एकाने "बॉम्ब" टाकला.. "तलतजींना नक्की वाळीत कुणी टाकलं असेल बरं!?.. एकजण खवळला "नॉन सेन्स"!

जरा तमीजसे बात कर! लाडके गायक आहेत ते आपले! ये अपनी आपस की बात होगी, तो भी तमीज, तहेजीब नाम की चीज है ना!" तो भांबावला! "सॉरी यार! गौरसे सून! तलतजींनी म्हणे एकदा अचानक जाहीर केलं (असं कुठेतरी छापून आलेलं!) की ते आता "पार्श्वगायन" करणार नाहीत! स्वतः भूमिका करणार आणि फक्त स्वतःसाठीच गाणार! खरं तर ते "अभिनेता" म्हणून चमकणं शक्यच नव्हतं. "करेक्ट"! लोकांनी त्यांचे चित्रपट पाहिले होते. कबूल! परमेश्वराने गोड गळ्याबरोबरच देखणं व्यक्तिमत्त्व सुद्धा दिलं होतं. कबूल! पण अभिनयाची देणगी थोडीच दिलेली? (बात में दम है!)

"पार्श्वगायनाचं" युग सुरू होताच, गायकनटांना आपला गाशा गुंडाळावा लागला होता, हे तलतजी कसे विसरले असतील? १९४५ साली कलकत्त्याच्या (चित्रपटात दाढी चिकटवून साधूच्या भूमिकेतले तलतजी कसे दिसत होते हा त्यांचा फोटो दाखवून हसत हसत त्यांनी आपल्या अभिनयाची (?) कारकीर्द सांगितली खरी, पण आपल्या "निवृत्तीच्या" घोषणेचं खरं कारण सांगणं टाळलं तलतजींनी! आता यापुढे तलतजी, इतर अभिनेत्यांसाठी "पार्श्वगायन" करणार नाहीत ही अफवा वणव्यासारखी पसरली सगळीकडे! त्यांचे "दिवाली की रात", "लाला रूख", "एक गांव की कहानी" या चित्रपटांना अपयश मिळताच, त्यांची जणू अभिनयाची हौसच संपली! आणि तोपर्यंत "पार्श्वगायनाचे" दरवाजे त्यांच्यासाठी जणू बंदच झाले होते. राजकारण झालं किंवा काय? कुणास ठाऊक! परंतु तलतजी

"फिल्मी" दुनियेतून उठलेच. त्यांची नवीन गाणी येतच नव्हती. (१९६४ साली प्रदर्शित झालेल्या हिंदी चित्रपटातील सुपरहिट गाण्यांची ही "लिंक" पहा! यात तलतजी किती गाण्यात आहेत, हे तुम्हीच पहा.) तलतजी हे "दिलीपकुमारचा" आवाज म्हणून गाजत होते ना? राज कपूरने "मुकेशजींना" अभिनयाच्या वेडापासून परावृत्त केलेच ना? तसंच "दिलीपकुमारने" (आपला जातभाई म्हणून तरी..) तलतजींना वाचवायला हवं होतं, असं निदान मला तरी प्रांजळपणे वाटतं. पण तोपर्यंत दिलीपकुमार मोहम्मद रफीच्या आहारी गेले होते! "तलत" नाहीत म्हणता वेगळी चूल मांडली त्यांनी! दुसरीकडे तलतजींच्या काळातले संगीतकार मागे पडत चालले होते. कुठेतरी "निकोप स्पर्धा" संपून राजकारण सुरू झालं होतं! गटबाजी, कळप वागवणारी मंडळी, तडजोडीने पोखरलेली "इंडस्ट्री" ही तलतजींसाठी नव्हतीच! पुढेपुढे "पाश्चात्य संगीताचं" आक्रमण डोकं वर काढत होतं.

१९६५ सालच्या मध्यावर "तिसरी मंझील" या चित्रपटातील गाण्यांचे "रेकॉर्डिंग" सचिनदा यांचा मुलगा "राहुल देव बर्मन" (पंचमदा) करताहेत आणि त्यांच्या वाद्यवृंदात "पाश्चिमात्य" वाद्ये वाजताहेत असं "तलतजी" ऐकून होते. मग काय! मनातून धास्तावलेच ते! ज्येष्ठ पत्रकार, लेखक हे एकीकडे "संगीताचं सुवर्णयुग" संपले हो! असं सांगत असतानाच.. दुसरीकडे पाश्चिमात्य संगीत वाद्ये चंचुप्रवेश करताहेत म्हणता, तलतजी यांच्यासारख्या मृदु आवाजाच्या गायकांनी धास्तावाणे तर स्वाभाविकच होते! ("डिस्को"

येताच आपले मोहम्मद रफी जसे गांगारून गेले होते ना, अगदी तस्संच!) गाण्यांमध्ये आणि एकूणच संगीतामध्ये वासना निर्माण झाल्याचं चित्र दिसून येत होतं. मखमली प्रेम संपलेलच! हळुवार बासरी, व्हायोलिनची जागा की-बोर्ड, अकॉर्डियन, गिटार, सॅक्सोफोन, ट्रम्पेट अशा "वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटस"ने घेतली होती म्हणता.. बासरी, सतार आणि तलम मखमली आवाजाचे तलतजी.. अडगळीत पडले! हे सत्य नाकारता येणारे नाही! कदाचित "जहाँ आरा" मधल्या गाण्यांतून उमटलेला तलतजींचा आवाज शेवटचा असावा.. नाही का? "फिर वोही शाम वोही ग़म..", "मैं तेरी नजर का सुरूर हूं..", "तेरी आँख के आँसू पी जाऊँ.." आणि "ऐ सनम आज ये कसम खाये.." (लतादीदींसह)!! १९६४ सालचा हा चित्रपट! "लीडर", "दोस्ती", "पारसमणी"! (पारसमणि" हा चित्रपट आम्हा "साठच्या दशकात" जन्मलेल्या आमच्या "पिढीला" खूप खूप आवडलेला, यात शंकाच नाही! गंमत म्हणजे हा "चित्रपट" एका अमुक क्षणी, अचानक "रंगीत" होतो, हे नक्कीच धक्कादायक होते, हे नक्कीच! बाय द वे! हा चित्रपट एका क्षणी "सप्तरंगात" होणे, हे महत्त्वाचं नव्हतं तर त्यातल्या "टायटल म्युझिक" आणि.. नंतर येणाऱ्या गाण्यांनी आमच्या पिढीला थक्क केले होते, हे विशेषच नाही का!?), "वो कौन थी?", "गीत गाया पत्थरोने", "कोहरा" यांच्या बरोबरीने आलेला हा चित्रपट! या सालातले चित्रपट आणि त्या अमुक काळातील सर्वच्या

सर्व गाणी अभ्यासलीत तर तलतजींची घसरण इथेच कुठेतरी सुरू झाली होती, हे लागलीच लक्षात येतं.

तर.. "जहाँ आरा" हाच बहुदा शेवटचा टप्पा असे म्हणायला हरकत नाही! त्यांनी सक्तीच्या विश्रांतीवर जाण्याआधीचा! मग तलतजी "टूर्स" करू लागले. लंडनच्या "रॉयल अल्बर्ट हॉल" मध्ये "शो" करायला मिळणे, हे परमभाग्य समजतात गायक मंडळी! लतादीदींनी १९७५ मध्ये तिथे "शो" केल्यानंतर पुढच्याच वर्षी संधी मिळाली ती तलतजींना!

त्यांना १९५५ साली "अफगाणिस्थान" मध्ये केलेला "शो" आठवत होता. अफगाणिस्तानच्या "मोहम्मद झहीर शाह" या एका संस्थानाच्या (सल्तनतच्या) महाराजाकडे गाण्याचं निमंत्रण आलेलं तलतजींना! महाराजांकडे जाण्याआधी त्यांच्या अमात्य/मंत्री महोदयांनी त्यांना "दरबाराची" तमीज, तहेजीब ("प्रोटोकॉल") शिकवली तलतजींना! तलतजींनी महालात प्रवेश केला आणि मुजरा करणार मात्र! महाराजा "मोहम्मद झहीर शाह" (जन्म : १५ ऑक्टोबर, १९१४, मृत्यू : २३ जुलै, २००७) स्वतः सिंहासनावरून उठत तलतजींना आणायला दरवाजापर्यंत आले! त्यांना आलिंगन दिले आणि "एस्कॉर्ट" करत उच्च स्थानापर्यंत आणले. स्वतःच्या शेजारच्याच आसनावर बसण्याची अदबीने विनंती केली. तलतजी स्थानापन्न होताच, महाराजांनी आपल्या अंगरख्याच्या खिशातून गाण्यांची यादी काढली. त्यात तब्बल पंधरा - वीस गाण्यांचे "मुखडे"

मोडक्या तोडक्या उर्दूत लिहिलेले पाहून आसवे दाटली तलतजींच्या डोळ्यात! तलतजींनी समोरच्या आसनावर मांड ठोकून गायला सुरुवात केली.

आणखी काही आठवणी सांगायच्या तर.. ज्या संगीत दिग्दर्शकांनी पूर्वी तलतजींना उत्तमोत्तम गाणी दिली होती, ते आता इतर गायकांना पसंती देऊ लागले होते. एस. डी. बर्मन, ज्यांच्यासाठी तलतने 'जाये तो जाये कहाँ..' हे अजरामर गाणे गायले होते, मात्र, का कुणास ठाऊक! त्यांना 'जलते हैं जिसके लिए..' या करुण गाण्यासाठी मोहम्मद रफी हवे होते, आणि केवळ निर्माता/दिग्दर्शक बिमल रॉय यांच्या आग्रहामुळेच तलतजींना ते गाणे गाण्याची संधी मिळाली. आणि नंतर, जेव्हा दिलीप कुमार यांना 'मधुमती'मधील 'सुहाना सफर और ये..' हे गाणे तलत महमूदने गावे असे वाटले, तेव्हा तलतजींनी मोठ्या मनाने नकार दिला. त्यावेळी अत्यंत आर्थिक बिकट परिस्थितीत असलेल्या मुकेशजींना त्या चित्रपटाची गरज तलतजींपेक्षा जास्त होती. ही करुणासुद्धा तलतजींचा आणखी एक पैलू होता, जे नेहमीच आपल्या उदार स्वभावासाठी ओळखले जात असत! ही एक अशी कृती होती, ज्यामुळे मुकेशजींच्या डोळ्यात अश्रू आले होते!

१९६०च्या दशकापर्यंत परिस्थिती अधिकच बिघडली होती. या काळात तलतजींच्या आवाजाला जणू काही स्थानच उरले नव्हते. सलील चौधरींनी 'छाया' (१९६१) आणि 'प्रेमपत्र' (१९६२) साठी

त्यांच्याकडे धाव घेतली, मदन मोहन यांनी 'जहाँ आरा'साठी तलतजींचे नाव सुचवले आणि 'हकीकत' (दोन्ही १९६४ मध्ये) मध्ये त्यांचे मित्र व समकालीन मोहम्मद रफी, मन्ना डे आणि नवोदित भूपेंद्र यांच्यासोबत त्यांना 'होके मजबूर मुझे..' हे अविस्मरणीय गाणे दिले होते, तरीही तलतजींची कारकीर्द पुन्हा कधीच पूर्णपणे सावरली नाही. काही सामान्य चित्रपटांमधील एखादे गाणे वगळता, तलत महमूद यांनी चित्रपट संगीतातून जणू सन्मानपूर्वक निवृत्ती घेतली आणि आपल्या गैरफिल्मी रेकॉर्ड्स व 'लाइव्ह शोज'वर लक्ष केंद्रित करणे पसंत केले. अखेरीस प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना प्रसिद्धीपासून पूर्णपणे दूर जावे लागले.

(मित्रांनो.. "तलतजी" यांची जीवनगाथा सांगता सांगता.. समांतर जाणाऱ्या तत्कालीन घडामोडींबद्दल नक्कीच ऊहापोह करायलाच हवा, असं मला तरी प्रामाणिकपणे वाटतं. काही गोष्टींचा भले या "ई-बुक" मधील मूळ विषयाशी याचा काडीमात्रही संबंध नसेल परंतु त्या काळातील एकूण सर्वच चित्रपटातील संगीत हे खासच होते. हाच धागा पकडून काही गोष्टी आपलेपणाने सांगतोय. आपलेपणाने समजून घ्या, ही विनंती!

माझ्या १९६० साली जन्मलेल्या माझ्या पिढीच्या मनात अनेक आठवणी आहेत, त्यातली एक आठवण सांगायची तर. १९६० च्या त्या संगीताच्या सुवर्णकाळात.. अनेक चित्रपटाच्या संगीतातून अनेक उत्तुंग "संगीतशिल्पे" उभारली जात होती. आणि आम्हाला.. आम्ही

स्वतः अगदी बालवयात असूनही केवळ "रेडिओ" मुळेच ती आमच्या कानामनावर संस्कार करत होती. हे सत्य नाकारता येत नाही. बाय द वे.. हे केवळ "रुचीपालट" म्हणून सांगतोय, म्हणून समजून घ्या! यातून काय होईल? सन्मा. तलतजी यांच्या "कलाकिर्दीचा" लेखाजोखा मांडताना, आपल्या लाडक्या त्या "शहदची" मिठास असलेल्या "शहेनशहाची" तथाकथित "पिछेहाट" नेमकी कधी झाली, हा सर्वसामान्यांच्या मनातील प्रश्न आहे! म्हणून सांगतोय!

एक गोष्ट मात्र नक्की! आपल्या हृदयातील सर्व "थोर गायकांच्या" पूजनीय स्थानाला यत्किंचितही धक्का लागू न देता काही उदाहरणे देत केवळ आडमार्गाने "बदलती दुनिया, बदलते संगीत" यावर प्रकाश टाकण्याचा हा आटापिटा आहे, बरं का! ("चित्रपटातील" संगीताचं "सुवर्णयुग" संपले! असे, त्या काळातील अनेक बुजुर्गांचे अनेक लेख आमच्या पिढीने वाचलेत! खरं सांगतो, मला तरी खूप "चीड" यायची! त्या अमुक लेखातून अनेक "थोर" गायकांचे "अवमूल्यन" होतेय, असा नक्कीच "आभास" होत असे! अरे! तुम्हाला नाही आवडत मग ऐकू नका ना! लोकांना ऐकू दे! ते चांगले की वाईट ते ठरवतीलच ना!?)

"तलतजी, रफीसाहेब, मन्नादा, हेमंतदा, किशोरदा, मुकेशजी" यांसह अनेक गायकांच्या, अनेक गाण्यांनी आपल्याला "रिझवले" आहे, हा विषय तूर्तास बाजूला ठेऊया! तर माझ्या म्हणजे १९६० च्या

दशकात जन्मलेल्या माझ्या पिढीने अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत.

तुम्हाला "बाबला डिस्को दांडिया" आठवतोय!? दचकलात ना? येस! या "बाबला" याने आपल्या "डिस्को दांडिया" या सर्वच अल्बम्समधे जुन्या हिंदी चित्रपटातील गाण्यांची लयलूट केलेली आढळते. यात त्याने वापरलेल्या, त्या गाण्याच्या उल्लेखा सरशी माझ्या मनात तरी अनेक आठवणी ताज्या झाल्या! त्यांच्या "अल्बम्स" मध्ये जुन्या गाण्यांचा "इम्पॅक्ट" होता, यातच सर्व काही आलं!

तलतजी यांची देदीप्यमान कलाकीर्द भले "जहां आरा" नंतर उतरणीला आली असल्याचे आपल्या दृष्टिपथात येत असले, तरी का कुणास ठाऊक.. १९६४ नंतरच्या काळात अनेक सुप्रसिद्ध संगीतकारांनी त्यांच्या गायकीला अचानक नाकारायला सुरुवात केली होती, हे सत्य आहे! (भरजरी "जरतारी पैठणी"ला अडगळीत टाकून "मिनी-स्कर्टला" प्राधान्य देण्यासारखं होतं ते..!) पण "कालाय तस्मै नमः"! काळ बदलत होता. चित्रपटाच्या संगीतात "वेस्टर्न" संगीत वाद्यांनी गनिमी काव्याने केव्हाच शिरकाव केला होता! (पंचमदांचे "तिसरी मंझील" हे एकच उदाहरण पुरेय!)

"आप जैसा कोई मेरे.." या गाण्यामुळे भले १९८० साली आपल्या चित्रपट संगीतात "डिस्को" नावाचे वादळ आले. (मित्रांनो, तुम्हाला चित्रपट-संगीत या विषयातील "चित्रपट संगीत रसिक"

यांच्या एकूणच अभिरुची मधला बदल" याविषयी उत्सुकता असेल ना!? येस! तर यासाठी "डिस्को सेन्सेशन" आणि "संगीतकार ए. आर. रहमान" याच्या एकंदर कलाकिर्दीवर प्रकाशझोत टाकणारे माझे "संगीतकार ए. आर. रहमान" यांच्यावरील हे खास "ई-बुक" अवश्य वाचा, ही माझी नम्र विनंती! यातून तुम्हा रसिक वाचकांना बरेच काही हासिल होईल, यात शंकाच नाही!) अर्थातच त्या काळातील.. या बदलत्या अभिरुचीच्या प्रवाहामुळे.. आपल्या "तलतजी" यांच्या सारख्या "मधाळ" गायकाच्या कलाकिर्दीला उतरती कळा लागली, हे मात्र दुदैवी होते! पुढचा काळ हा "तलतजी" यांच्यासाठी नव्हताच! (या वादळात आपले लाडके गायक "मन्नादा" सुद्धा होते बरं का?) "डिस्को" या विषयावर आणखी अधिक सांगण्यात अर्थ नाही कारण, तो एका "प्रदीर्घ" लेखाचा विषय आहे! असो! तूर्तास इतकेच! तर.. आपण आपल्या मूळ विषयाकडे वळूया!)

ज्येष्ठ साहित्यिक आणि आमचे, आम्हा सर्व पत्रकारांचे खास जिव्हाळ्याचे "आयडॉल" सन्माननीय असे श्री. शिरीष कणेकरसाहेब यांनी त्यांच्या "गाए चला जा" या पुस्तकात उद्धृत केल्याप्रमाणे सांगायचं तर.. 'तस्वीर तेरी दिल मेरा..' हे गैरफिल्मी गाणं गाजल्यावर तलतजींना मुंबईत येण्याची निमंत्रणं मिळू लागली. याबाबतीत तलतजी सांगतात, "मी मुंबईला आलो आणि अनिल विश्वासजींचा 'येऊन जा' म्हणून निरोप आला. मी जाम टरकलो होतो! कारण अनिलजींचा दबदबाच तसा होता. मी गेलो नाही. अखेर तिसऱ्या

निरोपानंतर नाईलाज होऊन मी रेकॉर्डिंग रूममध्ये पाऊल ठेवलं नि अनिलजी गरजले, 'तू समजतोस कोण स्वत:ला? अजून एक देखील गाणं गायला नाहीस तोच भाव खायला लागलास? निरोप तरी किती पाठवायचे? मी इथे तुझ्यासाठी चाल बांधून ठेवलीय. 'हं, कर सुरु!' मी सुरु केलं पण त्या दिवशी गाण्याचा फज्जा उडाला. मी रडकुंडीला आलो होतो. मात्र अनिलजींनी मला दिलासा दिला, 'तू मनाला लावून घेऊ नकोस. पंधरा दिवसांनी ये. आपण गाणं रेकॉर्ड करून टाकू..' आणि बरोबर पंधरा दिवसांनी पहिल्याच टेकमध्ये गाणं ओके झालं. ते गाणं म्हणजे दिलीपकुमारच्या 'आरजू' चित्रपटातलं मजरुह यांचं गीत, 'ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल, जहाँ कोई न हो..." (पृ. ७९, गाए चला जा.)

तलतजी, त्यांना पुढे काही गाण्यांची सुद्धा आठवण सुद्धा करून देतात. 'आरजू' (१९५०) मधील गाणी गाजल्यावर पहिल्या दोनच वर्षांत ज्या गाण्यांमुळे तलतजींचं नांव भारतभर पसरलं, ती गाणी अशी.. 'अनमोल रतन' (१९५०) मधलं 'याद आनेवाले फिर याद आ रहे है..' (गीतकार दीनानाथ मधोक आणि संगीतकार होते विनोद! 'बाबुल' (१९५०)! 'मिलते ही आँखे दिल हुआ..' इत्यादी सर्व गाणी झकास होती. शायर शकील बदायुनी व संगीतकार होते नौशादजी! 'मदहोश' (१९५१) बद्दल सांगायचं तर.. 'मेरी याद मे तुम ना आँसू बहाना..' गीतकार राजा मेहदी अली खाँ व संगीतकार होते मदन मोहनजी! 'परछाई' (१९५१) बद्दल बोलायचं तर 'मुहब्बत ही न जो

समझे..' शायर होते नूर लखनवी व संगीतकार होते सी. रामचंद्रजी! असो! आठवणी दाटल्या आणि मी सुद्धा क्षणार्धात भावूक झालो, हे मात्र नक्की!

वरीलपैकी 'परछाई' चित्रपटात 'अपनी कहो, कुछ मेरी सुनो..' (लतादीदी व तलतजी) आणि 'कटते है दु:ख में ये दिन..' (हे लतादीदींचं 'आऊटस्टँडिंग' गाणं आहे बरं!) ही अन्य दोन उत्कृष्ट गाणीही होती. ती लिहिणारा शायर/गीतकार 'नूर लखनवी' (१९२६-२००३) हाही तलतजींप्रमाणे लखनौचाच होता! त्याचं खरं नांव कृष्ण बिहारी! 'सुबह का तारा' (१९५४) चित्रपटातही सी. रामचंद्रजी आणि तलतजी यांच्यासह त्याने उत्तम कामगिरी केली होती. पण पुढे त्याचं काय झालं कुणास ठाऊक! या गाण्यांव्यतिरिक्त 'हम है तेरे दिवाने, गर तू बुरा न माने..' हे 'शबिस्तान' (१९५१) मधलं तलतजी आणि गीता दत्त यांनी गायलेलं गाणंही जरूर ऐकण्या/पाहण्यासारखं आहे. श्याम आणि नसीम बानू (सायरा बानूची आई!) या देखण्या कलाकारांवर ते चित्रित झालंय. गीत.. शायर कमर जलालाबादी आणि संगीत सी. रामचंद्र! याच वर्षी आलेल्या 'सगाई' चित्रपटातील 'मुहब्बत में ऐसे जमाने भी आये..' हे राजेंद्र कृष्ण यांचं सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेलं गाणं तर आजही रसिकांच्या स्मरणात आहे!

संगीतकार खय्यामजींनी एक किस्सा सांगितला होता, तोही इथे देतोय! १९५० साली 'बीबी' चित्रपटातील 'अकेले मे वो घबराते तो होंगे..' गायक (मोहम्मद रफी) हे त्यांचं गाणं गाजल्यावर गीतकार

वलीसाहेब खूष झाले आणि आपली पत्नी मुमताज शांती हिचा पुढला चित्रपट त्यांनी खय्यामजींना दिला. (आता "धक्कादायक" गोष्ट सांगतोय! नक्की वाचा! आपल्या सर्वच संगीत रसिक वाचकांना नक्कीच माहीत नसेल म्हणून ही गोष्ट आपलेपणाने आणि अगदी सविस्तरपणे सांगतोय! "बीवी" (१९५०) या चित्रपटाविषयी "इंटरनेट" वरून उपलब्ध माहिती अभ्यासलीत तर त्यातील उल्लेखानुसार तिथे संगीतकार म्हणून चक्क "शर्माजी" आणि कंसात "खय्याम" असा उल्लेख आहे. हे कसे काय? आपण क्षणभर भांबवतो! परंतु एक रसिक अभ्यासक म्हणून अगदी खोलात गेलात तर "इंटरनेट" सुद्धा आपल्याला काही अंशी "कन्फ्युज" करते! ज्येष्ठ सन्माननीय संगीतकार "खय्यामजी" म्हणजेच.. "मोहम्मद जहूर खय्याम हाश्मी" यांचे "विकिपीडिया" पृष्ठ पाहिलात, तर त्यात "शर्माजी" असा कुठेही उल्लेख नाही!?? हे कसे काय? मात्र रसिक अभ्यासक म्हणून अधिक तपशिलात जाता.. कळते की १९४८ मध्ये "हिर रांझा" चित्रपटांमध्ये त्यांनी "पंडित अमरनाथ" (ज्यांचे ते "शागीर्द" होते!) यांच्यासह त्यांनी संगीत देताना, "संगीतकार" म्हणून त्या दोघांनी "शर्माजी-वर्माजी" असे "टोपण नाव" धारण केले होते. (कमाल आहे!) मात्र १९५३ च्या "फुटपाथ" या चित्रपटासाठी "खय्यामजी" यांनी स्वतंत्रपणे संगीत देताना त्यांनी तिथे "संगीतकार" म्हणून "खय्याम" अशा नावाचा स्वीकार केल्याचं आढळतं! बाप रे! त्यांनी हे सगळं काही त्या अमुक काळात भले स्वतःच्या सोयीनुसार केले असेल, परंतु आपल्या "खय्याम" या सन्माननीय संगीतकाराची

"जीवनगाथा" या विषयावर अगदी खोलात जाऊन अभ्यास करणाऱ्या अमुक "संशोधक/अभ्यासक" अशा तरुण लेखकांना ते किती "भयंकर" ठरले असेल? याची कल्पनाच करवत नाही! असो!) तर.. यानंतर हुरूप येऊन खय्यामजींनी “सिम्फनी” शैलीत एक वेगळ्याच प्रकारचं गाणं बनवलं. पण वलीसाहेबांनी ते नाकारलं. ते म्हणाले, “हे असले प्रयोग करण्याचं तुझं वय अजून यायचंय. तू तरुण आहेस. सध्या नौशाद किंवा गुलाम हैदरची गाणी ऐकून त्या शैलीतली गाणी तयार कर.” खय्यामजींना ते पटलं नाही. तो चित्रपट सोडून, ते बाहेर पडले. दोनच वर्षांनी झिया सरहादीचा ‘फुटपाथ’ (१९५३) नावाचा चित्रपट खय्यामना मिळाला त्यात त्यांनी हे गाणं वापरलं आणि ते जबरदस्त हिट झालं, ते म्हणजे ‘शाम-ए-ग़म की कसम..’ आज तलतजींच्या ‘माईलस्टोन’ गाण्यांपैकी ते एक मानलं जातं! (पृ. ७२-७३, ‘अनिल विश्वास ते राहुलदेव बर्मन’ हे पुस्तक!)

मात्र तलतजींच्या गाण्यांसाठी खय्याम, सरदार मलिक, जयदेव, स्नेहल भाटकर किंवा रोशन या संगीतकारांकडे अपवाद म्हणूनच पाहिलं पाहिजे. तलतजींना उत्तमोत्तम गाणी दिली ती अनिल विश्वास, सी. रामचंद्र, मदन मोहन आणि गुलाम महंमद यांनीच! आणि काही गाणी सर्वसामान्य माणसापर्यंत ती पोहोचवली ती शंकर-जयकिशन यांनीच! असे माझे तरी स्पष्ट मत आहे!

इथे आणखी एक धक्कादायक निरीक्षण सांगायला हरकत नाही! ओ. पी. नय्यरजींनीही काही गाणी तलतजींकडून गाऊन घेतली

होती. त्यापैकी 'मुझे देखो हसरत की तस्वीर हूँ मैं..' ('बाज' -१९५३) मात्र का कुणास ठाऊक! अनेक रसिकांना हे गाणं ओपीजींचं न वाटता अनिल विश्वासजींचं वाटतं! कारण ओपीची ती विख्यात शैली या गाण्यात चुकूनही दिसत नाही. मुद्दाम ऐकून पहा! या संदर्भात तलतजींच्या विविध भारतीवरील एका मुलाखतीची आठवण होते. 'रेणू बन्सल'ने तलतजींना विचारलं होतं, "चित्रपट सृष्टीत कोणत्या संगीतकाराबरोबर तुमचं ट्युनिंग विशेष जमलं ?'.. "याचं उत्तर कठीण आहे.." तलतजी म्हणाले होते, "उगीच अन्य संगीतकार रुष्ट व्हायचे. पण तरीही सांगतो, माझं सर्वात जास्त जमलं ते अनिल विश्वासजी यांच्याशी!.."

हिंदी सिनेमातून आपल्या मखमली स्वराने रसिकांच्या मनात मधाळ गीतांचा खजिना ज्या गायकाने रिता केला, त्या तलतजींनी मराठीत देखील काही गाणी गायली होती, हे तुम्ही जाणताच! त्यांच्या मराठीतील पहिल्या गाण्याचा किस्सा खूप मजेशीर आहे. १९६१ साली मराठीत एक चित्रपट आला होता, 'पुत्र व्हावा ऐसा!' याचे निर्माते होते दिनकर जोशी आणि दिग्दर्शक होते राजा ठाकूर! दिनकर जोशी प्रदीर्घ काळ दादामुनी (अशोककुमार) यांचे सचिव असल्याने हिंदी सिने सृष्टीसोबत त्यांचे अनेकांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. या चित्रपटाची गाणी पी. सावळाराम, बा. भ. बोरकर आणि डॉ. वसंत अवसरे (शांताबाई शेळके यांचे तत्कालिन टोपणनाव) यांनी लिहिली होती!

या चित्रपटात विवेक-जीवनकला ही जोडी होती. कथा, पटकथा आणि संवाद पी. सावळाराम यांचे होते. भावगीतांच्या दुनियेत पी. सावळाराम आणि वसंत प्रभू यांची 'युती' लोकप्रियतेचे नवे मापदंड उभारत होतीच. त्याचाच फायदा होईल, हा निर्मात्यांचा होरा होता. या चित्रपटातील पहिली चार गाणी ध्वनिमुद्रित झाली होती. परंतु नायकावर चित्रित होणारी दोन गाणी अद्याप व्हायची होती. सिनेमाचा नायक मराठीच्या त्या काळातल्या साचेबद्ध चौकटीच्या बाहेरचा असा हा शहरी, मध्यमवर्गीय होता. त्यामुळे त्याच्यावर चित्रित होणाऱ्या गाण्यासाठी एक वेगळा प्रयोग करावयाचे निर्मात्यांनी ठरवले. यासाठी त्यांनी तलतजींना विचारायचे नक्की केले.

पण, दिग्दर्शक राजा ठाकूर यांना मात्र ही कल्पना फार काही रुचली नाही. त्यांच्या मनात मात्र या गाण्यासाठी सुधीरजी फडके यांचा आवाज घ्यावा, असे वाटत होते; पण निर्मात्यांच्या हट्टापुढे राजाभाऊंचे काही चालले नाही. तलतजी पहिल्यांदा मराठीत आपल्या संगीतात गाणार म्हणून 'वसंत प्रभू' खूश झाले! तलतजींना विचारले, ते देखील आनंदले! फक्त माझ्या शब्दोच्चारासाठी अधिक मेहनत घ्या, अशी विनंती त्यांनी निर्मात्याकडे केली. मग 'वसंत प्रभू' रोज तलतजींना घेऊन फोर्टच्या एच.एम.व्ही. कार्यालयात जात. जिथे तलतजींना मराठी शब्द उच्चाराची शिकवणी घेणाऱ्यांत आपले श्रीनिवास खळेसाहेब देखील असायचे, बरं का! भरपूर रिहर्सल झाल्यावर ते समोरच्या 'ब्रिस्टॉल' हॉटेलमध्ये जेवायला जायचे.

तलतजी त्या काळात मुद्दाम सर्वांशी मराठीत बोलत असत. (मी घेतलेल्या "त्या" अमुक मुलाखतीमध्ये सुद्धा त्यांनी काही अमुक वाक्ये "मराठीत" बोलली होती. आमच्या संभाषणात त्यांनी "अळुवडी, पुरणपोळी, शिक्रण, पोहे, बटाटेवडे" यासह अनेक खास मराठी पदार्थांचा उल्लेख केलेला. त्यांची "स्वयंपाकीण" मराठी, त्यातही "मालवणी" असल्याने हे शक्य होतच, नाही का?) तर.. आपले गिरगावकर अभिनेते "जितेंद्र" आणि "राजेश खन्ना" अगदी आवेशात अस्खलित "मराठी" बोलतात ना! अगदी त्याच स्टाईलमध्ये तलतजी माझ्याशी मराठीत बोलले होते बरं का!? सलाम!!) तलतजींना मराठी शाकाहारी जेवण तर खूप आवडत असे. 'यश हे अमृत झाले..' हे गाणे आधी रेकॉर्ड झाले. त्या पाठोपाठ 'स्वप्ने मनातली का वाऱ्यावरी उडावी..' हे युगलगीत (सुमनताई कल्याणपूर यांच्यासोबत) देखील तयार झाले. नंतर दिनकर जोशींनी तलतजींना गाण्याच्या मानधनाबाबत विचारल्यावर, मोठ्या दिलाच्या तलतजींनी नम्रपणे नकार देत 'आप ने मेरे लिए, मराठी गीतोंका द्वार खोला है, यही मेरे लिए बहोत है!' असे म्हणत त्यांच्याप्रती कृतज्ञताच व्यक्त केली. हा सिनेमा १९६१ साली प्रदर्शित झाला. यातले 'जिथे सागरा धरणी मिळते..', 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती..' हे सुमनताईंचे गाणे देखील खूप लोकप्रिय ठरले! १९६१ सालचे सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचे पारितोषिक तलतजींना या सिनेमाकरिता मिळाले! तलतजींनी पुढे काही वर्षांनी संगीतकार वसंत देसाईसाहेब यांच्याकडे 'मोलकरीण'

(१९६३} चित्रपटासाठी 'हसले आधी कुणी? तू का मी?..' हे आशाताईंसोबत गाणे गायले.

या गाण्याबद्दलची आठवण दस्तुरखुद्द तलतजीनी सांगितलेली. आशाताईंसोबत गातोय यामुळे ते उत्साहात होते. संगीतकार वसंत देसाईसाहेब, गीतकार पी. सावळारामजी! पी. सावळारामजीनी गाण्याचा कागद तलतजी यांच्या हातात दिला. मराठीतला मजकूर पाहून ते स्तब्ध झाले. त्यांनी आशाताईंकडे पाहिले. आशाताई त्यांच्या शेजारी येऊन बसल्या. मग त्यांनी आशाताईंना एक एक ओळ वाचायला सांगितली. आणि ते एकीकडे ती रचना "इंग्लिशमध्ये" लिहून घेऊ लागले. लिहून होताच त्यांनी वसंत देसाईसाहेबांकडे पाहिले. "रिहर्सल" सुरू झाली! वसंत देसाईसाहेब "हार्मोनियमवर" एकेक ओळ गाऊन दाखवत होते. आशाताईंनी, गाण्याचा एकंदर "जॉनर" समजताच त्यांनी तलतजींना जणू शब्दोच्चार शिकवतात तशा शिकवू लागल्या. मध्येच पी. सावळारामजी यांनी मुखड्यातला "हसले आधि कुणी.." इथे "धि" ह्रस्व असल्याचं आवर्जून सांगितलं आणि "कुणी" मधला "णी" कसा उच्चारायचा ते समजावलं. तीन अंतरे आहेत म्हणता खरंतर धास्तावले होते तलतजी! पण आशाताईंनी त्यांना धीर दिला. मुखडा तसेच प्रत्येक अंतऱ्याची सुरुवात आशाताईच करणार आहेत म्हणता तलतजी काहीसे निश्चिंत झाले! गाणं सरळसोपं होतं खरं! पण तलतजी धास्तावलेलेच म्हणा ना! गाणं काही "टेक्स-रिटेक्स" नंतर आकाराला आलं! हुश्श! आपलं

हे गाणं मराठीतील "रमेश देव" आणि "सीमा" यांच्यावर चित्रित होणार आहे म्हणता तलतजी आनंदले होते. ("लिंक" दिलीय!) गाणं ऐकून!/पाहून हळवे झालात ना?!

तलतजींनी भारतातल्या जवळपास सर्व मुख्य भाषांमध्ये गाणी गायिली आहेत. सन्माननीय श्री. अनिल जोशी यांनी तयार केलेली तलतजींच्या गाण्यांची आकडेवारी अशी.. हिंदी चित्रपटातील गाणी– ४८१! अन्य भाषांतील व गैरफिल्मी मिळून– २६६! एकूण गाणी : ७४७!

श्री. अनिल जोशींच्या मते ७४७ च्या वर तलतजींनी एकही गाणं गायलेलं नाही. मग भले खुद्द तलतजी किंवा अन्य चाहते काहीही म्हणोत! मुख्य म्हणजे श्री.अनिल जोशी हे अनेकदा तलतजींवर दृकश्राव्य कार्यक्रम सादर करत असत. त्यांनी पुढाकार घेऊन तलतजींवर एखादं पुस्तक किंवा गीतकोश लिहिण्याचा अनेकांनी, अनेकदा आग्रह केला होता आणि त्यात विनामूल्य मदत करण्याची तयारीही दर्शवली होती. पण ते 'बघतो बघतो!' म्हणत राहिले आणि फेब्रुवारी २०१७ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचं आकस्मिक निधन झालं! त्यामुळे ते राहूनच गेलं.

मराठीच्या बाबतीत सांगायचं, तर तलतजींनी एकूण सात मराठी गाणी गायली आहेत. त्यांची यादी अशी..

१. 'यश हे अमृत झाले..' – 'पुत्र व्हावा ऐसा' – गीतकार : पी. सावळाराम – संगीतकार वसंत प्रभू.

२. 'स्वप्ने मनातली का..' (सुमन कल्याणपूर सह) – 'पुत्र व्हावा ऐसा' – डॉ. वसंत अवसरे – वसंत प्रभू.

३. 'हसले आधि कुणी, तू का मी ?..' (आशा भोसले सह) – 'मोलकरीण' – पी. सावळाराम – वसंत देसाई

४. 'घे झाकुन मुख हे चंद्रमुखी..' – भावगीत – वसंत निनावे – बाळ बर्वे

५. 'जेव्हां तुला मी पाहिले, वळूनी पुन्हा मी पाहिले..' – भावगीत – वसंत निनावे – बाळ बर्वे

६. 'ना खंत, नाही खेद..' – भावगीत.

७. 'खवळून उठले साती सागर..' – न प्रदर्शित झालेलं एक चित्रपट गीत. ("यु-ट्यूब"वर ऐकायला मिळतं.)

(या यादीमध्ये अमुक गाण्यांचे "गीतकार" म्हणून "डॉ. वसंत अवसरे" हे जे नाव दिसतंय ना! ते आपल्या मातृतुल्य ज्येष्ठ कवयित्री "शांताबाई शेळके" यांचे "टोपणनाव" आहे, याची कृपया नोंद घ्यावी. मात्र ते नक्की का धारण करावे लागले, याचा शोध घेता, "विकिपीडियावर" काही उलगडा झाला.. तो इथे देतोय!

"डॉ. वसंत अवसरे" हे प्रसिद्ध मराठी कवयित्री आणि लेखिका मातृतुल्य "शांताबाई शेळके" यांचे टोपणनाव (Pen Name) होते. याबद्दल महत्त्वाची माहिती सांगायची तर.. संबंधित "डॉ. वसंत अवसरे" हे मूळात सन्मा. शांताबाईंचे स्नेही (मित्र) होते! त्यांच्याशी

असलेल्या मैत्रीमुळे आणि आदरापोटी शांताबाईंनी आपल्या काही रचनांसाठी "डॉ. वसंत अवसरे" हे टोपणनाव म्हणून वापरले. ते नेमके का? हे त्यांचे त्यांनाच ठावे! मुख्य म्हणजे "सन्मा. शांताबाई शेळके" यांनी "याच" टोपणनावाखाली अनेक सुमधूर गीते आणि कवितांचे लेखन केले आहे! काही प्रसिद्ध रचना सांगायच्या तर.. 'रूपास भाळलो मी, भुललो तुझ्या गुणाला' हे गाजलेले चित्रपट गीत, त्यांनी 'डॉ. वसंत अवसरे' या नावानेच लिहिले होते. कृपया संगीत रसिक आणि अभ्यासकांनी याची नोंद घ्यावी, ही नम्र विनंती!) "घे झाकून मुख हे चंद्रमुखी.."! या गाण्याच्या केवळ उल्लेखासरशी अनेक आठवणी दाटल्या, थोरा मोठ्यांनी लिहून ठेवलेलं आठवलं!

आपल्याला (आमच्या म्हणजे याक्षणी वयाच्या 'पासष्टीपार' असलेल्या, किंवा आत्ता 'साठीत' असलेल्यांना कदाचित आठवत असेल..) की पूर्वी म्हणजे रेडिओच्या त्या दिवसात दर शनिवारी सकाळी आठ की साडे-आठला मुंबई 'ब' केंद्रावर 'भावसरगम' नावाचा गाण्यांचा एक खास कार्यक्रम सादर होत असे. ह्या कार्यक्रमाद्वारे अनेक नवीन गायक-गायिकांना गाण्याची संधी मिळून ते पुढे आपल्या कर्तृत्वामुळेच नावारूपास आले, हे मात्र नक्की!

ह्या कार्यक्रमाचं स्वरूप साधारणपणे असं असे की प्रथम गाण्यासंबंधी पूर्ण माहिती निवेदक किंवा निवेदिका देत असे. मग गीतकाराची, संगीतकाराची, गायक - गायिकेची थोडक्यात माहिती मिळत असे. मग नंतर प्रत्यक्ष गाण्याला सुरुवात होत असे. अर्ध्या

तासाचा हा कार्यक्रम असे. मग आम्ही एकीकडे शाळेत जायची तयारी करत असू. मला आठवतंय की संपूर्ण महिनाभर एकच गाणं लागत असे आणि मग नंतर पुढचा महिनाभर दुसरं गाणं! त्यामुळे श्रोते नवीन गाण्याच्या अगदी वेड्यासारखे प्रतीक्षेत असत आणि जीवाचा कान करून ते नवीन गाणं ऐकण्यासाठी अधीर होत. तीन-साडेतीन मिनिटांच्या 'ई-पी' रेकॉर्डप्रमाणे इथं गाण्यासाठी वेळेचं बंधन नसे. त्यामुळे गाणी पूर्ण स्वरूपात ऐकायला मिळायची. यातली काही गाणी नंतर थोडीफार कडवी वगळून ती तीन मिनिटांच्या रेकॉर्डमध्ये प्रसिद्ध होत असत. परंतु अशी बरीचशी गाणी अद्यापही आकाशवाणीच्या संग्रहात असावीत, ज्याच्या रेकॉर्ड्स न निघाल्यामुळे ती अज्ञातवासात आहेत. (इथे तुम्हाला मी आपुलकीने सांगू इच्छितो की, दुर्दैवाने म्हणा, परंतु.. "भावसरगम" या, त्या मस्त कार्यक्रमाच्या थेट "यू-ट्यूब" लिंक्स उपलब्ध नाहीत याचं मला मात्र मनोमन वाईट वाटतं! मी त्या "लिंक्स" शोधायचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु ते निष्फळ ठरले. एनी वे! परंतु सुदैवाने "सारेगमा कारवाँ" या शीर्षकांतर्गत बरंच काही हासिल होऊ शकतं. हे जाणवलं. या बद्दलच्या काही "लिंक्स" (जे काही सापडलं,) ते या "प्ले-लिस्ट" मध्ये देतोय. थोडक्यात सांगायचं तर, ते अवश्य पहा/ऐका/अभ्यासा! ही नम्र विनंती! हे भले.. "दुधाची तहान ताकावर भागवण्यासारखे असेल"! परंतु आपण एक रसिक म्हणून त्याचा आस्वाद घ्यायला काहीच हरकत नाही! होय ना!?) आणखी एक खास उदाहरण सांगायचे तर 'तुज कळले कां रे मी आले..' (गायिका.. 'कृष्णा कल्ले') हे गाणं रेकॉर्डिंग न झाल्यामुळे

बाहेर येऊ शकलं नाही. “यू-ट्युब”वर खूप शोधूनही हे गाणं सापडलं नाही. संथ आणि दीर्घ असं हे गीत पुन्हा एकवार ऐकण्यावाचून आमच्यासारखे रसिक श्रोते वंचित राहिले आहेत, हे मात्र नक्की! कुण्या कानसेनाला हे गाणं सापडल्यास त्यानं ते “यू -ट्युब”वर जरूर “अपलोड” करावं, कारण माझ्यासारखे अनेक रसिक श्रोते हे गाणं ऐकण्यासाठी अधीर झाले असावेत. असो!

मराठी भावगीतं लोकप्रिय होण्यामध्ये आकाशवाणी वरील 'भावसरगम' ह्या कार्यक्रमाचं लक्षणीय योगदान आहे. हा कार्यक्रम म्हणजे रेडिओचा एक अविभाज्य भागच होता. ह्या कार्यक्रमातली गाणी, ती गायलेले गायक - गायिका, संगीतकार, गीतकार हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. अनेक नवीन कलाकार ह्या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रकाशात आले! (या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेमुळेच, कदाचित पुढे 'पं. ह्रदयनाथजी आणि अरूण दातेजी' यांनी त्यांच्या कार्यक्रमाचे 'भावसरगम' हे शीर्षक ठेवले असावं, नाही का? ह्या कार्यक्रमात लोकप्रिय

झालेली गाणी नंतरच्या काळात 'एचएमव्ही' कंपनीने

रेकॉर्ड करून घेतली आहेत!

तर सांगायचा मुद्दा असा की ह्या 'भावसरगम' कार्यक्रमाद्वारे अशाच त्रयीचा उगम झाला. ह्या त्रयी म्हणजे गीतकार वसंत निनावे (आपल्या रोहिणी निनावेचे वडील), संगीतकार सी. रामचंद्र आणि

गायक तलत महमूद! ह्या त्रयीनी दिलेली गाणी म्हणजे 'घे झाकून मुख हे चंद्रमुखी', 'जेंव्हा तुला मी पाहिले..' इत्यादी!

(गीतकार वसंत निनावे यांची कन्या 'रोहिणी निनावे' ही एक भारतीय संवाद लेखिका आहे जी मराठी चित्रपटसृष्टीतील तिच्या कामांसाठी प्रसिद्ध आहे! नवोदित दिग्दर्शक विक्रम फडणीस यांनी दिग्दर्शित केलेल्या २०१७ च्या 'हृदयांतर' या मराठी भाषेतील नाटकाशी ती संबंधित आहे. अनेक मराठी वाहिन्यांवरुन सर्व परिचित झालेलं एक नाव, हस-या चेह-याची अभिनेत्री म्हणून आणि नंतर पटकथाकार म्हणून सर्वश्रुत झालेली रोहिणी निनावे!')

गीतकार वसंत निनावे यांच्या बाबतीत आमचे परममित्र "श्री. संजीव वेलणकर" (जे विशेष कलावंत/संगीत क्षेत्रातील सर्वच्या सर्व दिग्गज, यांच्या बद्दलच्या समग्र माहितींचा खजिना, ज्यांच्याकडे आहे, असे आमचे लाडके परममित्र! जणू आधुनिक "चित्रगुप्त"च!!) त्यांनी सन्मा. श्री. "वसंत निनावे" साहेबांबद्दल जे काही लिहिलेय, ते त्यांच्याच शब्दात इथे उद्धृत करत आहे! अवश्य वाचा, ही विनंती!)

गीतकार वसंत निनावे : जन्म. ६ ऑक्टोबर १९३० भंडारा येथे! वसंत निनावे यांनी भंडाऱ्या सारख्या लहान शहरामधून मुंबईला येऊन सुरवातीच्या काळात अतिशय संघर्ष केला. वसंत निनावे यांनी आकाशवाणी साठी अनेक श्रुतिका लिहिल्या.त्या श्रुतिका नीलम प्रभू, बाळ कुडतरकर यांच्या सारख्या दिग्गज रेडिओ कलाकारांनी सादर केल्या होत्या. पुढे याच श्रुतिका 'आकाशप्रिया' या नावाने त्या पुस्तक

रूपात प्रसिद्ध झाल्या, आणि या पुस्तकाला राज्य शासनाचा विशेष पुरस्कार प्राप्त झाला होता. तसेच वसंत निनावे त्यांनी असंख्य रेडिओ प्रोग्राम्स लिहिले, अनेक भाषांतरं केली. वसंत निनावे यांचे मराठी सोबतच हिंदी, इंग्लिश, संस्कृत या ही भाषांवर प्रभुत्व होतं. चायनीज गाणीसुद्धा हिंदी मध्ये डबिंग साठी त्यांनी लिहून दिली होती. वसंत निनावे यांनी लिहिलेली गीतं यशवंत देव, दत्ता डावजेकर, बाळ बर्वे, एन. दत्ता, सी.रामचंद्र, रंजना प्रधान, सुधीर फडके अशा अनेक संगीतकारांनी संगीतबद्ध तर लता मंगेशकर, आशा भोसले, मन्ना डे, सुमन कल्याणपूर, तलत महमूद, रामदास कामत, वाणी जयराम यांसारख्या मोठ्या गायकांनी गायिली आहेत. 'पोरकी' या मराठी चित्रपटातील सर्व गाणी वसंत निनावे यांनी लिहिली होती. काही कारणांनी त्यांना 'मैं तुलसी तेरे आंगन की' हा राज खोसलाचा चित्रपट त्यांना सोडावा लागला होता!

'शिवरायांचे आठवावे रूप' हे नाटक वसंत निनावे यांनी लिहिलं. यात नयन भडभडे म्हणजेच रीमा लागू यांनी सोयराबाईंची भूमिका केली होती. या सोबतच त्यांनी 'अधांतर' आणि 'बैजू बावरा' ही नाटके ही लिहिली, ज्यात प्रकाश घांग्रेकर आणि अजित कडकडे यांनी भूमिका केल्या होत्या. लहान मुलांच्या साठी म्हणून 'राजपुत्र ठकसेन', 'गोल गोल राणी', 'नानांची टांग' सारखी नाटकं त्यांनी लिहिली.

वसंत निनावे यांनी लिहिलेली तीन गाणी HMV करता रेकॉर्ड केली गेली होती. १) ना खंत नाही खेद , २) घे झाकुन मुख हे.. ३) जेव्हां तुला मी पाहिले .... याचे संगीतकार होते बाळ बर्वे व गायक होते त्या काळातील मखमली आवाजाचा हिंदी गायक/अभिनेता तलत महमूद! ती गाणी १९७०-७१ साली मराठीत वैशिष्ट्यपूर्ण ठरली. वसंत_निनावे यांचे निधन १० जून १९८८ रोजी झाले!

मध्यंतरी योगायोगाने ज्येष्ठ लेखक "श्री. विनायकराव जोशी" यांचा एक अतिशय सुंदर, माहितीपूर्ण असा लेख माझ्या वाचनात आला होता. तो लेख तलतजी यांचे निस्सिम "चाहते" तसेच "सिनेसंगीत अभ्यासकां साठी" इथे मी तो मुद्दाम सविस्तरपणे देत आहे. खरं सांगायचं तर इतरत्र अभावानेच आलेला असा अमुक मजकूर माझ्या/तुमच्या ज्ञानात नक्कीच भर घालेल यात शंकाच नाही! सलाम लेखकांना!

तलतजी यांच्या सारख्या अमराठी गायकाकडून तत्कालीन संगीतकारांनी खूप चांगली गाणी गाऊन घेतली आहेत हे आपणा सर्व सर्व रसिकांचं सौभाग्य! अतिशय तरल, मखमली स्वर असलेल्या ह्या गायकाच्या आवाजाचा उपयोग काही निवडक मराठी गाण्यांसाठीच केला असला तरी ही सर्व गाणी श्रवणीय आणि अजरामर झाली आहेत. तलतजी यांचं वैशिष्ट्य आणि मनाचा मोठेपणा असा की अप्रसिद्ध संगीतकाराकडेही त्यांनी मराठी गाणी गायली आहेत. संगीतकार "बाळ बर्वे" यांचं नांव आपणांप्रमाणेच मीही प्रथमच ऐकलं

होतं आणि मग त्यांच्याविषयी उत्सुकता चाळवली गेली! तलतजी यांनी गायलेली ही गाणी पूर्वी कधीतरी रेडिओवर मी ऐकली होती पण त्याच्या संगीतकाराचं नांव मात्र प्रथमच समजलं! अशा नवख्या आणि नवोदित संगीतकाराकडे तलतने गाऊन आपल्यासारख्या रसिक श्रोत्यांवर खूपच उपकार केले आहेत. बाळ बर्वे ह्यांचं मूळ नांव आहे गंगाधर नारायण बर्वे. ते मूळचे अलिबाग जवळच्या नागावचे. परंतु नंतर काही कारणास्तव ते नाशिकमध्ये स्थिरावले. त्यांचा जन्म ९ जून १९३६ चा. त्यांच्या घरात संगीताचे वातावरण तर अजिबात नव्हते. बाळ बर्वे ह्यांना त्यांच्या मुंजीत भेट म्हणून एक बासरी मिळाली होती. मग काय! बासरीवादनाची त्यांना आवड निर्माण झाली आणि हळूहळू त्यांना बासरी वाजवणे चांगलेच जमू लागले! त्यांच्या घरी मात्र त्यांना बासरीवादनासाठी विशेष प्रोत्साहन मिळालं नाही. बी. ए. पर्यंत शिक्षण झाल्यानंतर ते नोकरीसाठी मुंबईत आले. मुंबईत त्यांना बासरीवादनामुळे संगीतक्षेत्रात कामं मिळू लागली. पं. पन्नालाल घोष ह्यांच्या बासरीवादनाचा त्यांच्यावर प्रभाव असल्यानं त्यांची, गायकी अंगाने जाणारी वादनशैली त्यांनी आत्मसात केली होती!

संगीतकार सुधीर फडके यांच्याकडे त्यांना प्रथम बासरीवादनाची संधी मिळाली. नंतरच्या काळात नावाजलेल्या इतर अनेक "जिनियस" मराठी - हिंदी संगीतकारांकडेही त्यांना 'संगीत सहाय्यक' म्हणून कामं मिळू लागली. याच सुमारास त्यांनी स्वतःही गाणी संगीतबद्ध करण्यास सुरुवात केली! सर्वसाधारणपणे गाण्याची

चाल बसवताना हार्मोनियमचा वापर जास्त केला जाई, हे आपण जाणताच! परंतु बर्वे मात्र त्यासाठी चक्क बासरीचा उपयोग करीत. सुदैवाने पुढील काळात त्यांना आकाशवाणीवर स्वतंत्र संगीतकार म्हणून काम मिळायला लागलं. आकाशवाणीवरील त्यांच्या या अमुक कारकिर्दीत त्यांनी अगणित गाणी केली. जवळपास चाळीस ते पन्नास गायक - गायिकांकडून त्यांनी आकाशवाणीसाठी गाणी गाऊन घेतली असतील, हे विशेष! याच काळात बाळ बर्वे - वसंत निनावे - तलत महमूद ही त्रयी जमून आली आणि त्यांची 'घे झाकून मुख हे चंद्रमुखी..' आणि 'जेंव्हा तुला मी पाहिले..' ही दोन मस्त गाणी रेकॉर्ड झाली आणि ती चांगलीच लोकप्रिय ठरली! ह्या रेकॉर्ड्सच्या खपाचा चक्क उच्चांक झाला. हिंदी चित्रपटसृष्टीत तलतजी यांनी आपलं कर्तृत्व सिद्ध करून चांगलंच नांव कमावलं होतं. त्यांच्या आवाजातील ते खास कंपन, तो विशिष्ट थरार आणि तरल व मखमली स्वर ह्या त्यांच्या गुणांनी त्यांनी श्रोत्याच्या मनावर अधिराज्य स्थापित केलं होतं. असा हा आवाज मराठी भावगीतांना मिळाला आणि या गाण्यांचं सोनं झालं. 'घे झाकून मुख हे चंद्रमुखी..' या वसंत निनावे ह्यांच्या गाण्यातील मुखड्यात येणाऱ्या 'दृष्ट ' ह्या शब्दाला अनुकूल असे अंतऱ्यातील ' दुष्ट, पुष्ट, ओष्ठ, उद्दिष्ट, रुष्ट, पथभ्रष्ट' सारखे कठीण शब्द या अमराठी गायकाकडून गाऊन घेणे हे एक मोठं कसब होतं. पण तलतजींनी हे सहज निभावून नेलं. अंतऱ्यातील ह्या प्रत्येक शब्दाच्या पुढे 'सखी' हा शब्द आला असून त्यावर त्यांनी जो सहजच 'पॉज' घेतलाय त्याला तर तोडच नाही! ह्या सगळ्या शब्दांमध्ये

पोटफोड्या 'ष' आहे. त्यामुळे आपल्याला माहिती असेलच की हा 'ष' उच्चारणे किती कठीण आहे ते! मराठीमध्ये ते फक्त सुधीर फडके आणि श्रीधर फडके ह्यांनाच उत्तमपणे जमलं आहे! तसेच पहिल्या अंतऱ्यातील 'अर्धामुर्धा' हाही असाच एक कठीण शब्द. तलतसाठी ही सर्व शाब्दिक कसरत असली तरी त्यांनी गातांना ह्या गाण्याचा भावनिक आत्मा ओळखून गाण्यातील ह्या सर्व गोष्टी उत्तम जपल्या आहेत. अर्थात तीच तर त्यांची खासियत आहे आणि म्हणूनच हे गाणं गाजलं. तसेच 'जेंव्हा तुला मी पाहिले..' ह्या गाण्याबद्दल असंच सांगता येईल. ह्या गाण्यातील 'वळूनी पुन्हा मी पाहिले' ही ओळ म्हणजे एक खास बात आहे. 'वळूनी' हा शब्द तलतकडून चार वेळा गाऊन घेतला आहे. 'वळूनी' आणि 'पुन्हा पुन्हा' हे त्यातले मर्म आहे.

आकाशवाणीसाठी बाळ बर्वे ह्यांच्या संगीत दिग्दर्शनात अनेक गायक - गायिकांनी असंख्य गाणी गायली आहेत. त्यापैकी काही नावं म्हणजे कुमुद भागवत, रजनी जोशी, विठ्ठल शिंदे, कुसुम सोहनी, कुंदा बोकील, निर्मला गोगटे, प्रमिला दातार, कृष्णा कल्ले, पं. रामदास कामत, के. जैस्वाल, पं. रवींद्र साठे, वंदना खांडेकर, सुधीर फडके, माणिक वर्मा, पं. सुरेश वाडकर, चंद्रशेखर गाडगीळ, पं. अजित कडकडे, भीमराव पांचाळे, अनुराधा पौडवाल, हरिहरन, अनुप जलोटा, अपर्णा मयेकर (पूर्वाश्रमीची रेखा डावजेकर), देवकी पंडित, पुष्पा पागधरे, अरुण दाते इत्यादी होत. कोंकणी भाषेतही काही गाणी बाळ बर्वे ह्यांनी संगीतबद्ध केली आहेत. कर्णबधिर मुलांसाठीच्या

मुंबईतील 'अलीयावर जंग' ह्या संस्थेसाठी त्यांनी संगीत दिलेलं आणि चंद्रशेखर गाडगीळ ह्यांनी गायलेलं 'कानानं बहिरा मुका परी नाही..' हे गीत त्याकाळी खूपच प्रसिद्ध झालं होतं.

बाळ बर्वे ह्यांची कन्या सुचित्रा भागवत, जामात माधव भागवत, दुसरी कन्या अश्विनी कुलकर्णी तसेच सुपुत्र हेमंत बर्वे हे सर्व कुटुंबीय गायन, संगीत, अभिनय, निवेदन ह्या विविध कलाक्षेत्रात सक्रिय आहेत. बाळ बर्वे आणि वसंत निनावे ह्या जोडीने आपणांस उत्तम भावगीतं दिलेली आहेत. त्यांना येऊन मिळाला आहे तो तलतचा तरल स्वर!

(टीप : विनायक जोशी ह्यांच्या लेखावर आधारित !)

वरीलपैकी खुद्द तलतजींच्या साईटवर आणि 'आठवणीतली गाणी' या साईटवर अनुक्रमे ६ व ५ ही गाणी दाखवली आहेत. पण 'यु-ट्यूब' किंवा अन्य कुठेही मला ती ऐकायला मिळू शकली नाहीत.

मुख्य सांगायची गोष्ट म्हणजे गाणी इंग्रजीत लिहून घेऊनही तलतजींनी मराठी उच्चार बरोबर केले आहेत. उदा. 'हसले आधि कुणी' गाण्यात 'आधि' आणि 'कुणी' चे उच्चार किंवा 'जेव्हां तुला मी..' या गाण्यात 'वळुनी' शब्दाचा उच्चार जसा करायला हवा तसाच त्यांनी केला आहे. त्याचप्रमाणे 'त्या वेडाचा तू अर्थ सांगता..' या ओळीत 'वेडाचा' या शब्दाचा उच्चार त्याने कुठल्याही अस्सल मराठी माणसाप्रमाणेच अचूक केला आहे. (हल्ली इंग्रजी माध्यमातल्या मराठी मुलांनाही असे उच्चार करता येत नाहीत.) उत्कृष्ट उच्चारांसाठी

प्रसिद्ध असणाऱ्या मुकेशजींनाही हे मराठी उच्चार जमले नव्हते. पण मेहनत घेऊन तलतजींनी ते जमवले याबद्दल तलतजी आणि त्या त्या गाण्यांच्या गीत-संगीतकारांना धन्यवाद दिले पाहिजेत. पं. हृदयनाथ मंगेशकरांच्या सुरुवातीच्या मराठी गाण्यांवर तलतजींचा प्रभाव असावा असं मानायला जागा आहे! उदाहरणार्थ 'अशी निशा पुन्हा कधी..' हे ('कामापुरता मामा' चित्रपटातील) पं. हृदयनाथांचं गाणं नक्की ऐका.

तर.. तलतजींनी मराठीत फार काही गाणी गायली नाहीत; पण जितकी म्हणून गायली ती आजही लोकप्रिय आहेत!

लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी १९७१ सालच्या 'वो दिन याद करो' या चित्रपटात लतादीदी मंगेशकर यांच्यासोबत एक सुमधुर युगलगीत संगीतबद्ध केले होते. ('मुहोब्बत की कहानियाँ..') जे त्यांचे हिंदी चित्रपटांमधील शेवटचे गाणे ठरले! त्यानंतर १९८७ साली 'वली-ए-आज़म' या उर्दू चित्रपटात 'हेमलता' यांच्यासोबत त्यांचा आवाज ऐकू आला होता. (संगीतकार: चित्रगुप्त)

(मित्रांनो.. मी इथे थोडासा "पॉझ" घेत अगदी वेगळीच माहिती सांगतोय! लक्षात घ्या.. ही माहिती आपल्या "सन्मा. तलतजी" यांच्या संबंधित अजिबात नाहीय. आपण पाहिलंय की आपल्या तलतजीनी सन १९८७ नंतर आपले "पार्श्वगायन" पूर्णतः थांबवले होते, हे आपण लक्षात घेतले. असो! तुम्हाला माहीतच आहे. या आसपासच्या काळात

"डिस्को सेन्सेशन" या प्रकाराने अचानक डोके वर काढले होते! (मित्रांनो.. हे विषयांतर नाहिय, "फॅक्ट्स" स्पष्टपणे सांगतोय!) उदाहरणार्थ सांगायचे तर.. "पाकिस्तानच्या" त्या "हसन जहांगीर" या गायकाचं "हवा हवा खुशबू लुटा दे.." या गाण्याने अक्षरशः कहर केला होता! (हे मूळ 'पाकिस्तान' मधलं वादळ, व्हाया "दुबई" इथे थडकले होते. "कॅसेट्स"चा जमाना डोकं वर काढत होता. १९७५-७६ दरम्यान इथले 'कोकणी मुसलमान" तसेच आपले काही हिंदू बांधव नोकरीनिमित्त दुबई, ओमान, कतार, अबुधाबी वगैरे विभागात नोकरी निमित्त गेलेले होते. त्यांनीच तिथल्या "थॉमसन इलेक्ट्रॉनिक्स" तर्फे सादर झालेल्या "सोनी" कंपनीच्या कॅसेट्सवर, हिंदी चित्रपट संगीताबरोबरच "पाकिस्तानी" संगीताच्या "कॅसेट्स" सुद्धा बिनधास्त वितरित केल्या होत्या. त्या लोकांनीच त्या "कॅसेट्स" आणि "कॅसेट प्लेअर्स" आपल्या देशात आणल्या, याची ठळकपणे नोंद घ्या. "हवा हवा.." ते "जिये भुट्टो बेनझीर.." हा प्रवास आम्ही अनुभवला आहे. माझ्या स्वतःच्या "दुबईसह" इतर विभागातील "टूर" मध्ये मी हे "स्टोअर्स" मी स्वतः पाहिलेत! (बाय द वे.. "डिस्को" तसेच "डीजे" नामक प्रकाराची संपूर्ण माहिती घेण्याची उत्सुकता असल्यास, माझे "डीजे जल्लोष - म्हणजे नेमकं काय!" हे आपल्या "ई साहित्य प्रतिष्ठान" तर्फे नुकतेच प्रकाशित झालेले माझे "ई बुक" नक्कीच वाचा!, ही नम्र विनंती!) मी त्यांची कार्यपद्धती अभ्यासलीय. मुख्य म्हणजे त्या अमुक काळात "कॉपीराइट्स" वगैरे बाबतीत आपली "म्युझिक इंडस्ट्री" तितकीशी सजग झाली नसावी. "कॅसेट्स" क्षेत्रात

तर "कुणीही यावे, टिचकी मारुनी जावे.." अशी अवस्था होती. त्यामुळेच चक्क "लॅमिंग्टन रोड" पोलिस स्टेशनसमोरच्या फुटपाथवर, अशा कॅसेट्सचा खुले आम बाजार मांडलेला दिसे.) त्या अशा अनेक कॅसेट-अल्बम्सचं अशा प्रकारे आगमन, त्याचा एकंदर खप वगैरे सर्व बाबी थक्क करणाऱ्या होत्या. आपल्या "म्युझिक इंडस्ट्रीमध्ये" त्याचा खूपच परिणाम झाला होता! मी "व्हीनस म्युझिक कंपनीमध्ये" एक "म्युझिक इन्चार्ज" या पदावर कार्यरत असल्याने हे अचानक आलेलं "डिस्को सेन्सेशन" आमच्या एकंदर सर्वच "म्युझिक कंपन्यांसाठी" तर थक्कच करणारे होते! प्रत्यक्ष अनुभवले आहे! मुख्य म्हणजे सर्वच "म्युझिक कंपन्यांना" तसे काही जबरदस्त करावे असं वाटणं तर स्वाभाविकच होते. (गंमत म्हणजे "हसन जहांगीर" चा "हवा हवा.." या गाण्यासह सादर केला गेलेला हा "अल्बम" कोणत्याच "अधिकृत" कंपनीचा नव्हता! कुणीतरी "दुबई" मधल्या "थॉमसन इलेक्ट्रोनिक्स" कंपनीची ती "सोनी" कंपनीची ती "कॅसेट", इथे आणली होती. बस्स! या "अल्बमचा" कुणी माता पिता नसल्याने जवळजवळ सर्वच म्युझिक कंपन्यांनी, "बाप का माल" समजत आपल्या "डुप्लिकेट लेबलवर" त्या "कॅसेट्स" मार्केटला टाकल्या होत्या!) बरं हे इथे थांबेल तर शपथ! एकीकडे सगळे संगीत विश्वातले सगळेच कलावंत अगदी सच्च्या मनाने आपले "सांगीतिक काम" अगदी प्रामाणिकपणे करत होते. मात्र आमच्या इंडस्ट्रीतले एकंदर सर्वच गीतकार, गायक, संगीतकार, वादक आणि जवळजवळ सर्वच धास्तावले होते. केवळ.. ही वाईट वेळ सुद्धा जाईल, "अच्छे दिन आएंगे" अशा आशेवर अगदी

सर्वचजण होते. अगदी जिनियस "संगीतकार", "संगीत संयोजक", आणि "जिनियस" वादक सुद्धा! हे सगळं काही घडत होतं खरं.. पण दुसरीकडे भलतंच काही आकाराला येत होतं. नव्या नव्या "कॉन्सेप्ट्स" डोकं वर काढत होत्या. नवनवीन "इन्स्ट्रुमेंटस" येऊ लागली होती. मग काय! सगळीकडे "बदला"चा माहौल दिसू लागला होता. एखादी गोष्ट नव्याने आल्यावर.. "जुन्या गोष्टी, कात टाकताहेत" असं म्हटलं जातं ना!? तसं इथे अजिबात नव्हतं! म्हणजे सन्मा. गायक प्रभृती "दिवंगत कुंदनलाल सैगल, सी. एच. आत्मा, अण्णा चितळकर" वगैरे ज्येष्ठांची सद्दी केव्हाच संपली असली तरीही, त्याक्षणी हयात असलेले हेमंतदा, तलतजी, मन्नादा, रफीसाहेब, मुकेशजी इतकेच नव्हे तर किशोरदा सुद्धा हे सगळं विमनस्क अवस्थेत, हे स्थित्यंतर खरं तर धास्तावलेल्या मन:स्थितीत न्याहाळत होते. "डिस्को" ला पुरक असे वातावरण तयार होत होतं. या परिस्थितीचा फायदा घेत अनेक जणांनी "म्युझिक कंपन्यांना" जणू आमिष दाखवत, उपलब्ध झालेल्या नवनव्या "इन्स्ट्रुमेंट्स" च्या आधाराने नव्या संकल्पना आणायचा जणू सपाटाच लावला. "एको-स्टिरीओ", "झंकार बिट्स", "डीजे", "रिमिक्स", "नॉन-स्टॉप सेन्सेशन" वगैरे जुन्याच गाण्यांना नव्याने सादर करण्याचा सपाटाच लावला. "सस्पेस सिनेमातली", ("झूम झूम ढलती रात..", "गुमनाम है कोई.." इत्यादी) गाणी "हाऊंटिंग मेलडीज" असे "लेबल" देत वर त्याला "डिस्को किक्स" नावाची वस्त्रे चढवत आणली. "मस्ती भरे गीत" नावाखाली "धमाल मस्ती" असलेली गाणी आणली!

सुरुवातीला हे "कांड" पायरसी प्रकारात सादर झाले होते, पण नंतर असे काम अनेक "म्युझिक कंपन्यांनी" सुद्धा "डुप्लिकेट लेबल" देत सादर केले. कसले "अच्छे दिन आएंगे!"? सगळं मुसळ केरात! या कालावधीत अशाप्रकारे सादर झालेल्या या अनेकविध "अल्बम्स" मध्ये ठळकपणे सांगायचं तर आपल्या सन्माननीय "तलतजी" यांची कोणतीही गाणी नव्हती. ही गोष्ट मनाने अत्यंत हळव्या मनोवृत्तीच्या "तलतजी" यांच्या जिव्हारी लागणं तर स्वभाविकच होतं. (मुख्य म्हणजे ही खंत आपल्या सन्मा. "मन्नादा" यांनी सुद्धा त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखतींमध्ये मला आपुलकीने सांगितलेली, हे विशेष!)

तर. मूळ विषयाकडे वळताना. तलतजीच" नव्हे तर "मोहम्मद रफी", "किशोरदा" "मन्नादा" सुद्धा खरंतर धास्तावले होते म्हणतात! अर्थात आपले "चतुरस्र किशोरदा" शांतपणे ती स्थित्यंतरे न्याहाळत असावेत. मग त्यांचे "मोहम्मद रफी" यांनी अनुकरण केले असावे, यात शंकाच नाही! "तलतजी" यांचा पिंड मात्र वेगळाच होता. असले, म्हणजे सर्वार्थाने वेगळे असे "डिस्को सेन्सेशन" मधले गाणे, गाणे तर दूरच, त्यांच्या नावाचाही कुणी विचार केला असेल तर शपथ! संगीतकारांपैकी म्हणायचं तर त्या काळात हयात असलेल्या पैकी नौशादजी यांच्यासह ज्येष्ठ आणि श्रेष्ठ संगीतकार भांबावून गेले नसतील तर नवलच! पण आमच्या म्हणजे सध्या वयाच्या पासष्टीपार पिढीच्या अवलोकनानुसार यात "लक्ष्मीकांत-प्यारेलाल" आणि

"कल्याणजी-आनंदजी" (यांच्याकडे तर सख्खा भाऊ "बाबला" हा "व्हिदम किंग" होता!) हे मात्र शांत राहिले! अभ्यास करत राहिले!

"कल्याणजी आनंदजी" यांनी पुढे "कुर्बानी" (१९८०) मधून "आप जैसा कोई मेरे.." (संगीत : बिद्दु) या गाण्यातून भारतीय चित्रपट संगीतात पहिला "डिस्को" आणला, हे सर्वश्रुतच आहे! तर दुसरीकडे "लक्ष्मीकांत प्यारेलाल" यांनी "कर्ज" (१९८०) मधून "डिस्को" ची गाणी आणून, "डिस्को" आपण सुद्धा सादर करू शकतो हे ठणकावून दाखवून दिलं. शिक्कामोर्तब केलं! (तुमच्या ध्यानात एक गोष्ट नक्की आली असेल! मी "भप्पी लाहिरी" यांचा इथे उल्लेख केलेला नाहीय! त्यांच्याबद्दल खचितच अत्यंत आदर आहे! पण खरं सांगायचं तर त्यांची "मदार" ही केवळ आणि केवळ आपले "अनिल-अरुण" (अनिल मोहिले आणि अरुण पौडवाल) यांच्यावर असायची! हे मी पूर्णत: जाणतो! "भप्पी लाहिरी" यांची संगीतकार म्हणून त्यात "संकल्पना" जरूर असेल, पण माझी पिढी, त्यांच्या सादरीकरणाचे संपूर्ण श्रेय हे "अनिल-अरुण" या जोडगोळीलाच देईल! "के पग घुंगरू.." हे एकच उदाहरण पुरेय!) लक्षात घ्या! "दर्द-ए-दिल.." या गाण्याचं काव्य तर चक्क "ग़जल" अंगाने जाणारं! पण त्याची "पेशकश" ? ती चक्क "डिस्कोच्या" अंगाने जाणारी आहे. हा सर्व "नजारा" अगदी "स्थितप्रज्ञांप्रमाणे" पाहणाऱ्या "तलतजी" यांना तो एकंदर काळ किती वेदनादायी झाला असेल, हे त्यांच्या प्रत्येक रसिकांना नक्कीच जाणवले असेल.

मित्रांनो, मनापासून सांगायचं तर कोणताही किंवा कोणत्याही "क्षेत्रातील कलावंत" हा मनाने अत्यंत हळवा असतो! तो आपल्या मनातील "भावभावना" भले कधीकधी बिनधास्त व्यक्त करत असतो, हे आपण पाहिलेय. परंतु आपल्या "संगीतातील" अनेक सन्माननीय कलावंतांनी, आपली किंवा आपल्या स्वतःच्या मनात खदखदणारी खंत कोणत्याही प्रकारे व्यक्त केलेली नाही, हे आपण जाणताच! आपल्या "तलतजी" यांनी हेच केले. ते "फिल्ममधल्या" गायनासाठी उत्सुक होते, परंतु तत्कालीन गाण्यांमधला "जॉनर" हा त्यांच्या आवाजाशी कुठेही "मॅच" होत नाहीय, हे लक्षात येताच, त्यांना "सक्तीची विश्रांती" दिली गेली असावी असे म्हणायला हरकत नाही! एका मस्त वैभवशाली "बंगल्यातून" त्यांना एका "फ्लॅटमध्ये" शिफ्ट व्हावे लागले, यापेक्षा दुर्दैव ते काय? मी हे अगदी पोटतिडकीने बोलत असेन, पण याचा " रिझल्ट" काय? (कृपया याबद्दल आणखी व अधिक माहितीसाठी आपण माझे "ई साहित्य प्रतिष्ठान" यांच्यातर्फे प्रकाशित "संगीतकार ए. आर. रहमान" यांच्याविषयीचे एक मस्त "ई- बुक" अवश्य वाचा!)

एकीकडे "डिस्को" प्रकार तेजीत आला खरा. पण संगीताचे खरेखुरे रसिक मात्र मनातून आक्रंदत होते. हिंदी चित्रपट संगीतावर भिस्त ठेवावी तर "शोले" (१९७५) च्या आगमनासरशी हिंदी सिनेमात "डायलॉगबाजीला" अचानक ऊत येऊ लागला होता. त्याने चंचुप्रवेश केला असं सुरुवातीला वाटलं खरं पण त्याने काही काळातच पडदा

व्यापून टाकला. "कानामागून आली.. आणि तिखट झाली.." म्हणतात ना!? अगदी तस्सच! या काळातले "हिंदी" चित्रपटातील संगीत अगदीच वाईट नव्हते परंतु ते संगीतरसिकांची भूक भागवू शकेल इतका त्यात दम नसावा, असे तत्कालीन बुजुर्गांच्या गप्पांमधून आम्हां बच्चेकंपनीला ऐकायला मिळे.

आणखी सांगायचं तर.. तुम्हाला आठवत असेल! याच काळात "इरॉस" वगैरे "थिएटर्स" मध्ये "इंग्लिश" चित्रपट लागणं सुरू झालं होतं. "एंटर द ड्रॅगन", "द ओमान" ते "माय फेअर लेडी" अशी शृंखला सादर होत होती. हताश मनःस्थितीतले (म्हणजे हातात काम नसलेले) सन्माननीय मन्नादा, तलतजी ही सगळी स्थित्यंतरे शांतपणे न्याहाळत होते. अचानक काय घडलं? ज्यामुळे यांच्यासह संगीतरसिक काहीसे सुखावले?

या काळात त्यांना दिलासा देणारी गोष्ट घडली ती "ग़जल" नावाच्या प्रकाराने अचानक डोकं वर काढलं. याआधी "ग़जल" ही केवळ काही "उच्चभ्रू" लोकांची जणू मक्तेदारी होती. त्या काळात "जगजीत सिंह" वगैरेच्या "गझल्स" लोकप्रिय होऊ लागल्या होत्या. नंतर "एच.एम. व्ही." ने त्यांच्या "ई.एम.आय." या लेबलवर "गुलाम अली", "मेहंदी हसन" यांच्या "एल. पी." रेकॉर्डस् बाजारात आणल्या मग श्रीमंत रसिकांच्या ऐसपैस दिवाणखान्यात "रेडिओ - ग्राम" किंवा "रेकॉर्ड प्लेअर्स" वर या "ग़जल्स" ऐकल्या जात असत, मात्र त्या सर्वसामान्यांच्या घरात कधी आल्या? (लोक तलतजीना

"शहेनशाह-ए-ग़जल" भले सन्मानाने म्हणत असले तरी या जुन्या चित्रपटातील त्या अमुक "ग़जल", या केवळ तीन साडेतीन मिनिटांच्या ईपी "रेकॉर्ड्सवर" उपलब्ध असायच्या. त्या सिनेमातील "सिच्युएशन साँग्ज" म्हणूनच सामोऱ्या आल्या होत्या. यातून श्रवणसुख मिळे, परंतु पूर्ण भूक भागणे शक्य नव्हतं. १९८० साली "निकाह" नामक सिनेमा प्रदर्शित झाला. त्यात "गुलाम अली" यांची "चुपके चुपके रात दिन.." ही गझल ऐकायला मिळताच लोक अक्षरशा "गझल" प्रकाराचे "फॅन" झाले! आता मात्र वेगळं काहीतरी घडणार हे रसिकांच्या मनात आलं. आपल्या लोकप्रियतेचा "फायदा" घेत "गुलाम अली", "मेहंदी हसन" यांनी "परदेशासह" आपल्या भारतात "रितसर" परवानगी घेत "लाइव्ह शोज" सुरू केले.

आपले लाडके प्रसिद्ध पार्श्वगायक आणि "शहेनशाह-ए-ग़जल" तलत महमूद यांचे "परदेश दौरे" तर १९५६ मध्येच सुरू झाले होते, हे तर तुम्ही जाणताच. व्यावसायिक संगीत मैफिलींसाठी (Concerts) परदेशात जाणारे ते पहिले भारतीय पार्श्वगायक होते. त्यांच्या परदेशी दौऱ्यांविषयीची आणखी महत्त्वाची माहिती सांगायची तर.. १९५६ मध्ये त्यांनी आपला पहिला दौरा "पूर्व आफ्रिका" (East Africa) येथे केला होता. तिथे त्यांचे सहा शो होणार होते, पण प्रचंड लोकप्रियतेमुळे त्यांनी तब्बल ४५ हाऊसफुल शो केले, हे विशेष! या सर्व बाबतीत ऊहापोह करायचा तर.. या सर्व "शोज" बद्दल विस्ताराने सांगायचं तर.. सन्मा. तलतजी (तसेच "गुगलवरील" उपलब्ध

माहितीनुसार,) आपल्या "तलतजींची" ही सर्व सादरीकरणे मुख्यतः सन्मा. "आमंत्रणे" आणि "प्रायोजकत्व" मिळालेल्या गोष्टीतून साकार झाली होती. (प्रायोजकत्व मिळालेल्या काही अमुक "जाहीर कार्यक्रमांमधून", सादरीकरण करणाऱ्या त्या "सेलिब्रिटी गायकाला" त्याचा थेट आर्थिक फायदा हा पूर्णतः त्या "गायकाला" पूर्णपणे मिळतोच असे कधीच नसते. का? कारण भले ते लोक, ती अमुक "सेलिब्रिटी" आणि त्यांची संपूर्ण टीम यांचा आवास, निवास, भोजन यासह संपूर्ण खर्च उचलत असेल, तरीही थेट आणि संपूर्ण फायदा "गायक सेलिब्रिटीला" मिळतच असेल, असे नाही! येस!! तर आपल्या इथे "ग़जल" चे "लाइव्ह कॉन्सर्ट" करणारे पाकिस्तानी कलावंत "गुलाम अली", "मेहंदी हसन" (रितसर परवानगीनंतर) भले इथे भारतात "लाइव्ह कार्यक्रम" करायला आले. त्यांची एकंदर कार्यपद्धती आपल्या "तलतजी" (आणि "मन्नादा" यांनी नक्कीच अभ्यासली असावी, यात शंकाच नाही.) इतकेच नव्हे तर याच पॅटर्नवर पुढे तीच "कॉन्सेप्ट" अनुप जलोटा, तलत अजीज, अशोक खोसला ते थेट "हरिहरन" यांनी अंगिकारली नसेल ना? नक्कीच असेल! यात शंकाच नाही! असो! अशा "लाइव्ह ग़जल" सादरीकरणाच्या कार्यक्रमाची "बिदागी" ही महत्त्वाचं होतं! (सादरकर्त्या गायकाला भरगच्च मानधन, तसेच संयोजक, वादक मंडळी यांना व्यवस्थित रक्कम मिळाल्याने त्या काळात सर्वत्र आनंदी आनंद होता.) कुणी काही म्हणोत, माझं व्यक्तिगत मत विचाराल तर मी याचं संपूर्ण श्रेय मी "जगजीत सिंह", "गुलाम अली", "मेहंदी

हसन" यांना देईन. काहीही असो! या व अशा अनेक "लाइव्ह शोज" मधील आनंद, मिळालेला पैका त्यामुळे पूर्ण समाधान, आपल्या सन्मा. "तलतजींना" मिळाले हे महत्त्वाचच होतं नाही का? थोडक्यात.. आपल्या "सन्मा. तलतजीच्या" आयुष्याची "संध्याकाळ" या प्रकारामुळे अत्यंत आनंदात सरली! हे मला, त्यांच्या सोबतच्या मुलाखतीतून त्यांनी अगदी आपलेपणाने व आनंदाने सांगितली. मधला भयंकर काळ यांनी ज्याप्रकारे (दुर्दैवाने) व्यतित केला होता, त्यावर "परमेश्वराने" केलेलं हे लेपन खरोखरच अद्वितीय होते. "गॉड इज ग्रेट!" (एक खास गोष्ट सांगतोय.. जी गोष्ट आज तुम्ही सर्वजण पूर्णत: जाणता! काही बाबतीत, एखादी अमुक संस्था, अगदी खास (रसिकांना आवडेल) असा एखादा "छान" असा "कार्यक्रम" म्हणजेच "लाइव्ह कॉन्सर्ट" आयोजित करतो ना.. तेव्हा त्यात त्यांचा एक छुपा "मतलब" लपलेला असू शकतो! हे मी आणि तुम्ही सुद्धा पाहिलेय आणि अनुभवले आहे. ते अमुक सादरीकरणाचं "आमंत्रण" हे अर्थातच "अर्थार्जन" देणारे नक्कीच नसावं! हे काय मी सांगू? "वाह! वाह! वाह!" अशा पठडीतल्या त्या अमुक सादरीकरणातून, ते आपलेपणाने सादर करणाऱ्या कलावंताच्या खात्यात भरपूर प्रमाणात "अर्थार्जन" होत असेल, याविषयी माझ्या किंवा सर्वसामान्य रसिकाच्या मनात तरी संदेह आहे.)

तलतजींनी त्यानंतर अमेरिका (USA), युनायटेड किंगडम (UK), वेस्ट इंडिज, कॅनडा अशा विविध देशांचे दौरे केले! असो!

तलतजींना भारतीय संगीत क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना भारत सरकारद्वारे 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते!

अनेक पारितोषिके मिळालीत तलतजींना! १९७५ चं "बेगम अख्तर अवॉर्ड", १९८५ चा "लायन्स क्लब ऑफ दिल्ली" तर्फे हृद्य सत्कार, १९८८ चा "नौशाद पुरस्कार" (मात्र "फिल्मफेअर अवॉर्ड" कधीच मिळाले नाहीय. या "फिल्मफेअर अवॉर्ड्स" बद्दल बोलायचे तर "फिल्मफेअर अवॉर्ड्स"चा सुरुवातीपासूनचा इतिहास पाहता, "तलतजी" यांचे नाव "सुजाता" (१९५९) या चित्रपटासाठी त्यांनी गायलेल्या "जलते हैं जिसके लिए.." (निर्माता : बिमल रॉय, गीतकार : मजरूह सुल्तानपुरी, संगीतकार : सचिन देव बर्मन) या गाण्यासाठी त्या वर्षीच्या "उत्कृष्ट गायक" कॅटेगरीत "नामांकन" म्हणून झळकलेले दिसते खरे! परंतु "उत्कृष्ट गायक" हा पुरस्कार, मुकेशजी यांना "सब कुछ सिखा हमने.." (अनाडी) या गाण्यासाठी मिळाला. आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगायची तर या "फिल्मफेअर अवॉर्ड्स" सोहळ्यात "सुजाता" या चित्रपटाला मोजून आठ नामांकने मिळालेली होती परंतु यातून केवळ "सर्वश्रेष्ठ चित्रपट" (बिमल रॉय), "सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक" (बिमल रॉय), "सर्वोत्कृष्ट अभिनेत्री" (नूतन) हेच "फिल्मफेअर अवॉर्ड्स"चे मानकरी ठरले. त्यावर्षी अनेक अवॉर्ड्स मिळविणारा चित्रपट होता तो "अनाडी"! हे विशेष! अर्थातच तत्कालीन "पुरस्काराच्या समितीने" राजकारण केले असे म्हणता

येणार नाही, कारण "अनाडी" हा चित्रपट सर्वार्थाने ग्रेटच होता! मला एकच वाईट वाटतं की यानंतर अनेक "फिल्मफेअर अवॉर्ड्स" सोहळे झाले होते ना? परंतु त्यातल्या एकाही "सोहळ्यात" आपल्या गाण्यांनी रसिकांच्या मनात एक वेगळा कोपरा राखून ठेवणाऱ्या "तलतजी" या मधाळ आणि मखमली आवाजाचा, त्या त्या समितीने, "तलतजी" यांना "जीवन गौरव पुरस्कार" तरी द्यायला हवा हा विचारच केला नाही!? का? निदान त्यांच्या "रेकॉर्डस्"चा "खप" तरी बघायचा. "बिनाका गीतमाला" याचा तरी संदर्भ घ्यायचा! धत् तेरे की! कमाल आहे यार!), भारत सरकारने त्यांना "पद्मभूषण" पुरस्काराने गौरविले आहे, त्यांच्या गौरवार्थ "पोस्टल स्टॅम्प" सुद्धा प्रकाशित करण्यात आला आहे. यामुळेच की काय, आपल्या मनात भावभावनांचा कल्लोळ असूनही ते तत्कालीन संगीताच्या वाटचालीकडे विमनस्क अवस्थेत असूनही तटस्थपणे पाहत असत. १९९१ च्या दरम्यान त्यांना सौम्य असा अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यातून ते काहीसे सावरले खरे परंतु त्यांनी त्यानंतर मात्र पूर्णत: विजनवास स्वीकारला! त्यांचा मुलगा "खालिद महमूद" हा "पॉप संगीताचा" अभ्यास करता करता त्या क्षेत्रात करियर करण्याच्या विचारात होता. (परंतु तो यात किती यशस्वी झाला, याची मला खरोखरच अजिबात माहिती नाही. हा त्याचा बेटा "खालिद" फेसबुकवर भले "ऍक्टिव" असतो. तिथे तो "सन्माननीय तलतजी" यांच्या भूतकाळातील अनेक आठवणी पोस्ट करत असतो. तो भले आपल्या सर्वांच्या "आठवणींना" उजाळा देत असेल, परंतु तो आणि

त्याचे "कुटुंब" (आत्ताचे "अर्थकारण", "महागाई" हे पाहता..) आत्ता या क्षणी खरोखरच "सुखी आणि समाधानी जीवन जगत असतील का?"

मी अत्यंत आपुलकीने आणि पोटतिडकीने बोलतोय! आज अनेक संगीत कार्यक्रम सादर करणारे अनेक मातब्बर असे सन्माननीय ग्रुप्स, म्हणजेच "म्युझिक" सादर करणारे अनेक ग्रुप्स, जे भूतकाळातील अनेक मातब्बर गायकांसाठी "खास" टायटल्स देत आपले कार्यक्रम सादर करत असतात. अर्थातच ते मस्त सादरीकरण करतात, यात शंकाच नाही! मात्र त्यापैकी कुणीही "तलत महमूदजी" यांच्यासाठी काही खास "कार्यक्रम" सादर केला असेल का? तर मला तरी माहित नाहीय! कारण त्या जबरदस्त सुपरहिट कार्यक्रमातून "तलतजी" यांचा बेटा "खालिद" त्यांचा यथोचित सत्कार करत, मस्त कार्यक्रम सादर झाला, तर ती गोष्ट खचितच त्या कुटुंबासाठी आपल्या लाडक्या "तलतजी" यांच्या प्रीत्यर्थ एक खचितच आगळीवेगळी "श्रद्धांजली" ठरेल, असे मनापासून वाटते असो!

मुलाखत देताना तलतजी भूतकाळातील रम्य आठवणीत रमताना दिसले. मुलाखत कळसाध्याय गाठताना "खालिद" आतल्या खोलीतून उत्साहाने "हार्मोनियम" घेऊन आला. "साईनिंग कॉर्ड" वाजवता वाजवता "तलतजींकडे" पहिलं मात्र. पांढऱ्या शुभ्र पेहरावातले "तलतजी" सोफ्यातच बसून त्याला इशारे करत काही सांगायचा प्रयत्न करत होते. मग काय! "खालीदने" गायला सुरूवात

केली, आपल्या "अब्बाजानचंच" गाणं तो उत्साहानं गात होता तो. दोनच ओळीनंतर "तलतजींनी" त्याच्या सुरात सूर मिसळले.

"ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल,

जहाँ कोई न हो अपना पराया,

मेहेरबान ना महेरबा..

जाकर कहीं खो जाऊँ मैं,

निंद आये तो सो जाऊँ मैं,

दुनिया मुझे धुंडे मगर..

मेरा निशान कोई न हो!"

तलतजी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी (९ मे १९९८ रोजी) मुंबई येथे त्यांचे निधन झाले. एक मखमली आवाज, एक मधाळ स्वर, एक हृदयावर कोरीवकाम करणारी ग़जल अनंतात कायमची विलिन झाली. एक पर्व संपले!

(तलत महमूद यांच्या लोकप्रिय गाण्यांविषयी आणि त्यांच्या सांगीतिक प्रवासाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी, तुम्ही 'Talat Mahmood – Cinemaazi' या दुव्याला भेट देऊ शकता. तसेच,

तलत महमूद यांच्या मराठी गाण्यांचा आनंद घेण्यासाठी 'आठवणीतली गाणी' या संकेत स्थळाला अवश्य भेट द्या. तलत महमूद हे बॉलिवूडमध्ये 'किंग ऑफ गझल्स' म्हणून कसे ओळखले जाऊ लागले, हे समजून घेण्यासाठी हा व्हिडिओ नक्की पहा! तलतजी गेले. अनंतात विलीन झाले. आपल्या कानामनात स्वतःला ठेवून! काय दैवदुर्विलास आहे पहा! अकाली निधनामुळे आपल्याला वयोवृद्ध "मधुबाला" पहायला मिळाली नाही. लाडके सन्माननीय "किशोरदा", "मुकेशजी", तसेच "मोहम्मद रफी" यांचे "षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळे" पहायचे भाग्य लाभले नाही! "तलतजी" हयात होते परंतु "तलतजी" यांची १९८७ नंतर, तर गाणी सुद्धा ऐकायला मिळाली नाहीत! यापुढेही ऐकायला मिळणार नाहीत, हा सल आपल्या प्रत्येकाच्या मनात आहेच आहे. आपल्या कानामनातले "तलतजी" मात्र चिरतरुण राहिले. म्हणूनच त्याचं गाणं चिरतरुण राहिलं...

"रात ने क्या क्या ख्वाब दिखाए..
रंग भरे सौ जाल बिछाये,
आँखें खुली तो सपने टूटे,
रह गये ग़म के काले साये,
रात ने क्या क्या ख्वाब दिखाए! "

© लेखक : डॉ. अनंत पावसकर
(ज्येष्ठ पत्रकार व संगीत संयोजक)©

सन्माननीय "तलतजी" यांचे "अल्बम्स"






TALAT
MAHMOOD
The King
Of Ghazals
Jukebox

BEST OF
TALAT MAHMOOD
Audio
JUKEBOX

TALAT MAHMOOD
GOLDEN HITS
ANHONEE

GOLDEN MELODIES OF
TALAT MAHMOOD
ASHIANA


Talat
Mahmood
15 Magical Duets
Jukebox
HD

BEST OF
TALAT MAHMOOD

HD
14
TOP
TALAT
MEHMOOD
VIDEO JUKEBOX

BEST OF
TALAT MAHMOOD
बेस्ट ऑफ
तलत महमूद
Vol.2
AUDIO JUKEBOX

TALAT MAHMOOD
ROMANTIC HITS
MEM SAHIB

TALAT
MAHMOOD
THE BEST COLLECTION


SPECIAL GHAZALS
TALAT
MAHMOOD
VIDEO SONG JUKEBOX


GOLDEN MELODIES OF
TALAT MAHMOOD

GOLDEN MELODIES OF
TALAT MAHMOOD

AUDIO JUKEBOX
BEST OF

GREATEST HITS OF
GAZAL NAWAZ
TALAT
MAHMOOD
VIDEO SONG JUKEBOX

Talat Mahmood Ki Mehfil
SUPER
HITS

Best of
Talat Mahmood

SUPERHIT SONGS
Talat Mahmood Ke
Amar Geet

SHAHENSHAH - E - GHAZAL
TALAT MEHMOOD
TOP 15 HITS
Jukebox

TALAT MAHMOOD
JUKEBOX
NOSTALGIA

TALAT
MAHMOOD
Playlist : 121 Videos

TALAT MAHMOOD
KARAOKE
Playlist

LIVE
Concert
TALAT MAHMOOD
Playlist

तलत
महमूद
Playlist

ई-ये मराठीचिये नगरी

जो जे **वाचील** तो ते लाहो

पुस्तकाच्या कव्हरवर फक्त एक क्लिक आणि पुस्तक उघडेल.

आता सर्व पुस्तकांच्या छापिल आवृत्ती उपलब्ध आहेत. आपली मागणी नोंदवा WhatsApp- 9987737237

https://chat.whatsapp.com/KybNQeSmpaF46C47GyeXQl?mode=ac_t

esahity free ebooks_46

आपण या ग्रुपमध्ये सामील झाल्यावर वर्षाला १०० ते २०० मराठी ई पुस्तकं विनामूल्य नियमित प्राप्त होतील.